# प्रवास आणि परिचय
## - पासपोर्ट आठवणींचा

दत्तात्रय कृष्णा निकम



# अर्पण पत्रिका

**माझ्या विचारांच्या प्रवाशांना परिचित करून**

**घेणाऱ्या सर्व वाचकांसाठी, प्रवासी परिवारासाठी आणि हितचिंताकासाठी अर्पण !**

# मनोगत

प्रवास हा तसा प्रत्येकाच्या आवडीचा विषय....बरोबर आहे की नाही? पण काहीजणांना कोणता प्रवास हे सुद्धा तितकेतच महत्वाचे असेल या प्रश्नाचे उत्तर देताना. तुम्ही म्हणाल, आता हे काय नवीन शोधून काढले? प्रवास हा फक्त प्रवासच असतो, परंतु वाचकहो तसे नाही बरे का? अगदी बरोबर ! प्रत्येक व्यक्तीची ह्या विषयाची वेगळी व्याखा असू शकते, वेगळे मत असू शकते, वेगळे अनुभव, वेगळ्या पद्धती, वेग-वेगळे प्रसंग आणि असे बरेच काही असू शकते.

प्रवास हा तसा साधा, सोपा आणि सरळ विषय असेल परंतु **प्रवास आणि परिचय** हा नक्कीच वेगळा विषय होऊ शकतो का तुमच्या-आमच्यासाठी? माझे उत्तर तर हो आहे, मग तुमचे स्वतःचे मत किंवा मग ह्या प्रश्नाचे उत्तर काय असू शकते? ह्याचा कधी विचार केला आहे का? कदाचित विचार केला असेलही किंवा कदाचित विचार केलेला नसेलही? म्हणूनच तर हा वेगळा विषय समजून घेण्यासाठी एक वेगळी नजर, वेग-वेगळे लोक आणि त्याचा ह्या विषयाकडे बघण्याचा दृष्टीकोन पडताळून पहावे असे वाटणाऱ्या आमच्या सारख्या लेखकांच्या लेखणीतून आपणासमोर सादर करत आहे, **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा .**

प्रवासाचे तसे वेग-वेगळे प्रकार असतात, काही लोकांसाठी साहसी प्रवास, ऐतिहासिक प्रवास, माहितीपर प्रवास किंवा मग भटकंती, राजकीय प्रवास, जीवन प्रवास, रेल्वेचा प्रवास, बस-एसटीचा प्रवास, सायकलचा प्रवास, मोटरबाईकचा प्रवास, ऑटो रिक्षाचा प्रवास, विमानाचा प्रवास, मित्रांसोबत जीवनातील गोड-कडू-आंबट क्षणांचा प्रवास आणि असे बरेचसे प्रवास, कदाचित ह्या पुस्तकात नमूद न केलेले किंवा मग न करता येणारे प्रवास. प्रवास म्हंटले की पहिल्यांदा नजरेसमोर येते ती म्हणजे प्रवासाची तयारी, मग प्रवासाला जाण्याची तारीख असो, ठिकाण असो किंवा मग त्यासाठी येणारा खर्च ईत्यादी असो आणि अश्या बऱ्याचश्या गोष्टी असतील. परंतु आपण येथे जे विषय पडताळून पाहणार आहोत ते म्हणजे मी केलेले प्रवास, त्या प्रवासादरम्यानचे अनुभव, त्या प्रवासादरम्यान झालेले परिचय आणि असे बरेच काही.

ह्या पुस्तकाच्या माध्यमातून लेखक **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** ह्या विषयावरील आपले स्वतःचे विचार, तसेच विविध लोकांशी चर्चा करून मांडलेले त्यांचे विचार संग्रही रूपाने आपणासमोर सादर करणार आहे. माझे स्वतःचे **प्रवास आणि परिचय** ह्या विषयावर वेगळे विचार आहेत, त्यानिमित्ते मी स्वतः अनुभवलेले काही प्रसंग आपणासमोर सादर करीत आहे. ह्या प्रसंगाची मांडणी विषयाच्या आकलनानुसार केली आहे, त्यासाठी योग्य किवा अयोग्य क्रमाचा निकष लागू होत नाही, आणि तसा तुम्ही प्रयत्नसुद्धा करू नये ही विनंती. तरी आपल्या माहितीसाठी - ह्या विषयाला अनुसरून मी स्वतः काही लघुपट सुद्धा केलेले आहेत आणि ते तुम्हा सगळ्यांना जरूर आवडतील अशी आशा करतो. ह्यात मी प्रामुख्याने **प्रवास** आणि **परिचय** असे दोन वेगळे विषय हाताळलेले आहेत. लघुपटाचे विषय खालील प्रमाणे आहेत.

१. **प्रवास आयुष्याचा** : आयुष्य खूप सुंदर आहे. मुळातच आयुष्याचा प्रवासच फ़ार सुंदर आहे. प्रवासावरून आठवले...माझे घर आणि शाळेचे अंतर तसे काही लांब नव्हते. त्यामुळे आम्ही चालतच शाळेत जायचो. नंतर कॉलेज, नोकरी व पुढचे आयुष्य नुसते प्रवासात गेले. आता फक्त आठवतो तो लोकलचा प्रवास, बसचा प्रवास, ऑफिस मध्ये पोहचण्याचा व मग पुन्हा घरी परतीचा प्रवास, गर्दी, धक्काबुक्की, ऊन, गर्मी (उकाडा), पाऊस आणि घाईगडबडीत गेला. माझ्याप्रमाणे तुम्ही सुद्धा कंटाळला असाल पण ह्या प्रवासात मी काही चांगल्या गोष्टी सुद्धा पाहिल्या, मी ज्या गोष्टी टाळू शकत नाही मग त्या गोष्टी का कवटाळायच्या?

२. **माझ्या राजे रे:** ह्या प्रवासादरम्यान मी अनुभवलेल्या काही गोष्टी आणि आजकालची परिस्थिती खूप ठळकपणे जाणवते आणि तेच वास्तववादी सत्य आहे. ह्यात मी माझ्या मित्र-परिवार सोबत केलेल्या प्रवासाचे सार्थक झाल्याची मला जाणीव झाली.

३. **इन्शुरन्स विश्वासाचा:** आयुष्य खूप सुंदर आहे, प्रत्येकजण आपले आयुष्य सुंदर व सुरक्षित करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. प्रत्येकजण आपल्या आयुष्यात वेगळे-वेगळे इन्शुरन्स घेतात. त्यात प्रामुख्याने घराचा इन्शुरन्स , गाडीचा इन्शुरन्स आणि असे बरेचसे इन्शुरन्स घेतात' परंतु ह्या धावपळीच्या जीवनात कदाचित आपण आपल्यावर असणाऱ्या विश्वासाचा इन्शुरन्स घेण्याचे विसरलो तर नाही ना? चला तर मग पाहूया- इन्शुरन्स विश्वासाचा.

या पुस्तकात नमूद केलेले विचार हे लेखकाचे स्वतःचे आणि ज्यांचे हे प्रवास आहेत त्यांचे विचार आहेत. ह्या विषयातून आपणास काहीतरी नवीन वाचायला मिळावे व आयुष्य जगण्याचा आनंद घेण्यासाठी प्रवास व त्यादरम्यान होणारे परिचय किती महत्वाचे आहेत हेच सुचवायचे आहे. मला हा विषय हाताळताना बरेच चांगले-वाईट गोष्टी अनुभवायला मिळाल्या. काहीचा वेळ मिळाला पण भेट झाली, ज्यांची भेट झाली त्यांना कदाचित मुलाकती साठी वेळ नव्हता. परंतु तेथे न थांबता पुढे प्रवास करत राहणे हेच मी माझ्या आयुष्याच्या प्रवासात शिकलो. आयुष्यातील असे आलेले हे अनुभव मला नेहमीच चांगले काम करण्यासाठी प्रेरणा देतात. का हो ! असं होतं का तुमच्या बाबतीत ? तुम्हाला असे काही अनुभव आले असतील तर त्यात गुंतून पडू नका कारण आयुष्यात आणखी बऱ्याच चांगल्या गोष्टी आहेत अनुभवण्यासाठी. चला तर मग सुरुवात करूया आपल्या प्रवासाची. सर्व प्रथम वाचक वर्गाचे आभार कारण तुम्ही हा विषय वाचनासाठी आणि मग समजण्यासाठी निवडला, सर्व प्रवासी, परिचित लेखकांचे आभार ज्यांच्या सहकार्य व मार्गदर्शनाशिवाय हा विषय पूर्ण झाला नसता.

म्हणतात ना आयुष्यात काहीतरी नवीन करत रहा मग जगण्याची मजा काही औरच आहे. त्याचा प्रत्यय म्हणून आमचा हा नवीन प्रयत्न. ह्या पुस्तकाद्वारे आम्ही एक वेगळा प्रयत्न करीत आहोत आणि तो म्हणजे आमच्या पुस्तकातील काही परिचितांच्या अनुभवांचे व्हिडिओ, लघुपट, आपणासाठी पुस्तकाच्या शेवटी यु-ट्यूब च्या माध्यमातून सादर करणार आहोत. ह्या वेगळ्या प्रयत्नासाठी **शुभम एंटरटेनमेंट आणि मानस मुव्हीज** च्या टीमचे विशेष आभार, ज्यांच्यामुळे हे सर्व शक्य झाले.

**प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** या विषयाने मला नव-नवीन प्रवासी परिचित करून दिले त्यात मी प्रामुख्याने एका नवीन कलाकाराचे विशेष आभार मानतो. हा वेगळा विषय हाताळताना विषयाला अनुसरून आकर्षक असे मुखपृष्ट बनवून दिल्याबद्दल **कुमारी. देवश्री किशोर खोपकर** या नवतरुण कलाकाराचे विशेष आभार. देवश्री हीने या विषयाबद्दल विशेष परिश्रम करून कथेला अनुसरून वेगळे प्रवास चित्ररूपी आपणासमोर सादर केले. हे मुखपृष्ट प्रत्येक वाचकाला या विषयाची उत्तम कल्पना देवून जाईल यात माझ्या मनात काही दुमत नाही. सध्या देवश्री आपले दहावीचे शिक्षण पूर्ण करून स्थापत्य (आर्किटेकचर) या विषयात पदवी संपादन करण्याचे स्वप्न मनात ठेवून प्रयत्न करीत आहे. देवश्री ही एक हुशार व गुणी विद्यार्थी आहे. तिचे कलागुण तिला मिळालेल्या वेग-वेगळल्या स्पर्धेतून मिळालेल्या पदकांनी व सन्मानातून दिसून येते. तसेच मग तिला मिळालेली आंतर शालेय स्पर्धा परीक्षेतील बक्षिसे असोत किंवा मग ज्युडो कराटे मध्ये तिने मिळवलेला ब्लॅक बेल्ट असो. मुळात उत्साही असणारी देवश्री मोकळ्या स्वभावाची आणि नेहमी काहीतरी नविन करण्याची किंवा नविन काही शिकण्यासाठी नेहमीच तयार असते. अशा या हर-हुन्नरी कलाकारास आपणा सर्व वाचकांचे आशीर्वाद मिळावे हीच विनंती.

अशा वेग-वेगळ्या वळणावरून झालेला हा प्रवास खरोखर एक वेगळी अनुभूती आहे. त्यात मला मिळालेले अनुभव घेवून आपणा समोर **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** विषय सादर करीत आहे. यातील बरचसे प्रसंग प्रत्येकाने कधी ना कधी, कुठे ना कुठे, कधीतरी तरी स्वतः अनुभवलेले असतील, आणि जर कोणी अनुभवले नसतील तर त्यांच्यासाठी ही एक सुवर्ण संधी ठरू शकते.

जर आपणास हा विषय आवडला किंवा ह्या बद्दल काही अभिप्राय द्यायचा असल्यास आम्हाला जरूर लिहा. आपले अभिप्राय आम्हाला अति उत्कृष्ठ साहित्य किंवा मग नवीन विषय सादर करण्याची प्रेरणा देतात.

आपला,
मी मराठी,



दत्तात्रय कृष्णा निकम

# अनुक्रमणिका

**प्रवास माझा**

- प्रवास १ : रेल्वेचा प्रवास
- प्रवास २ : ऑटो रिक्षा प्रवास
- प्रवास ३ : बस प्रवास
- प्रवास ४ : विमान प्रवास
- प्रवास ५ : शैक्षणिक प्रवास
- प्रवास ६ : सांस्कृतिक प्रवास
- प्रवास ७ : भटकंती प्रवास
- प्रवास ८ : सामाजिक प्रवास

**प्रवास त्यांचा**

- प्रवास ९ : वैद्यकीय प्रवास
- प्रवास १० : व्यायाम प्रशिक्षण आणि प्रशिक्षकाचा प्रवास
- प्रवास ११ : भटकंती - एक प्रवास वर्णमाला
- प्रवास १२ : व्यावसायिक प्रवास
- प्रवास १३ : शैक्षणिक प्रवास
- प्रवास १४ : प्रशासकीय प्रवास

**प्रवास आमचा**

- प्रवास १५ : आमचा...आयुष्याचा प्रवास

**आयुष्य**




**या सदरात आपण माझे काही खास प्रवास अनुभवणार आहोत. मग त्यातील प्रवास असो किंवा प्रवासी परिचित असोत अनुभव एकदम वेगळे असणार आहे, चला तर पाहूयात - प्रवास माझा!**

**प्रवास १ : रेल्वेचा प्रवास,**

घाटकोपर ते कळवा, ठाणे दि. १८ एप्रिल २०१७ चा दिवस, वेळ संध्याकाळची होती अंदाजे ६.१५ वा,

मी ऑफिसवरून सुटल्यावर घाटकोपर वरून कळव्याला जाण्यासाठी अर्धगती जलद लोकल (अहो...आपली सेमीफास्ट ट्रेन) पकडली. मध्य रेल्वेचा प्रवास म्हणजे एक गंमत किंवा पर्वणी असते, काय सांगू तुम्हाला ? ज्यांनी अनुभवला असेल त्यांना हे नक्की समजेल पण ज्यांनी हा अनुभव घेतला नाही त्यांना फक्त स्मरण करावे लागेल.



मी प्रथम वर्गाच्या (First Class) रेल्वे डब्यात दरवाज्यात उभा होतो (बरोबर की चूक हे ठरवण्याची ही वेळ नाही...आणि ह्या गोष्टीचे आम्ही समर्थनही करीत नाही), तिथेच माझ्या मागच्या बाजूला दरवाज्यावर एक जाड-जुड व्यक्तिमत्वाची अनोळखी व्यक्ती आपली स्वतःच्या ऑफिसची बॅग कशी-बशी सावरत दरवाज्यातून बाहेर डोकावत **अर्धगती जलद लोकलच्या** हवेची मजा घेत होते. मध्ये मध्ये त्यांचा चुकून आजू-बाजूच्यां प्रवाशांना धक्का लागत होता. मुळात मराठी माणूस हा मनाने गमतीदार स्वभावाचा असतो, परंतु कदाचित आजूबाजूची परिस्थिती त्याला धीर-गंभीर माणूस बनवते. आमचा प्रवास सुरु होता, लोकल वेगाने एक एक रेल्वे स्थानक ओलांडत होती बघता बघता मुलंड रेल्वे स्थानक आले आणि जलदगती लोकल थांबली. थोड्या फार प्रमाणात चढण्याचा-उतरण्यचा गोंगाट चालू होता कारण मुलंड स्थानक नंतर लोकल धीमी होणार होती. लोकल सुरु होवून वातावरण शांत झाले फक्त लोकलच्या धावण्याचा आवाज सुरु होता आणि तो पूर्णपणे टिपण्याचा माझा प्रयत्न चालू होता. लोकल **मुलंड-ठाणे** स्थानका दरम्यान धावत असताना, अचानक माझ्या कानावर आवाज पडला, "**आजीबाई खूपच गरम झाली आहे आणि आजोबा शांतपणे ऐकत आहेत**", स्वतःला सावरत मी मागे वळून पाहिले तर काय? माझ्या मागे उभी असणारी व्यक्ती (जाड-जुड...आठवले का?) माझ्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत होती. मी मागे वळून दाद दिली, एक हसरी भावमुद्रा करून आणि मग काय परिसंवाद चालू झाला. काय ती आजीबाई तापली होती, आजोबा मनात म्हणत असतील "**आता कुठे दिवसाची गर्मी कमी झाली आहे, मग तू आता का गरम झाली आहेस?**"....बघितले का तुम्ही? असे त्या मागे उभ्या असणाऱ्या अपरिचित, अनोळखी व्यक्तीने विचारले, मी लगेच उत्तरलो....अरेरे ! मी कदाचित मिस केले वाटते. त्यावर उत्तर मिळाले, अहो ! खूप मजा आली ते दृश्य बघताना. इतक्यात लोकल ठाणे स्थानकावर पोहचली, बघतो ना बघतो तोच ती अपरिचित, अनोळखी व्यक्ती खाली उतरली आणि बघता-बघता निघून गेली.

माझी मुद्रा व मन यांचा हावभावाचा ताळमेळ लागत नव्हता. पुढे मी कळव्याला उतरलो. घरी चालत जात असताना विचार करत होतो ती व्यक्ती कोण होती ?. त्यांचा माझा काही परिचय नव्हता पण ती व्यक्ती माझ्याशी किती सहज सवांद, चर्चा साधून निघून गेली. आमचा परिचय ५-१० मिनिटाचा पण खूप काही सांगून, शिकवून गेला.

थोडक्यात काय तर ! रेल्वेचा प्रवास हा आनंद घेत केला तर गर्दी, गर्मी अजिबात जाणवत नाही मिळतो फक्त बक्कळ आनंद.

**प्रवास आणि परिचय** ह्यात काही साम्यता आहे की नाही ? मी तो क्षण कधीही विसरणार नाही. मग तुम्ही ठरवा परिचित व्यक्तीसोबत प्रवास करायचा? की जर मग कोणी बरोबर नाही म्हणून प्रवासात परिचय करीत प्रवासाचा आनंद घ्यायचा ?


त्या रात्री माझ्या मनात खूप काहीतरी सुरु होते...काय ते नक्की शब्दात सांगता येणार नाही......

मुंबईकराचा ! विशेष करून नोकरदार मंडळीचा प्रवास खरच आनंद देवू शकतो का? हे सुद्धा नक्की सांगता येणार नाही.

**प्रवास २ : ऑटो रिक्षा प्रवास**

कळवानाका ते राम मारुती रोड, ठाणे, गजानन महाराजाच्या मठाजवळ, दि.१९ एप्रिल १७. वेळ सकाळ ७.१५ वा.

नेहमीप्रमाणे मुंबईकरांच्या प्रवासाची जशी सुरुवात होते, तशीच माझी सुद्धा…धावपळीची, कंपनीत पोहोचण्याची किंवा मग कंपनीची बस पकडण्याची. कळवा नाक्यावरील लाईनमधील रिक्षा पकडण्यासाठी मी रिक्षा चालकाला विचारले "**राम मारुती रोड, गजानन महाराज मठ**" तो उत्तरला, मागच्या रिक्षात जा,मी जात नाही. सकाळची सुरुवात अशी झाल्यावर जर मी रागावलो नाही तर मी मुंबईकर कसला ? मी मागे जावून दुसरी रिक्षा पकडली, निघताना त्या रिक्षावाल्याला उत्तरलो " जर तुम्हाला जायचे नसते, तर मग ऑटो रिक्षा रांगेत कशाला उभी करता ? ".



मी रिक्षात बसलो, रिक्षा कळवा नाक्यावरून निघाली, मी ज्या रिक्षात बसलो होतो, त्या रिक्षाचा ड्रायव्हर म्हणाला " साहेब ! जाऊ द्याना, सकाळी - सकाळी कशाला रागावता, अजून पूर्ण दिवस जायचा आहे तुमचा". कळवानाका ते राम मारुती रोडच्या प्रवासादरम्यान सवांद सुरु झाला "आजचे रिक्षावाले, सामाजिक व्यवस्था व राजकीय नेते मंडळीची वृत्ती यावर चर्चा केली". […***सुरुवातीला त्याने एकट्यानेच सुरु केली नंतर मग सवांद सुरु झाला…***]

माझे ठिकाण आल्यावर पैसे देताना रिक्षावाला म्हणाला "आपण मराठी ! मराठी ! करतो आणि आपले मराठी लोक सकाळी सकाळी असे वागतात". सकाळी सगळ्यांना ऑफिसला जायची घाई असते जर तुम्ही त्यांना सेवा देवू शकत नाही तर मग रिक्षा कशाला चालवायची ?

आपण सगळ्यांनी मिळून पैसे देणारा नेता निवडायचा आणि मग मराठी, अमराठी करायचे आणि मग आपणच म्हणतो की "काय झाली आहे आपल्या राज्याची परिस्थिती? ". पैसे घेवून मीटर बंद करून तो निघून गेला.

विचार केला एक रिक्षावाला किती कडवट सत्य सांगून गेला. त्याचा अर्थ काही वेगळा असावा, त्याला काही वेगळे सांगायचे असेल. असो ! पुन्हा एकदा अपरिचित प्रवासी..पुन्हा विचाराचा कल्लोळ सुरु, प्रवासाची अंतर मर्यादा २-३ किलोमीटर, वेळ १० ते १५ मिनिटे, ना परिचय, ना काही, वेगळी परिस्थिती, वेगळा विषय- वेगळे विचार.

**प्रवास आणि परिचय** ह्यांचा काही संबंध आहे का? पुन्हा एकदा मुद्राभाव व मन….त्याच भावना ज्या पहिल्या प्रवासात जाणवल्या.

आता तुम्ही हे पुस्तक वाचताना विचार करायला लागलात ना? मला माहित आहे तुमचे सुद्धा असे प्रवास नक्कीच असतील, हो ना...यार ! माझे पण असे बरेच प्रवास आहेत. मग जा भूतकाळात आणि आनंदी व्हा. पण भविष्यातसुद्धा वेळ, प्रसंग न पहाता, प्रवासातील परिचयांचा आनंद घ्या.

खरोखर हा विषय विचार करायला लावणारा आहे, जसे जसे तुम्ही हे पुस्तक वाचाल तसे - तसे नवीन - नवीन विचारांचे, विषयाचे आकलन होईल. आपल्या सर्वांना वर्तमान, भविष्याचा विचार करायला आवडतो परंतु वाचकहो ! काही वेळा भूतकाळ सुद्धा खूप काही सांगून, शिकवून जातो. ते चांगले किंवा वाईट अनुभव कशा प्रकारे स्वीकारायचे हे प्रत्येकाने आपल्या आचार-विचाराने ठरवायचे.

चला ! चला ! थोड लवकर चला, आता आपण थोड माझ्या भूतकाळात जावूया. किमान ८-९ वर्ष मागे. माझ्या ह्या प्रवासाने मला एक जिवाभावाचा मित्र दिला.

....तर त्याचे झाले असे की, चला तर मग पाहूया पुढचा प्रवास.

**प्रवास ३ : बस प्रवास**

सिंगापूर ते क्वातांन, मलेशिया, क्रिकेट स्पर्धा: ३९ वी कुवंतानं इंटरनॅशनल सिक्सेस – २००८ (सिक्स-ए-साईट)

दि.९ ऑक्टोबर २००८ ची सुंदर, उस्ताहवर्धक सकाळ, आम्ही सगळे वेग-वेगळ्या क्रिकेट अकादमीचे सदस्य ताजे तवाने **सिलोन स्पोर्टस क्लब** (Cylone Sports Club-CSC), बॅलेस्टीयर रोड, सिंगापूरच्या मैदानावर जमलो होतो. सगळेच क्रिकेटपटू असल्याने वातावरण हलके-फुलके होते, सगळेच सज्ज, सगळ्या क्लबच्या क्रिकेटपटूची ओळख पाळख करण्याचा कार्यक्रम चालू होता.

मी (दत्तात्रय निकम) **सिंगापूर रिक्रीएशन क्लब** (Singapore Recreation Club-SRC) ला क्रिकेट खेळायचो,



हा संघ त्याच्या सिंगापूरच्या घरच्या प्रथम श्रेणी क्रिकेट स्पर्धेत - अ, ब, क संघासह खेळायचा. मला ह्या स्पर्धेसाठी माझ्या संघाचे प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य लाभले. माझ्या संघाचा कर्णधार **प्रताप शन्मुगन** ने विचारले ***"हे निक्की, यु वांना मीट पुना वंडर बॉय?"***. मी हसत मुद्रेने उत्तरलो ***"व्हाय नॉट"*** आणि मग आम्ही दोघांनी पुढे चालायला सुरुवात केली. समोर त्याने ज्या व्यक्तीची ओळख करून दिली ती व्यक्ती म्हणजे सिंगापूर क्रिकेटमधील तरुण, तडफदार, प्रतिभाशाली, उत्तम तंत्रशुद्ध फलंदाज, उत्कृष्ठ यष्टीरक्षक व उपयुक्त गोलंदाजी करणारा असा **चेतन रामचंद्र सूर्यवंशी**. आमची ओळख करून देत "बाय, मच्ची" , म्हणत प्रताप तेथून निघून गेला.

चेतन सूर्यवंशीला आम्ही सिंगापूर प्रथम श्रेणीचे क्रिकेट क्लबचे सामने खेळताना बघायचो. त्याची फलंदाजी बघणे म्हणजे जणू एक पर्वणी असायची. सिंगापूर नॅशनल टीमचा सदस्य असल्याने आमच्यासाठी तो एक "**अप्पर**



**ग्रेडचा**" खेळाडू, मग तो कसा असेल, काय नसेल, असे अनेक प्रश्न असायचे. परंतु पहिल्या भेटीतच आम्ही दोघे एकमेकांचे चांगले मित्र झालो.

बसमधला ५ तासाचा सिंगापूरहून सुरु झालेला प्रवास कमल हसनचा "**दशावतारम**" हा तामिळ सिनेमा बघण्यात आणि गप्पा मारण्यात कसा निघून गेला काही कळलेच नाही, जसा हा तामिळ सिनेमा सुद्धा पूर्ण कळला नाही. आंम्ही एकत्र मारलेल्या गप्पा खुपच मजेशीर होत्या त्यात काही दुमत नाही.

पुढे स्पर्धेदरम्यान चेतनच्या संघाची (**सिलोन स्पोर्टस**) आणि माझ्या संघाची (**एस. आर. सी**) उपांत्यपूर्व फेरीत समोर-समोर धडक झाली. आमच्या संघाने ६ षटकात ७४ धावांचे लक्ष त्याच्या संघासमोर विजयासाठी ठेवले

होते. आमची फलंदाजी चांगली झाली होती आता चांगली गोलंदाजी करण्याची जबाबदारी आमच्या समोर होती आणि ती सुद्धा नॅशनल टीमचे ३ सदस्य असलेल्या सिलोन स्पोर्टसच्या फलंदाजासमोर.

मी माझे वैयक्तिक पहिले व संघाकडून दुसरे षटक घेवून, चेतनला गोलंदाजी करणार होतो. क्षेत्ररक्षक सज्ज एक यष्टीरक्षक, लॉग ऑन, डीप कव्हर, थर्डम्यान, स्केवर लेग व मी स्वतः गोलंदाजीसाठी तयार. पहिला चेंडूबरोबर उजव्या यष्टीबाहेरचा चेतनने वाईड थर्डम्यानला चौकारासाठी टोलावला. मी पुढचा चेंडू घेवून तयार, समोर चेतन फलंदाजीसाठी सज्ज, चेंडू मधल्या यष्टीवर फुल लेंन्थ टाकलेला, परंतु गुणवान फलंदाज असल्याने चेतनने तो चेंडू माझ्या डोक्यावरून सरळ स्टेडीयमच्या बाहेर तटवला. अशी भेदक फलंदाजी फौज असलेल्या संघाने आमचे ७४ धावांचे आव्हान ४ षटकात संपवले. भेदक फलंदाजी करणारा चेतन मनाने, विचाराने, वागण्याने साधा, सरळ वागणुकीचा माझ्या गावाजवळचा निघाला. त्यानंतरचे जे काही दिवस आम्ही एकत्र जगलो त्यामुळे आमची मैत्री ही नात्याच्या पलीकडची, नाते, ऋणानुबंध जन्माचे जुळले. नंतर मी मार्च २००९ साली वैयक्तिक कारणास्तव सिंगापूर सोडून भारतात परतलो...कायमचा !








**सिंगापूर रिक्रीएशन क्लब (SRC) टीम**



**साद भाई जान्जुंआ, दत्तात्रय निकम, चेतन सूर्यवंशी, कार्तिक भाटिया, क्षितीज शिंदे**



चेतन - क्षितीज



क्षितीज शिंदे



चेतन सूर्यवंशी



चेतन सूर्यवंशी (यष्टिरक्षक)



चेतन सूर्यवंशी (शतक पूर्ण केल्यानंतर)



मी...नेल (NEL) क्रिकेट संघाबरोबर




टी-२० विनिंग मोमेंट (NEL)

मैत्रीचे नाते टिकवून आम्ही दोघे एकमेकाच्या संपर्कात होतो. चेतन माझ्या लग्नासाठी सिंगापूरहून माझ्या गावी आला. अशी ही निरंतर मैत्री अजून टिकून आहे. नंतर आम्ही त्याला भेटण्यासाठी सिंगापूरला गेलो होतो आणि वारंवार जात राहिलो. चेतन आणि त्याचे क्रिकेट सिंगापूर क्रिकेटसाठी एक नव संजीवनी आहे. चेतन सिंगापूर






नॅशनल टीमचा कर्णधार आहे आणि **वर्ल्ड कप - २०१९** पात्रता स्पर्धेसाठी तयारी करत आहे. आपण सर्वांच्या शुभेच्छा त्याला देत आहे.

आज चेतन यशस्वी क्रिकेटपटू आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपला **कॅप्टन कुल महेंद्रसिंग धोनीने** चेतनच्या **क्रीककिंगडम** (Crickingdom) त्याच्या इंटरनॅशनल क्रिकेट अकॅडमी चालवण्याचे काम सोपले आहे. ह्याला म्हणतात विश्वास, आता तुम्हाला

विश्वास बसला असेल त्याच्या क्रिकेट कौशल्याचा, खुद्द माही ! खरंच क्रिकेट आणि त्याची पक्की पारख



असलेला माही आणि चेतन यांचे क्रिकेटचे नाते जुळवून आले.

तो सिंगापूर मध्ये त्याचा कुटुंबासोबत, मित्र परिवारासोबत राहतो आणि आम्ही आमचे प्रस्थ भारतात स्थापून आहे, परंतु आजही आमची मैत्री जसी होती तशीच आहे.

चेतनच्या बरोबरच्या काळात " **क्षितीज शिंदे** " या अजून एका चांगल्या मित्राची ओळख झाली. आमच्या सिंगापूरच्या काळातला चांगल्या-वाईट काळाचा साक्षीदार...काय क्षितीज सिंगापूर-२००९ चा चांगी विमानतळावरचा तो क्षण तुझ्या लक्षात नक्की राहिला असेल, आठवतोय न तो विलक्षण क्षण ?

प्रवास हे एक निमित्त आहे, परंतु बसच्या प्रवासादरम्यान झालेला परिचय, गप्पा-टप्पा, विचार विनिमय, हे सर्व जमून आले ते फक्त-आणि-फक्त क्रिकेटमुळे...! क्रिकेट झिंदाबाद !

थोडक्यात काय तर ! काही वेळा परिचय हे एका विशिष्ठ घटनेमुळे किंवा कृतीमुळे होतात, त्यातील काही प्रसंग हे आयुष्यभर लक्षात ठेवण्यासारखे असतात, तर काही प्रसंग विसरण्यासारखे असतात. चेतन सूर्यवंशी बरोबरचा झालेला प्रवास - परिचय मला एक चांगला जन्मभराचा मित्र देवून गेला. माझा तो बसचा प्रवास एक जीवनगाथा आहे, असे मी आवर्जून सांगू शकतो.


आयुष्यात काही प्रवास आणि प्रवाशी असे भेटतात की त्यांचा व आपला जीवनाशी काहीही संबंध नसतो, परंतु काहीजण चांगल्या आठवणी किंवा मग आयुष्यभराचे धडे देवून जातात.

**प्रवास ४ : विमान प्रवास**

दिल्ली ते बंगलोर, कंपनीच्या कामानिमित्त केलेला विमानप्रवास, दि. २० एप्रिल २००५, वेळ संध्यकाळची ७.30 वा.

आयुष्यात काही प्रवास आपणास आपले स्वप्न पूर्ण झाल्याची भावना देतात. अशीच एक भावना मला अनुभवता आली ती म्हणजे माझा पहिला विमानप्रवास. **दि. २० जाने, २००५**, ती संध्यकाळ मी कधीच विसरू शकत नाही, कारण माझ्या कंपनीच्या कामानिमित्त केलेला हा प्रवास काहीसा खास होता तो दोन कारणांमुळे १) पहिल्यांदा विमानप्रवास करण्याची संधी मिळाल्याने २) विमानप्रवासात कळत- नकळत तिच्याबरोबरचा झालेला तो खास परिचय...काही वेळा आपण काही गोष्टी मानव्याच लागतात.

अनेकदा काहीसा आत्मविश्वासू असणारा मी ह्यावेळी मात्र काहीसा डळमळीत मनाने माझ्या पहिल्या विमानप्रवासासाठी **जेट एयरवेजच्या** विमानात प्रवेश केला. सीट चेक करून सीटवर स्थिरसावर होवून, विमानात मिळालेल्या **विन्डो** सीटचा आनंद घेत बाहेर बघत बसलो होतो. तेव्हा विमानाने प्रवासासाठी वेग पकडत, उड्डाण केले तो क्षण थोडासा धस्स करणारा होता. सगळ्याच गोष्ठी नवीन होत्या मग तो सीटबेल्ट, सुशिक्षितपणे बसण्याच्या त्या तऱ्हा असो किंवा पद्धती असो की मग विमानातील शिष्टाचार आणि असे बरेच काही. दुसरीकडे मन ह्या प्रवासाचा आनंद घेत होते.



अंदाजे एक ते दीड तासाचा प्रवास झाला असेल.. जेवणाची वेळ झाली अशी एक सूचना झाली. ह्यावेळी मी मात्र थोडा धीर-गंभीर झालो होतो. कसं काय जमणार. काही चुकले तर ! आणि असे बरेच विचार मनात येवू लागले. एक-एक करत माझ्या सीटच्या रांगेत हवाईसुंदरी जेवणाची ट्रॉली घेवून आली. त्या हवाईसुंदरीने विचारले “व्हाट यु लाईक टू ह्याव? सर ! वेज ऑर नॉन-वेज?”, मी उत्तरलो (धीर-गंभीर भावावरून ..हलके स्मित हास्य करत) “ वेज प्लीज !”. माझ्या जेवणाचा ट्रे पुढे करत, ती जेवणाची ट्रॉली पुढे करत निघून गेली.



मी जेवणाचा ट्रे टेबल (पुढच्या सीटच्या मागच्या बाजूला असणारा) उघडला आणि हात मोकळे करत मी तो जेवणाचा ट्रे टेबलवर ठेवला. विचारात पडलो किती लहान आहे हा ट्रे, त्यात जेवणासाठी असणारे सर्वेकाही होते. भाजी, भात, पाव, चीज, सलाड, स्वीटडिश, लोणचे, २-३ चमचे, चहाचा कप, दुध पावडर (क्रीमर), साखर, पिण्याचे पाणी इत्यादी. सध्या एवढेच आठवते आहे. पहिली १० मिनिटे जेवण कुठून सुरु करायचे हे ठरविण्यात गेली. ती हवाईसुंदरी कोणाला काही हवे आहे का

ते तपासत पुढे चालली होती. माझ्या शेजारील व्यक्तीसुद्धा अधून-मधून माझ्याकडे बघत आपल्या जेवणाची मजा घेत होता. मी अधून-मधून इकडे-तिकडे, वर-खाली बघत असताना त्या हवाईसुंदरीची नजर माझ्यावर पडली, तिने लांबूनच (हळुवार) विचारले "यु वॉन्ट एनीथिंग?", तिच्या ओठांच्या हालचाली जणू मी ओळखल्या व नजरेनेच जणू तिला सांगितले " नो! नथिंग" आणि कसेबसे माझे जेवण सुरु केले. ती स्मितहास्य करत निघून गेली आणि इतक्यात माझ्या हातातील एक चमचा खाली पडला. तरीही मी जणू काही घडलेच नाही असे दर्शवत माझे जेवण कसे-बसे संपविले. जेवण चांगले होते परंतु प्रसंग बाका होता...कसातरी निभावून नेला ना राव !. मी जेवण संपवून तयार झालो. इतक्यात पुन्हा तिच हवाईसुंदरी जेवणाचा ट्रे घेण्यासाठी आली. घाई-घाईने मी तिला माझ्या जेवणाचा ट्रे दिला आणि कप उचलून हातात घेतला. मी जणू सुटकेचा श्वास सोडल्यासारखा आनंदी झालो व माझ्या सीटवर स्थिरस्थावर झालो..... (**पुढे काय आहे हे मला माहीतच नव्हते**).

थोड्या वेळाने माझ्या कानावर आवाज पडला "टी ऑर कॉफी , सर !", मी म्हणालो "टी" आणि माझा कप पुढे केला. तिने माझा कप "ब्लॅक टी" ने भरून मला परत दिला आणि हसत पुढे निघून गेली. मी मस्त पैकी चहाचा सिप घेतला, इतका कडवट की मी तो कप तसाच ट्रे टेबलावर ठेवला. मी आता समजून चुकलो होतो की जेवणाचा ट्रे परत देताना "मी क्रीमर, शुगर वर स्टर्रर" काढून ठेवला नाही. चहा ! तसाच थंड होऊन गेला. ती जेव्हा पुन्हा चहाचा कप घेण्यासाठी आली तेव्हा सगळ्यांचे रिकामे कप व माझा भरलेला कप घेऊन ती निघून गेली, जाता जाता म्हणाली "नॉट टू वरी , आय विल जस्ट कमबॅक".

माझा शेजारी बसलेली व्यक्ती सुद्धा मला म्हणाली " इट्स ओके ! " (कदाचित त्यांच्या लक्षात आले होते की मी पहिल्यांदा विमानाने प्रवास करत आहे). ती हवाईसुंदरी माझ्यासाठी एक कप चहाचा घेऊन आली ....त्यात दूध साखर सगळच होतं.... मी थँक्स म्हणून चहाचा कप घेतला . तिने जाता -जाता " इट्स माय प्लेजर , सर ! " म्हणत निघून गेली.



हे सर्व होता-होता , माझे विमान बंगलोर विमानतळावर उतरण्याची वेळ झाली. विमानातून खाली उतरताना, मी तिला "थँक्स" म्हणून निघून गेलो.

१५ दिवसानंतर माझे काम संपल्यानंतर मी पुन्हा परत जाताना लकीली ! तिच हवाईसुंदरी मला **जेट-एअरवेजच्या** विमानात दिसली. मला माहित नाही तिने मला ओळखले की नाही परंतु मी तिला ओळखले होते (आज मला त्या हवाईसुंदरीचे नाव लक्षात नाही). ह्यावेळी मी सर्व काही (जेवण....वगैरे) आत्मविश्वाने केले आणि प्रवास संपवून दिल्लीला परतलो .

माझ्या दृष्टीने आमचा झालेला हा परिचय (**मी नवखा प्रवास करणारा)** आणि तिने शिताफीने हाताळलेला प्रसंग ...खूप काही शिकवून गेला.

थोडक्यात काय तर ! कदाचित हा तिच्या कामाचा भाग असेल, परंतु मला विमानप्रवास करण्याचा आत्मविश्वास मिळाला , परिस्थिती हाताळण्याचे धाडस व आयुष्यात आपणास जर काही जमत नसेल तर बिनधास्त होऊन स्वतःहून विचारा, नाहीतर मग तुम्ही मागे पडाल किंवा मग उपाशी रहाल (**मनात हास्याचा कल्लोळ..**).





आतापर्यंत मी अंदाजे ५०-६० विमान प्रवास आनंदाने केले, आणि ज्या लोकांना विशेषता वयोवृद्ध किवा दुसऱ्या कोणालाही काही अडचण जाणवत असेल तर त्यांना मदत करताना....प्रवासाची मजा घ्या, आनंदाने !

**प्रवास ५ : शैक्षणिक प्रवास**

शालेय व इंजिनीअरिंगचा जीवनाचा प्रवास

मी जन्माने सांगली जिल्ह्यातील परंतु कर्माने सातारा जिल्ह्यातील, कामा निमित्त कुटुंब मुंबईत आलेले. माझा शैक्षणिक प्रवास थोडासा वेगळा होता. १ ली मुंबईत, २ री ला गावी, ३ रीपासून पुन्हा मुंबईत, मग आई-वडिलांच्या दृढनिश्चयाने नंतरचे शिक्षण मुंबईत घेतले. घराची परिस्थिती तशी बेताचीच होती.



माझ्या शालेय जीवनाची सुरुवात झाली ती प्रामुख्याने नगरपालिकेच्या (म्युनिसिपल) शाळा, माझगाव, मुंबई-४०००१० येथे. मी जसा माझ्या शालेय जीवनात खडतर प्रवास केला, कदाचित माझ्या समवयस्क लोकांनी सुद्धा तेवढाच केला असेल त्यात काही दुमत नसावे, त्यावेळची परिस्थिती आता सारखी नव्हती. इयत्ता ३ री ते ७ वी पर्यंतचे शिक्षण याच शाळेत मराठी माध्यमातून झाले. जसे प्रत्येकाच्या आयुष्यात एक ना एक **गुरु** असतो त्याला मी तरी कसा अपवाद असणार. माझ्या वैयक्तिक आयुष्यात १ ले गुरुवर्य म्हणजे माझे आई-वडील. माझ्या शैक्षणिक गुरुवर्य म्हणजे **सौ.अनिता गोन्साल्वीस** ह्या माझ्या फक्त वर्ग शिक्षिका नसून त्या माझ्या हृदयाच्या खूप जवळ होत्या. त्यांनी मला खूप चांगले घडविले. ज्या वयात मुलांना खेळण्यात-हुंडण्यात मजा करावीशी वाटते ती मला सुद्धा करून देवून माझे चांगले चरित्र घडविण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला.

मी जणू त्याच्या मुलासारखा होतो. मला मराठीतून उत्तम ज्ञान, कला व क्रीडा या व्यतिरिक्त अष्टपैलु व्यक्तिमत्व घडवण्यासाठी त्यांनी खुप मेहनत घेतली. मुळात स्वतः ख्रिस्ती धर्माच्या असून सुद्धा मराठीचे मनाचे श्लोक , गीतेतील अध्याय व ग्रंथाचे भव्य-दिव्य भांडार होत्या . त्या काळातील गोष्टी जास्त काही शब्दात वर्णन करता येणार नाहीत. कारण तेवढ्या मोठ्या कर्तृत्वाला नमन करण्यासाठी माझ्या शब्दांचे भांडार अपुरे आहे.

थोडक्यात काय तर ! माझे व्यक्तीमत्वाचे पैलू पडण्याचे काम त्यांनी माझ्या आई-वडिलांच्या मदतीने फार जबाबदारीने पार पाडले. त्यांनी मला माझ्या वाचनशैली, हस्तलेखन, वक्तृत्वकला, अभ्यास करताना धडा समजून घेण्याची सारांश पद्धत, विषयाची मुद्देसूद मांडणी आणि अशा बऱ्याच गुणांनी श्रीमंत केले. अशा या मातृसमक्षी गोन्साल्वीस महोदयांना (मॅडम) वंदन करण्याची संधी मला ह्या पुस्तकातून मिळाली . माझ्या आयुष्याच्या प्रवासात मी त्यांना वारंवार-भेटत राहिलो परंतु १९९६ नंतर त्यांचा आणि माझा संपर्क तुटला कारण त्यां नंतर त्या आपल्या मुलाकडे अमेरिकेला निघून गेल्या. परंतु त्यांनी दिलेलं संस्कार व काही अवजात गुण मला त्यांची आठवण नेहमी करून देतात. मॅडम ! तुम्ही जिथे कुठे असाल तिथे सदैव खुशाल व स्वस्थ रहा हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

नंतर माझ्या पुढील शिक्षणासाठी म्हणजे ७ वी चे शिक्षण नगरपालिकेच्या शाळेमध्ये पूर्ण केल्या नंतर ८ वी ला म्हणजे हायस्कूलसाठी परेलच्या **के. एम. एस. डॉ. शिरोडकर हायस्कूल** मध्ये प्रथम (सकाळ सत्र) अधिवेशनात प्रवेश घेतला. सर्व काही नवीन-नवीन होते. परंतु माझ्या गोन्साल्वीस मॅडमने घडवलेला मी थोड्याच दिवसात वर्गात उठून दिसायला सुरुवात झाली. मग नंतरचे ८ ते १० वी चे दिवस म्हणजे जणू एक पर्वणी होती, माझ्यासाठी आणि माझ्या घरच्यांसाठी.

म्हणतात ना ! हे वयच असं असतं , मी अभ्यासात चांगला होतोच शिवाय खेळात, लिखाणात व वक्तृत्वात सुद्धा चांगला होतो परंतु येथे मला एक अजून नवीन गुण मिळाला तो म्हणजे खट्याळ (शरारती). कदाचित माझ्या गुरु माझ्याबरोबर नव्हत्या. मी खूप खोडकर होत चाललो होतो, पुन्हा माझ्या मदतीला धावून आल्या त्या माझ्या विज्ञान विषयाच्या व आमच्या वर्गशिक्षिका **सौ. अरुणा करमरकर** महोदया (ईयत्ता. ९ वी) मला त्यांनी एकदा शांतपणे समजावले. मग तो दिवस आणि आजचा दिवस मी आयुष्यात मागे वळून पहिले नाही परंतु काही गोष्टी आत्मसात करायला वेळ गेला. मी खासकरून त्यांचा शांत स्वभाव, त्यांची बोलण्याची पद्धत व राहणीमान याने खूपच प्रभावित झालो होतो. त्यांनी माझ्यावर वर्गातील फळ्यावर रोज एक सुंदर अक्षरात सुविचार




**माझे हायस्कूल : के.एम, एस, डॉ. शिरोडकर हायस्कूल, परळ, मुंबई**

लिहिण्याचे काम वर्गशिक्षिका म्हणून सोपवले. ह्या काळात माझ्यात खूप बदल होत चालला होता. त्यांच्या ह्या कृतीने मला खूप आत्मविश्वास दिला. तुम्ही नेहमी आपल्या आजू-बाजूला पाहत चला तुम्ही खूप काही शिकाल व

समजाल, त्यात तुम्हाला चांगले वाईट सुद्धा दिसेल त्यातून चांगले निवडण्याची संधी तुम्हाला मिळेल. त्यांनी दिलेला हा मंत्र मला आजघडीपर्यंत खूप काही शिकवत राहिला आणि ती कार्यपद्धती अजून चालू आहे.

ह्याच कालावधीत आमचे १० वीचे विज्ञान विषयाचे शिक्षक **श्री. विश्वास नाईक** यांच्या चाणाक्ष नजरेत मी पडलो. मला माहित नाही की माझे नशीब चांगले आहे की माझ्या आई-वडिलांची पुण्याई ज्यामुळे मला खूप उत्तमोत्तम गुरुवर्य लाभले.

ईयत्ता १० वी असताना नाईक सरांनी आम्हाला बाहेरील विश्व मोठ्या विश्वासाने दाखविण्यास सुरुवात केली. सरांची शिकवण्याची पद्धत, त्यांचे विज्ञान विषयाचे असलेले ज्ञान आणि आव्हाने स्वीकारण्याची तयारी खूप काही शिकवून गेले. त्यांचे भौतिक विषयाचे **आत्मविश्वास** हे पुस्तक ४० पैकी ४० ची तयारी करून गेले. मला एकदा त्यांनी मार्गदर्शन केले, ती कला मी माझ्या शैक्षणिक प्रवासात वापरली आणि यश मिळत गेले. अजून ही आठवते त्यांनी संपूर्ण वर्गासमोर दाखविलेला विश्वास, मी कधीच खाली पडून दिला नाही. अशा या दोन मात्तबर व्यक्तींना मानाचा मुजरा करण्यासाठी मी कधीही मागे-पुढे पाहणार नाही.



मी दहावी पास झाल्यावर डिप्लोमा कोर्स - औद्योगिक इलेक्ट्रॉनिक्स (इंडस्ट्रियल) यशस्वीरीत्या पूर्ण केला. नंतर डबल डिप्लोमा - उपकरणीकरण (इंस्ट्रुमेंटेशन) करत असताना आणखी एक साधी राहणी व उच्च विचारसरणी असलेले...पुन्हा मला एक नवीन गुरुवर्य शिक्षक मिळाले ते म्हणजे **श्री. दिलीप पवार**, **भारती विद्यापीठ, नवी मुंबई सीबीडी बेलापूर**. डबल डिप्लोमा करताना पवार सर आम्हास **कंट्रोल सिस्टीम** हा विषय शिकवायचे. माझा हा आवडता विषय वरून पवार सरांचे मार्गदर्शन, साध्या सोप्या नोटस व त्यांची हसत खेळत शिकवण्याची शैली हा विषय सोपा करून समजून घेण्यासाठी मदत करीत असे. मला वर्गातील पहिल्या युनिट टेस्टला कंट्रोल सिस्टीम विषयात मध्ये २५ पैकी २५ गुण मिळाले, आणि नव्या गुरु शिष्याची जोडी जमली. एका मागून एक परीक्षा पार करत गेलो. शेवटच्या वर्षीच्या प्रोजेक्ट चे गाईड सुद्धा पवार सरच ! असे करता-करता वर्ष संपत आले, सगळेच शेवटचे टर्म सबमिशन




(Assignment / practical Journal submission) पूर्ण करण्यात मग्न. सर्वकाही व्यवस्थित झाल्यानंतर एकमेकांना परीक्षेस शुभेच्छा देत परीक्षेच्या तयारीसाठी आम्ही निघून गेलो. परीक्षा सुरु झाल्या.....संपल्या, मग उजाडला तो दिवस जो

प्रत्येकाच्या आयुष्यात महत्वाचा असतो तो म्हणजे शेवटच्या वर्षीचा निकाल. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, तणाव जाणवत होता आणि का असणार नाही. ह्या निकालानंतर पुढचे सर्वकाही ठरणार होते.

सगळ्यांना त्यांच्या मनासारखे गुण (% टक्केवारी) मिळाले होते, मी सुद्धा खूप आनंदी होतो. मला एकूण ७२ % गुण मिळाले होते, आणि खासकरून कंट्रोल सिस्टीम विषयात १०० पैकी ८० गुण मिळाले होते. सगळे वातावरण कसे आनंदिमय झाले होते. सर्वजण पदवी (डिग्री) कोर्सच्या प्रवेशाच्या तयारीसाठी निघून गेले. आम्ही सगळे मित्र मंडळी पदवी कोर्सच्या प्रवेशासाठी औरंगाबादला गेलो. माझा नंबर महाराष्ट्रात १८ वा होता आणि मुंबईत उत्तम कॉलेजच्या प्रवेशासाठी १७ जागा होत्या. मुंबईच्या बाहेर राहणे परवडणार नव्हते कारण मी इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स डिप्लोमा नंतर मला लातूर-निलंगा मिळालेला पदवी कोर्सचा प्रवेश रद्द केला होता. मला जेव्हा देवकृपेने म्हणा किंवा आणखी काही. मला पुन्हा एकदा **भारती विद्यापीठ, सीबीडी, बेलापूर** येथे इंजिनीरिंगच्या **उपकरणीकरण (इंस्ट्रुमेंटेशन)** पदवी कोर्ससाठी दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळाला. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यावर कॉलेजच्या पहिल्या दिवशीचा तो क्षण माझ्या लक्षात अजूनही ताजा आहे. प्रत्यक्षात पवार सर पदवी कोर्सच्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी त्यांची बदली पदवी विभागात झाली. एक-एक सत्र पूर्ण करत गेलो, सरांचे मला खूप प्रोत्साहन असायचे, काही चुकाले की समजावणे, मार्गदर्शन करणे आणि असे बरेच काही नवीन माझ्या आयुष्यात घडत होते. घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे एकामागून एक वर्ष संपत चालली होती. मला ह्या काळात बऱ्याच शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यात प्रामुख्याने पवार सरानंतर, मी **श्री अरुण उकरांडे सर** व **सौ. कोहली महोदया** यांचा उल्लेख करेन. त्यांनी तेव्हाही मला खूप मार्गदर्शन केले आणि आजही करत आहेत, जेव्हा-जेव्हा मी इंजिनीरिंगच्या मुलांना व्याखान देण्यासाठी जातो तेव्हा-तेव्हा मला कोहली महोदया यांचे त्या विषयाला धरून उदाहरणे देणे व मार्गदर्शक सूचना खूप महत्वाच्या असतात.

माझ्या आयुष्यात ह्या काळात एक विलक्षण घटना घडली त्याचा प्रभाव इतका होता की त्याने माझे आयुष्य बदलून गेले. शेवटच्या वर्षाचे एका विषयाचे टर्म सबमिशन चालू होते. माझ्या जरनल मध्ये एक ग्राफ चुकला होता.



**श्री. अरुण उकरांडे सर**



**सौ. विनिता कोहली मॅडम**



**श्री. दिलीप पवार सर**

परंतु माझ्या कळत - नकळत तसाच राहून गेला आणि पवारसरांनी त्यावर क्रॉस मारून माझे त्या विषयाचे सबमिशन करून घेतले. माझे त्या विषयाचे टर्म सबमिशन पूर्ण झाले. बाकी सर्व विद्यार्थ्यांनी तो ग्राफ जसाच्या तसाच (प्रात्यक्षिक नोंदणी माझ्याकडून घेवून) काढला होता. सरांनी सगळ्यांना चूक मार्किंग करून, तो ग्राफ पुन्हा काढून आणण्यास सांगितले. सर्व विद्यार्थी गोंधळून गेले, आता काय करायचे सगळ्यांना प्रश्न पडला ? इतक्यात एक जण म्हणाला सर ! दत्ताने सुद्धा सारखाच ग्राफ काढला, मग तुम्ही त्याचे सबमिशन कसे घेतले? मी बऱ्याच कालावधीत सरांना एवढे रागात कधीच पाहिले नाही. सरांनी त्यांना सांगितले " जा त्याला बोलावून आणा". मला त्यांचा मेसेज मिळताच मी कॅन्टीनमधून धावत-धावत लॅबमध्ये पोहचलो. त्यानंतर जे झाले ते बघून सगळेच थक्क झाले, सरांनी माझी टर्म फाईल उघडून बघितली आणि सगळ्यांना सांगितले " मी त्याची फाईल ठेवून घेतली आहे, तुमची घेणार नाही. ग्राफ बदला नाहीतर तुमचे काही खरे नाही." आम्ही सगळेच वर्गात परतलो, एक-एकमेकांशी चर्चा सुरु झाल्या. सगळेच वातावरण तणावग्रस्त झाले होते. वेळ कमी होता, कसे बसे धाडस करत, मी पवार सरांना म्हणालो "मी तुम्हाला आश्वासन देतो की तोंडी परीक्षेच्यावेळी सगळे विध्यार्थी ग्राफ बदलतील." सरांनी माझ्यावरच्या विश्वासाखातर सगळ्याच्या फाईल जमा करून घेवून, परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी शुभेच्छा देवून निघून गेले. आम्हीसुद्धा" हो आपण सगळेच ग्राफ बदलू असे ठरवून निघून गेलो.

सत्राची लेखीपरीक्षा चालू झाली, परीक्षा संपली आणि तोंडी परीक्षेचा दिवस उजाडला. मी सकाळी लवकर जावून माझा ग्राफ बदलला, माझ्या सोबत काही जणांनी ठरवल्याप्रमाणे आपले काम पूर्ण केले, तोंडी परीक्षा देवून मी वर्गात बसलो होतो. एक-एक जण परीक्षेस जात होते, परत येत होते. इतक्यात सर मला भेटण्यासाठी आले आणि वर्गात सगळ्यांच्या समोर विचारले" काय रे ! दत्ता, तू मला आश्वासन दिले होते की परीक्षेच्या अगोदर सगळेजण ग्राफ बदलतील. परंतु तुला माहित नसेल तर सांगतो ८०% मुलांनी तसे केले नाही आणि सर निघून गेले. मी सुद्धा नाराज होवून तोंड धुण्यासाठी वर्गातून निघून गेलो, माझ्या चेहऱ्यावरची निराशा लपवता येत नव्हती.

सरांनी आपले काम चोख बजावले होते.सगळ्यांना पास केले होते ! नंतर मी सरांची माफी मागण्यास गेल्यावर सरांनी मला सांगितले, एक गोष्ट लक्षात ठेव " जर तुम्ही कोणत्याही गोष्टीची जबाबदारी घेतली तर ती विश्वासाने पूर्ण करा, पूर्ण तयारीनिशी त्याचा सामना करा, **Before committing anything think carefully** ".

थोडक्यात काय तर ! मला माझी चूक कळली, मग नंतर मी इंजिनीरिंग पूर्ण करून आम्ही आमच्या जीवनाच्या प्रोफेशनल प्रवासासाठी निघून गेलो. परंतु मी पवार सरांना अधून-मधून भेटत असे, आजही भेटतो तब्बल २० वर्षानंतरसुद्धा. त्यांनी सांगितलेला कानमंत्र घेवून मी माझ्या आयुष्यात खूप काही साध्य केले. आज जवळ-जवळ १६ वर्षाचा कार्यकारी अनुभव पूर्ण करून झाला. बऱ्याच यशाचा पायऱ्या चढलो, परतू यश पायातच ठेवले त्याला डोक्यात जावून दिले नाही. कदाचित हे सर्व आई वडिलांचे संस्कार, सर्व गुरुवर्याचे आशिर्वाद असावेत. मी सरांबरोबर घालवलेला वेळ, माझ्या आयुष्याचा शैक्षणिक प्रवास आणि महत्वाचे म्हणजे सरांच्या मदतीने, माझ्या अनुभवानुसार आम्ही मुंबई विद्यापीठाच्या उपकरणीकरण विषयाच्या इंजिनीरिंगच्या विषयाचा अभ्यासक्रम

बदलला. नंतर आम्ही दोघांनी मिळून **“ Fundamentals of Project Planning and Engineering ”** या विषयावर एक पुस्तक लिहिले.

माझा हा शैक्षणिक प्रवास मला खूप काही चांगल्या व्यक्तींना भेटण्याची संधी देवून गेला. मला वेळेने प्रत्येकाचे ऋण फेडण्याची संधी दिल्याबद्दल देवाचे मनपुर्वक आभार !

**प्रवास ६ : सांस्कृतिक प्रवास**

माझा सिंगापूरमधील मित्र मंडळ व महाराष्ट्र मंडळाच्या सभासदासोबतचा

मी दि. ०२ डिसेंबर २००६ साली माझ्या करीयरच्या प्रगतीसाठी एका प्रायव्हेट व्यवस्थापनात नोकरीसाठी (तेव्हाची Foster Wheeler सध्याची AMEC Foster Wheeler) कामाला रुजू होण्यासाठी भारतातून सिंगापूरला प्रयाण केले. तिथे गेल्यावर सर्व काही नवीन...नवा देश ! नवे लोक ! नवी परिस्तिथी ! परंतु देवाचे आभार, मला तेथे लाभलेले माझे सर्व सहकारी, मित्र परिवार माझा सिंगापूरचा प्रवास सुलभ करण्यात त्यांचा मोठा हातभार लागला.

माझा सिंगापूरचा मित्र परिवारामध्ये प्रामुख्याने **श्री व सौ. व्ही. एन. चंदाजी**, **श्री व सौ. प्रबोध आहिरे, श्री व सौ. महेश मोरे आणि श्री व सौ. अलंकार कुंभार,** तसेच एक जवळचा मित्र **श्री. चेतन अंबोरकर.** ह्या सर्व परिवारांचे मनापासून आभार कारण घरापासून दूर असताना एकटेपण कधी जाणवून दिले नाही.



**श्री व सौ. व्ही. एन. चंदाजी, सिंगापूर**



**मी स्वतः, प्रबोध अहिरे, महेश मोरे आणि श्री व सौ. व्ही. एन. चंदाजी, सिंगापूर**





**श्री व सौ. अहिरे परिवार आणि श्री व सौ. मोरे परिवार, सिंगापूर**

प्रत्येक सण मग तो दिवाळी असो किंवा मग गुडीपाडवा असो किंवा आणखी काही असो मला कधीही मी माझ्या घरापासून दूर असल्याची जाणीव होवून दिले नाही. जेव्हा मी २००९ साली सिंगापूर मधून कायमचा भारतात परतलो तेव्हा मी कधी विचारसुद्धा केला नव्हता की ह्या सर्व माझ्या प्रवासी परिवाराला पुन्हा: कधीही भेटता येईल ? किंवा पुन्हा संधी मिळेल ? परंतु म्हणतात ज्याला देवासारखे मित्र असतात त्यांची भेट घेणे आपोआप जुळून येते. ह्याच व्यक्ती त्यांच्यामुळे मला सिंगापूरमध्ये घरची माया मिळाली आणि आम्ही जेव्हा केव्हा सिंगापूरला आलो तेव्ह-तेव्हा ह्यांना भेटल्याशिवाय कधीच परतलो नाही.




: **अहिरे परिवार, चंदा परिवार व निकम परिवार**

तसेच ह्या माझ्या मित्र परीवाराव्यतिरिक्त अजून एक मित्र मंडळ होते ते म्हणजे **महाराष्ट्र मंडळ, सिगापूर**. मी मुळातच हौशी, छंदी असल्याने मला महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात हाराष्ट्र मंडळाच्या **अध्यक्षा सौ. वृंदाताई टिळक** (सन २००८) यांनी विचारले " निकम, तुम्ही मुळचे कुठले? काय करता? वगैरे-वगैरे". जर तुम्हाला क्रिकेट व्यतिरिक्त लेख, कविता, चित्रकला, वगैरे मध्ये रुची असल्यास, तुम्ही आमच्या नव्या उपक्रमात सहभागी व्हा. मी महाराष्ट्र मंडळाच्या क्रिकेट स्पर्धेत खेळायचो. मी काय लिहावे काय करावे कळत नव्हते. थोड्या मार्गदर्शनाने लिहिण्यास सुरुवात केली ती लेख, कविता, ब्लॉग इत्यादीने.गणेशोस्तव स्मरणिकेत (२००८ साली) माझा **भारत एक्स्प्रेस** हा लेख छापून आला. तो पर्यंत मी माझा **Indianproud...भारतीयांचा अभिमान** हा ब्लॉग लिहिण्यास सुरुवात केली. **शब्दगंधा, ऋतुगंध** अशा वेग-वेगळ्या उपक्रमात कविता सादर केल्या. नवीन नवीन लिहिण्याचे मार्गदर्शन, उत्तेजन मिळत होते, ते महाराष्ट्र मंडळाच्या सदस्यांचे. माझ्या ह्या प्रवासात मी सुद्धा काही चांगले लिहू शकतो हा आत्मविश्वास मिळाला. मला माझ्या कविता सादर करण्याच्या संधी मिळाल्या. मला आठवते आहे ती २००८ सालची संध्याकाळ, **शब्दगंधा** चे आयोजन म्हैसाळकर कुटुंबियांच्या घरी होते. तेथे दस्तुरखुद्द कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका आणि सुप्रसिद्ध जेष्ठ समीक्षक डॉ. सौ. विजयाताई राजाध्यक्षजी " यांच्या समोर मला माझी "नाद" या शब्दावरून केलेली कविता सादर करण्याचा योग आला. मी जणू धन्य झालो आणि माझ्या तोंडून शब्द निघाले "**भाग्यवंत मी !**". सिंगापूर मधील माझा हा प्रवास माझ्यासारख्या नवख्या



लेखकांसाठी नवसंजीवनी होती. त्या दिवशी जे अनुभवले ते एकदम अद्भूतीय होते. असा माझ्या आयुष्यातील सगळ्यात पहिला आणि मोठा अनुभव होता. ह्या कार्यक्रमाने मला एक वेगळी उर्जा मिळाली आणि नवीन काहीतरी लिहित राहावे यांची खात्री पटली. मला माहित नव्हते की शाळेत निबंध लिहिणारा मी लेख सुद्धा लिहू शकतो हा आत्मविश्वास मिळाला. मित्रानो, हे कदाचित माझ्या बाबतीत झाले वगैरे तुम्हाला वाटत असेल पण असे क्षण प्रत्येकाच्या आयुष्यात येत असतील पण त्यांना ते समजत नसतील. प्रत्येक व्यक्ती मध्ये एक कलाकार लपलेला असतो पण तो सगळ्यांना कळत नसावा बहुतेक नाहीतर प्रत्येक जण कलाकार झाला असता ......माफ करा मला तसे म्हणायचे नव्हते?




पण हल्ली लोक खरंच आपल्यातला कलाकार ओळखायला विसरतात. हे मग जाणून बुजून होते का? की खरंच आपण नाही ओळखू शकत आपल्यातला खरा कलाकार?. मित्रानो आपण आपल्यातला कलाकार ओळखा मग तो कदाचित एखादा गायक असेल किंवा मग एखादा कलाकार / अभिनेता असू शकतो किंवा मग एखादा चांगला निवेदक असू शकतो किंवा मग एखादा चांगला अभिनेता असू शकतो आणि काहीच नाही तर एखादा चांगला श्रोता असू शकतो. चला तर मग थोडा प्रयत्न करूया आपल्यातला खरा कलाकार ओळखण्याचा. मग बघा आयुष्य कसे मजेदार होईल. मला सिंगापूर मध्ये माझा मित्र परिवार आणि महाराष्ट्र मंडळ यांच्या सहवासात खूप काही चांगल्या गोष्टी अनुभवता आल्या आणि आजही अनुभवत आहे. त्याचे प्रतीत म्हणजे माझे हे पुस्तक. असा हा माझा वेगळाप्रवास कदाचित तुम्हाला एक वेगळी दिशा देण्यासाठी मदत करेल या आशेने आपली रजा घेतो.

थोडक्यात काय तर ! काही चांगले विचार, चांगली सोबत...लेखनकार,कविताकार, विचारवंत यांच्याबरोबरच केलेला प्रवास आणि त्या प्रवासात झालेले परिचय..एक अनुभूती असल्याचा सुखद धक्का, अनुभव व नेहमी दर्जेदार काम करण्याची प्रेरणा देवून गेले व अजूनही प्रेरित करतात. माझ्या ह्या प्रवासात मी काही गोष्टी आत्मसात केल्या आहेत. त्याचा सारांश म्हणून मी लिहिलेल्या दोन कवितांचा संग्रह पुढे देत आहे. मला नक्की विश्वास आहे की त्या तुम्हाला नक्कीच आवडतील.

**## शब्धागंधा २००८ ##**

**॥ नाद ॥**

काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद

धड़ त्याला समजत नाही, समजवाताही येत नाही
त्याला चांगले कधी उमगेल का ?
आयुष्यात तो कही करू शकेल का ? ॥ १ ॥

काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद

बंडयाचे कोड आम्हाला नाही सुटत
शाळेत बंडयाला गणित मात्र नाही जमत
नियमित घरी करतो गृहपाठ
पण तरीही परिक्षेत मात्र भूईसपाट
त्याला वाचनाचा नाद लई भारी
का ? कुणास ठावुक ? लिहिताना होई दैना भारी ॥ २ ॥
काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद

बंडया ! करी थोराचा खुप आदर
काही सांगितले की दाखवतो लगेच दादर
प्रत्येकाच्या आयुष्यात असावा काहीतरी ध्यास
पण ह्याला नको मात्र कडिचाही त्रास ॥ ३ ॥

काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद

त्यालाही आयुष्यात काहीतरी करायचे आहे
पण त्याला विचार फक्त एकच
न कही करता वर कसं यायचं ॥ ४ ॥

काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद

गुरूजी म्हणतात मुलगा शाळेत कंटाळी
आई सांगते बंडया ! आता तरी तू हे टाळी
शेजारचे म्हणतात तुमचा बंडया फार अवकळ
बंडया म्हणतो ये काकू करू नको कळकळ
बंडयाला हौस भारी स्वप्न बघयाची
झोपेतून उठल्यावर रडत बसयाची ॥ ५ ॥

काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद
बाबांनी ठराविले भेटायचे त्याचा सवंगडे
भेटल्यावर कळालें सगळेच विचारंचे लंगडे
बंडया म्हणतो डोंट वरी मी होईन अँक्ट्र्र
काका म्हणतात बंडया आमचा खुप चप्टर ॥ ६ ॥

काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद
बंडयासाठी आई-बाबा खुप परेशान
बंडया म्हणतो मी राखींन तुमची शान
बंडयाला वाटते आयुष्यात मारायची आहे भरारी
जर नाही जमले तर चलावायची गाड़ी फरारी ॥ ७ ॥
काय तो बंडया अणि काय त्याचा नाद
त्यावरुन घरात होतात नेहमीच वाद



# कविता : !! मन !!

.....................

**माणूस....मन**

राहिले नुसते तन बघाय बघाय
त्याला नाही तनाची सावली
राखी तो साथ आपली पावलो पावली
मन नुसतं बघाय....

.....................

**फुलपाखरू....मन**

जेव्हा मन झाले फुलपाखरू
वाटे तेव्हा त्याला चल जग भरारू
पण त्याला नाही स्वत:च गंध
पण लोका वाटे हाच त्याचा छंद

.....................

**वाहन .......मन**

मन झाले वाहन त्याचे काम वाहक
जेव्हा ! जेव्हा ! होतो उशीर
तेव्हा ! तेव्हा ! वाटतो काय त्रास हा नाहक

.....................

**काय....मन**

मन जेव्हा करते काय ! काय !
म्हणती लोक लाघो त्याला हाय

.....................

**परंतु ....मन**

सगळे आज कसे सांगू ?
तरी सुद्धा मन नेहमी आतुर
मन काही वेळा असते चिंतातूर
परंतु ...होतात त्याला वेदना पाहून
कारण नाही त्याला हे जीवन...!

.....................

त्याला नाही तनाची सावली
त्याला नाही पाखराचा छंद
नाही त्याला वाहनाची वाहकता
नाही त्याला स्वत: चे असे अस्तित्व
त्याला नाही मूर्ती किंवा कीर्ती
एक निरागस गोंडस बालक
अहो ! तोच खरा मालक

.....................

**प्रवास ७ : भटकंतीचा प्रवास**
नेचर पार्क, गड-किल्ले, आणि पर्यटन स्थळे

आतापर्यंत तुम्ही माझे अनेक प्रवास वाचलेत त्याबद्दल आपणा सगळ्यांचे आभार परंतु आता आपण जो प्रवास करणार आहोत तो कदाचित माझ्याप्रमाणे तुमचा सुद्धा आवडता प्रवास असू शकेल. भटकंती - नेमकी आहे तरी काय ?

मुळात हा प्रवास लिहिण्याचा जेव्हा विचार केला तेव्हा भटकंती...ही माझ्यासाठी फक्त एक संकल्पना होती परंतु जसे जसे ह्या विषयाचे आकलन होत गेले तेव्हा जाणवले ही फक्त संकल्पना नसून एक अनुभूती आहे. कदाचित हे वेगळेपणच मला ह्या विषयावर लिहिण्यास प्रेरणा देवून गेले.

हा प्रकार आवडीने करणारे प्रवासी ही भटकंती प्रामुख्याने पावसाळ्यात अनुभवतात. तर काहीजण आपल्या प्रवासाच्या प्रेमापोटी भटकत राहतात आणि आयुष्याच्या प्रवासाचा आनंद लुटतात. पावसाळा सुरू झाला की प्रत्येकालाच निसर्ग सहलीचे वेध लागतात, डोंगरदऱ्यांच्या कपाऱ्यांतून वाट काढत उंचावरून कोसळणारे फेसाळते धबधबे, सह्याद्रीच्या उंचच उंच डोंगररांगा, हिलस्टेशन्स, गड-किल्ले हे आकर्षणाचे केंद्रबिंदू असतात. अशा ढगाळ, मस्त, थंड, पावसाळी वातावरणात भटकायला जाणं, हिरवाईने पांघरलेल्या डोंगरांवर हिंडणं, धबधब्याखाली मनसोक्त भिजणं, भिजून झाल्यावर जवळच्या टपरीवर गरमागरम भजी आणि चहावर ताव मारणं, दाट धुक्यात स्वतःला हरवून देणं आणि असे अनेक अनुभव घेण्यासाठी अगदी लहानांपासून ते थोरांपर्यंत ही मंडळी आसुसलेली असतात.

मी स्वतः आयुष्यात खूप छंद केले, जोपासले आणि ते छंद पूर्ण करण्यासाठी जगलो सुद्धा. मग क्रिकेट खेळणे असो किंवा मग माझे क्रिकेटचे संग्रह असोत किंवा मग लेखन -वाचन असोत किंवा मग उनाड बालप्रमाणे हुंदडणे असो किंवा मग निवांत भटकणे असो. त्यातील काही छंद असे आहेत ते आयुष्यभर पुरणारे आहेत. त्यातील प्रामुख्याने भटकंतीचा प्रवास एक वेगळा आहे. खूप ठिकाणी फिरलो देशी-विदेशी प्रवास केले पण त्यातून महाराष्ट्रातील भटकंती फार सुंदर होत्या, आहेत आणि कायमच राहतील. आज असेच आपणासमोर भटकंतीचे काही प्रसंग, प्रवास वर्णन आपणा वाचकांसाठी घेऊन येत आहे. त्यात मग ओल्या चिंब पावसात मित्र-परिवाराबरोबर गिर्यारोहण असो किंवा मग गड-किल्ले भटकणे असो किंवा मग जंगल सफारी असोत किंवा मग पावसात भिजत मोटारसायकल वरून केलेली माळशेज घाटाची सैर असो...अशा बऱ्याच भटकंतीचे अनुभव आहेत ते थोडक्यात आपणासाठी सादर करीत आहोत. माझा भटकणे हा छंद फार जुना आहे, त्यामुळे एखादे वेगळे गडाची भेट असो किंवा मग शुभ्र सकाळची ट्रेक असो.

**भटकंती प्रवास १: ब्रॅडल नेचर पार्क (Braddell Nature Park)**

मी २००६ साली जेव्हा सिंगापूरला पोहचलो तेव्हा तेथील लोकांमध्ये असे विचार होते तो की सिंगापूर मधील आयुष्य काही प्रमाणात कृत्रिम (मेकॅनिकल) पद्धतीचे आहे. तेव्हा मनात ठरविले होते काहीही असो आपण येथे

राहून आपले आयुष्य आपल्या पद्धतीने जगायचे जसे आपण भारतात असताना जगायचो. मग काय मौज-मस्ती, फिरणे, क्रिकेट खेळणे सर्व काही चालू होते. तसेच तिथे केलेल्या काही खास भटकंतीपैकी एक भटकंती आपणासमोर सादर करीत आहे.

माझ्या मनात सिंगापूर मधील २००७ ची ती सकाळ अजूनही आठवणीत ताजी आहे. आमचा मित्र-परिवार ब्रॅडल नेचर पार्क (Braddell Nature Park) येथे ट्रेकिंग साठी निघालो होतो. त्या प्रवासाबद्दल थोडक्यात जाणून घेऊया. सकाळी ८:३० वाजता, मी, आशिष पाटील, शशी, अल्विन व कमल होते आणि प्रत्येकाची स्वतंत्र बॅग प्रत्येकाच्या पाठीवर अडकवलेली. इथे प्रत्येकाची जबाबदारी ठरलेली होती जसे **अल्विन** (ट्रेकिंग टीम लीड), **मी** (प्रवास सादरीकरण), **कमल** (सह प्रवासी), **शशी** आणि **आशिष** (छायां-चित्रणकार) अशी पक्की टीम तयार करून सगळे सज्ज होतो.



















आमचा प्रवास सकाळी ८:३० वाजता शून्य कि. लो. लाईन पासून सुरू झाला. चला तर आपण थोडे फोटो पाहूया



या प्रवासाचे (आभार शशी आणि आशिष). हे नैसर्गिक पार्क हिरव्यागार डोंगरात दडलेले, सभोवताली जलमय सौंदर्य असे हे ठिकाण जेथे लोक ट्रेकिंग ची मजा घेण्यासाठी जमतात. माझ्या मते सिंगापूरमधील सर्वात सुंदर नैसर्गिक स्थळ... म्हणूनच कदाचित सिंगापूर ला **युनिकली सिंगापूर** म्हंटले जात असावे. इथे सर्व काही युनिक आहे. मस्त ताजेतवाने असल्याने सुरुवात दाट जंगलातून भराभर चालत वाट काढत झाली, काही लोक धावण्याचा आनंद घेत होते. ह्या पार्कची

सगळयात लक्षणीय गोष्ट म्हणजे त्याचा परिसर आणि जपलेला नीट-नेटकेपणा. सुबक रचना जसे परिसर, नदीच्या वर हलता पूल, आणि त्यावरून जातानाचा अनुभव मला माझ्या २ वर्षा पूर्वीच्या हरिद्वार-हृषीकेश येथील राम व लक्ष्मण झुला ठिकाणी घेऊन गेला. सकाळी सुरू झालेला भटकंती चा प्रवास ११ कि. लो. चालल्या नंतर संपला आणि शहराच्या दुसऱ्या टोकाला निघाला. संपूर्ण ट्रेकिंग मध्ये पालापाचोळा चालत, हातात असलेली काठी टेकवत, गप्पा-टप्पा मारत हा प्रवास संपला. मग जंगल दर्शन पूर्ण झाल्यावर लिटिल इंडिया येथील एका दाक्षिणात्य हॉटेलात चहा नास्ता करून संपला.















परंतु मी एक सांगेन ट्रेकिंग हा असा विषय आहे तिथे मग सिंगापूर असो किंवा मग दुसरे कोणतेही ठिकाण, ह्या भटांकंती खूप वेगळ्या असतात. हा प्रकार इतका मजेशीर आहे त्याला ठिकाण महत्वाचे नाही परंतु तुमच्याबरोबर असणारे खूप महत्वाचे असतात. अशी ही नेचर पार्कची भटकंती आपण पाहिली आता आपण अजून मन-मोहून टाकणाऱ्या भटकंती पाहणार आहोत.

खरे सांगायचे तर ह्या नंतर बरेच दिवस गेले एखादी मनाला मोहून टाकणारी भटकंती करण्यासाठी, खूप-खूप भटकलो. कधी पावसात, कधी माळरानात तर कधी जंगलात परंतु माझ्या आयुष्यातील रायगड भटकंती खूपच वेगळी होती आणि तेथे गेल्यावर जाणवले आपण खूप काही हरवले होते ते ह्या भटकंतीने मिळाले. खरे सांगायचे तर बरीच वर्ष निघून गेली माझ्या **टेकनिकल रायटिंग** मध्ये आणि खूप काय लिहायचे राहून गेले होते, आज मला ते संपूर्णपणे साध्य झाल्याचे जाणवत आहे. मनात विचार आला गेलेल्या वेळचा विचार करत बसण्यापेक्षा, भरून काढण्यासाठी वेळ देऊया....आणि मग प्रवास चालू झाला आणी अजुनहि चालु आहे.

**भटकंती प्रवास २ : रायगडाची भटकंती - शिवछत्रपती दर्शनासाठी**


आज तो १३ मे २०१७ चा दिवस उजाडला तो दिवस म्हणजे आमची रायगड वारी करण्याचा योग आला. चला तर मग छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या चरणी नत मस्तक होऊन श्री गणेश करूया. मी सध्या शिवाजी राजे यांच्यावर एक "माहितीपट" करीत आहे, माझ्या मनात एक कल्पना आली आणि मग विचार केला चला सुरुवात करूया. ह्या विचारातून, माझ्या भावना माझ्या मित्रांना सांगितल्या आणि आमची रायगड वारी करायचे ठरले.

माझे सगळे मित्र बऱ्याच वेळा रायगडावर जावून आले परंतु मी कधीच गेलो नव्हतो, त्यामुळे प्रचंड उत्सुकता होती. दि. १३ मे २०१७, सकाळी ६.४० वाजता आम्ही सगळे सेक्टर ८/अ, ऐरोली, नवी मुंबई येथे जमलो आणि सगळे जमा होता होता आणि मग चहा नास्ता सगळे उरकताना ७.३० वाजले असतील. नंतर गाडीतून हा प्रवास सुरु झाला आमच्या मित्र परिवामधील सगळेच एकदा तरी जावून आले होते, पण मी पहिल्यांदाच जाणार होतो. ही **रायगडची वारी** मी भटकंती म्हणणार नाही, पण एकुनच ती खास होती कारण कारणही तसे खास होते. आम्ही सगळे रायगडावर शिवरायाच्या चरणी नतमस्तक होवून धन्य झालो.....निमित्त होते **माझ्या राजा रे** च्या एका लघु माहितीपटासाठी.

प्रवास तसा साधा सरळ गाडीने करीत होता सौजन्य श्री. सुयोग थळी, पण ह्या प्रवासात माणगाव रेल्वे स्थानक ते माणगाव एस टी डेपो ४ तास लागले तुम्हाला काय सांगणार ? काय भावना होत्या त्यावेळी. पण म्हणतात ना चांगले काम करायचे तर थोडा त्रास घ्यावाच लागतो. ह्या प्रवासाचा मला महाराजांवर माहितीपट बनवताना खूप मदत झाली. रायगड दर्शन करण्यासाठी प्रवासाची सुरुवात झाली ती, पाचाड येथे राजमाता जिजाऊ याच्या समाधीला वंदन करून आम्ही आमच्या प्रवासाला निघालो. आमच्या टीमची म्हणजे **शुभम एंटरटेनमेंट आणि मानस मुव्हीज** चा हा दुसरा लघुपट होता. सुरुवात झाली होती त्यामुळे सगळे कसे प्रफुल्लीत होते, काही तरी वेगळे करायला मिळणार या उद्देशाने. पाचाड येथून निघाल्यानंतर गडाच्या पायथ्याला पोहचता पोहचता दुपारचे २.०० वाजले होते. जेवणाची वेळ निघून चालली होती आणि गडावर चालत पोहचायचे होते. द्विधा मनस्थितीत आम्ही संदीप घरगुती खानावळ येथे दुपारच्या जेवणासाठी थांबलो. जेवण लवकर उरकले आणि मग अंदाजे दुपारी ३.१५ वाजता गडाच्या खाली आमची गाडी पार्क केली.







रायगड
टकमक
महादरवाजा
पालखी दरवाजा
नाना दरवाजा
वाडी
धर्मशाळा
हत्ती तलाव
गंगासागर तलाव
राणी वसा
तलाव
हिरकणीचा बुरूज
मेणा दरवाजा
सिंहासन
नगारखाना
बाजारपेठ
होळीचा माळ
कुशावर्त तलाव
महादेव मंदिर
वाघ दरवाजा
ब्राह्मणवाडा
ब्राह्मण तलाव
जगदीश्वर मंदिर
टाके
TreKshitiZ.com

तडक तेथून सरळ केबल रोपवेने गडावर बरोबर ४.०० वाजले पोहचायला. तेथून पुढे जे झाले ते शब्दात सांगणे कठीण आहे कारण त्या भावनाच वेगळ्या होत्या. कारण महाराष्ट्राच्या आराध्य देवाला, त्यांच्या पराक्रमाला पाहण्याची संधी खरंच भाग्यवंताला मिळते. कदाचित मी सुद्धा त्यापैकी एक असू शकतो. आता थोडक्यात रायगड किल्लाची माहिती घेवूया. किल्ले रायगड हा महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांत असून समुद्रसपाटीपासून सुमारे ८२० मीटर (२७०० फूट) उंचीवर आहे. गडावर पोहचायला जवळ-जवळ १४०० ते १४५० पायऱ्या आहेत. महाराष्ट्राची अस्मिता आणि जागतिक कीर्तीच्या राजापैकी एक असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची राजधानी म्हणून रायगड किल्ला हेरला होता. मराठी साम्राज्याच्या इतिहासामध्ये त्याची एक खास ओळख आहे. छत्रपती शिवाजीराजांनी रायगडचे स्थान आणि महत्त्व पाहून १७ व्या शतकात रायगडाला आपल्या राज्याची राजधानी बनविली. शिवराज्याभिषेक याच ठिकाणी झाला होता. नंतर शिवाजी महाराज्यांच्या पश्च्यात इंग्रजांनी गड कब्जात घेतल्यानंतर लुटून त्याची नासधूस केली.

शिवराज्याभिषेक हा रायगडाने अनुभवलेला सर्वश्रेष्ठ प्रसंग आहे. महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक लक्षणीय घटना आहे. १९ मे १६७४ रोजी राज्याभिषेकाच्या विधी पूर्वी महाराजांनी प्रतापगडाच्या भवानीचे दर्शन घेतले. तीन मण सोन्याचे म्हणजेच ५६ हजार किंमतीचे छत्र देवीला अर्पण केले. गडावरील राज सभेत ६ जून १६७४, ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६, शनिवार या दिवशी राज्याभिषेक साजरा झाला. २४ सप्टेंबर १६७४, ललिता पंचमी आश्विन शुद्ध ५, आनंद संवत्सर शके १५९६ या दिवशी तांत्रिक पद्धतीने राजांनी स्वतःला आणखी एक राज्याभिषेक करून घेतला. या मागचा खरा हेतू हा जास्तीत जास्त लोकांना समाधान वाटावे हा होता. हा राज्याभिषेक निश्चलपुरी गोसावी याच्या हस्ते पार पडला.

**गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :** खास आपणासाठी संग्रहित केलेल्या माहितीचा तपशील खालील प्रमाणे. यातील तिथी, तारखा यात जर काही असाम्यता आढळ्यास क्षमस्व. कदाचित यातील काही ठिकाणाचा इतिहासाशी कितपत संबध आहे यांची आम्हाला सुद्धा कल्पना नाही. परंतु रायगड भेट आणि वाचनात आलेली ही ठिकाणे.

**१. पाचाडचा जिजाबाईंचा वाडा** : उतारवयात जिजाबाईंना गडावरची थंड हवा, वारा मानवत नसे, म्हणून महाराजांनी त्यांच्यासाठी पाचाडजवळच एक वाडा बांधून दिला. तोच हा मासाहेबांचा राहता वाडा. वाड्याची व्यवस्था ठेवण्यासाठी काही अधिकारी तसेच शिपायांची व्यवस्थाही महाराजांनी केली होती. पायऱ्यांची एक उत्तम विहीर, तसेच जिजाबाईंना बसण्यासाठी केलेले दगडी आसन बघण्यासारखे आहे. यास 'तक्क्याची विहीर' असेही म्हणतात.

**२. खुबलढा बुरूज** : गड चढू लागले म्हणजे एक बुरुजाचे ठिकाण दिसते, तोच हा सुप्रसिद्ध खुबलढा बुरूज. बुरुजाशेजारी एक दरवाजा होता, त्यास 'चित् दरवाजा' म्हणत पण हा दरवाजा आता पूर्णपणे उध्वस्त झाला आहे.

**३. नाना दरवाजा** : या दरवाजास **नाणे दरवाजा** असेही म्हणत. नाना दरवाजा याचाच अर्थ लहान दरवाजा. इ.स. १६७४ च्या मे महिन्यात राज्याभिषेकाच्या निमित्ताने इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झेंडन याच दरवाजाने आला होता. या दरवाज्यास दोन कमानी आहेत. दरवाज्याच्या आतील बाजूस पहारेकऱ्यांसाठी दोन लहान खोल्या आहेत. त्यांस **देवडा** म्हणतात. दरवाजास अडसर घालण्यासाठी खोबणी दिसतात.

**४. मदारमोर्चा किंवा मशीदमोर्चा** : चित् दरवाज्याने गेल्यावर नागमोडी वळणे घेत गेलेल्या रस्त्याने पुढे गेल्यावर एक सपाटी लागते. या मोकळ्या जागेत टोकाशी दोन पडक्या इमारती दिसतात. त्यापैकी एक पहारेकऱ्यांची जागा असून दुसरे धान्याचे कोठार आहे. येथे मदनशहा नावाच्या साधूचे थडगे आहे. तेथे एक प्रचंड तोफही दिसते. येथून पुढे गेल्यावर खडकात खोदलेल्या तीन गुहा दिसतात.

**५. महादरवाजा** : महादरवाज्याच्या बाहेरील अंगास वर दोन्ही बाजूस दोन सुंदर कमळाकृती कोरल्या आहेत. दरवाज्यावर असणाऱ्या या दोन कमळांचा अर्थ म्हणजे किल्ल्याच्या आत 'श्री आणि सरस्वती' नांदत आहे. 'श्री आणि सरस्वती' म्हणजेच 'विद्या व लक्ष्मी' होय. महादरवाज्याला दोन भव्य बुरूज असून एक ७५ फूट तर दुसरा ६५ फूट उंच आहे. तटबंदीमध्ये जी उतरती भोके ठेवलेली असतात त्यास 'जंग्या' म्हणतात. शत्रूवर मारा करण्यासाठी ही भोके ठेवलेली असतात. बुरुजांमधील दरवाजा हा वायव्य दिशेस तोंड करून उभा आहे. महादरवाज्यातून आत आल्यावर पहारेकऱ्यांच्या देवड्या दिसतात तसेच संरक्षकांसाठी केलेल्या राहण्याच्या खोल्या दिसतात. महादरवाज्यापासून उजवीकडे टकमक टोकापर्यंत तर डावीकडे हिरकणी टोकापर्यंत तटबंदी बांधलेली आहे.

**६. चोरदिंडी** : महादरवाज्यापासून उजवीकडे टकमक टोकापर्यंत जी तटबंदी जाते, त्यावरून चालत गेल्यास जिथे ही तटबंदी संपते, त्याच्या थोडे अलीकडे बुरुजात ही चोरदिंडी बांधलेली आहे. बुरुजाच्या आतून दरवाजापर्यंत येण्यासाठी पायऱ्या आहेत.

**७. हत्ती तलाव** : महादरवाज्यातून थोडे पुढे आल्यावर जो तलाव दिसतो तो हत्ती तलाव. गजशाळेतून येणाऱ्या हत्तींच्या स्नानासाठी आणि पिण्यासाठी या तलावाचा उपयोग होत होता.

**८. गंगासागर तलाव** : हत्तीतलावापासून जवळच रायगड जिल्हा परिषदेच्या धर्मशाळेच्या इमारती दिसतात. धर्मशाळेपासून दक्षिणेकडे अंदाजे ५० -६० पावले चालत गेल्यास जो तलाव लागतो तो गंगासागर तलाव. महाराज्यांच्या राज्याभिषेकानंतर सप्तसागर व महानांनी आणलेली तीर्थे याच तलावात टाकली गेली. म्हणूनच याचे गंगासागर असे नाव पडले. शिवाजी महाराज्याच्या काळात शिवबंदीसाठी याचे पाणी वापरण्यात येई.

**९. स्तंभ** : गंगासागराच्या दक्षिणेस दोन उंच मनोरे दिसतात. त्यांना स्तंभ म्हणतात. जगदीश्वराच्या शिलालेखामध्ये ज्या स्तंभांचा उल्लेख केला आहे, ते हेच असावेत. ते पूर्वी पाच मजले होते असे म्हणतात. ते द्वादश कोनी असून बांधकामात नक्षीकाम आढळते.

**१०. पालखी दरवाजा** : स्तंभांच्या पश्चिमेस भिंत असलेल्या भागातून ३१ पायऱ्या बांधलेल्या दिसतात. त्या चढून गेल्यावर जो दरवाजा लागतो तो पालखी दरवाजा. या दरवाज्यातून बालेकिल्ल्यात प्रवेश करता येतो.

**११. मेणा दरवाजा** : पालखी दरवाज्याने वर प्रवेश केला की, चढउतार असलेला एक सरळ मार्ग आपल्याला मेणा दरवाजापर्यंत घेऊन जातो. उजव्या हातास जे सात अवशेष दिसतात ते आहेत राण्यांचे महाल. मेणा दरवाज्यातून बालेकिल्ल्यावर प्रवेश करता येतो.

**१२. राजभवन** : राणी महालाच्या समोर डाव्या हातास दासदासींच्या मकानांचे अवशेष दिसतात. या अवशेषांच्या मागे दुसरी जी समांतर भिंत आहे त्या भिंतीच्या मध्यभागी जो दरवाजा आहे तेथून बालेकिल्ल्याच्या अंतर्भागात प्रवेश केला की जो प्रशस्त चौथरा लागतो तेच हे महाराजांचे राजभवन. राजभवनाचा चौथारा ८६ फूट लांब व ३३ फूट रुंद आहे.

**१३. रत्नशाळा** : राज प्रासादाजवळील स्तंभांच्या पूर्वेकडे असलेल्या मोकळ्या जागेत एक तळघर आहे, तीच ही रत्नशाळा. हा खलबतखाना म्हणजेच गुप्त बोलणी करण्यासाठी केलेली खोली असावी असेही म्हणतात.

**१४. राजसभा** : महाराजांचा राज्याभिषेक जेथे झाला, तीच ही राजसभा. राजसभा २२० फूट लांब व १२४ फूट रुंद आहे. येथेच पूर्वेकडे तोंड केलेली सिंहासनाची जागा आहे. येथे बत्तीस मणांचे सोन्याचे सिंहासन होते. सभासद बखर म्हणते, 'तख्त सुवर्णाचे बत्तीस मणांचे सिद्ध करवले, नवरत्ने अमोलिक जितकी कोशात होती, त्यामध्ये शोध करून मोठी मोलाची रत्ने जडाव केली.'

**१५. नगारखाना** : सिंहासनाच्या समोर जे भव्य प्रवेशद्वार दिसते तोच हा नगारखाना. हे बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे. नगारखान्यातून पायऱ्या चढून वर गेले की माणूस किल्ल्यावरील सर्वाधिक उंचीवर असतो.


**१६. बाजारपेठ** : नगारखान्याकडून डावीकडे उतरून आले की, समोर जी मोकळी जागा दिसते तो **होळीचा माळ**. तेथेच आता शिवछत्रपतींचा भव्य पुतळा बसवलेला आहे. पुतळ्यासमोर जे दोन रांगांमध्ये भव्य अवशेष दिसतात तीच शिवाजीच्या काळातील बाजारपेठ. पेठेच्या दोन रांगात प्रत्येकी २२ दुकाने आहेत. दोन रांगांमधून जवळजवळ चाळीस फूट रुंदीचा रस्ता आहे.

**१७. शिरकाई देऊळ** : महाराजांच्या पुतळ्याच्या डाव्या बाजूस जे छोटे देऊळ दिसते ते शिरकाईचे देऊळ. शिरकाई ही गडावरील मुख्य देवता. शिर्के पाचव्या शतकापासून रायगडाचे स्वामी होते. याची आठवण देणारी गडस्वमिनी शिरकाई हिचे मंदिर गडावर आहे. लोकमान्य टिळकांच्या काळात मावळंकर नावाच्या इंजिनिअराने हे मंदिर बांधले आहे. ते शिरकाईचे मूळ मंदिर नाही. मूर्ती मात्र प्राचीन आहे. मूळ शिरकाई मंदिर राजवाड्यास लागून डावीकडे होळी माळावर होते. तेथे मूळ देवळाचा चबुतरा अजूनही आहे. ब्रिटिश काळात तेथे शिरकाईचा घरटा हा नामफलक होता.

**१८. जगदीश्वर मंदिर** : बाजारपेठेच्या खालच्या बाजूस पूर्वेकडील उतारावर ब्राह्मणवस्ती, ब्राह्मणतळे वगैरे अवशेष दिसतात. तेथूनच समोर जे भव्य मंदिर दिसते तेच महादेवाचे म्हणजे जगदीश्वराचे मंदिर. मंदिरासमोर

नंदीची भव्य आणि सुबक मूर्ती आहे. पण सध्या ही मूर्ती भग्नावस्थेत आहे. मंदिरात प्रवेश केला की भव्य सभामंडप लागतो. मंडपाच्या मध्यभागी भव्य कासव आहे. गाभाऱ्याच्या भिंतीस हनुमंताची भव्य मूर्ती दिसते. मंदिराच्या





प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांच्या खाली एक लहानसा शिलालेख दिसतो. तो पुढीलप्रमाणे, **सेवेचे ठायी तत्पर हिरोजी इंदुळकर** या दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतीवर एक सुंदर शिलालेख दिसतो.

तो पुढीलप्रमाणे - ***श्री गणपतये नमः। प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानंददोनुज्ञया श्रीमच्छत्रपतेः शिवस्यनृपतेः सिंहासने तिष्ठतः। शाके षण्णवबाणभूमिगणनादानन्दसंवत्सरे ज्योतीराजमुहूर्तकिर्तीमहिते शुक्लेशसापै तिथौ ॥१॥ वापीकूपडागराजिरुचिरं रम्यं वनं वीतिकौ स्तभैः कुंभिगृहे नरेन्द्रसदनैरभ्रंलिहे मीहिते । श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंभते ॥२॥***

याचा थोडक्यात अर्थ पुढीलप्रमाणे -’सर्व जगाला आनंददायी असा हा जगदीश्वराचा प्रासाद श्रीमद् छत्रपती शिवाजी राजां यांच्या आज्ञेने शके १५९६ मध्ये आनंदनाम संवत्सर चालू असताना सुमुहुर्तावर निर्माण केला. या रायगडावर हिरोजी नावाच्या शिल्पकाराने विहिरी, तळी, बागा, रस्ते, स्तंभ, गजशाळा, राजगृहे आशांची उभारणी केली आहे. ती चंद्रसूर्य असे तोवर खुशाल नांदो.

**१९. महाराजांची समाधी** : मंदिराच्या पूर्वदरवाजापासून थोडा अंतरावर जो अष्टकोनी चौथरा दिसतो तीच महाराजांची समाधी. सभासद बखर म्हणते, **क्षत्रियकुलावतंस श्रीमंत महाराजाधिराज शिवाजी महाराज छत्रपती** यांचा काल शके १६०२ चैत्र शुद्ध १५ या दिवशी रायगड येथे झाला. देहाचे सार्थक त्याणी बांधिलेला जगदीश्वराचा

जो प्रासाद त्याच्या महाद्वाराच्या बाहेर दक्षणीभागी केले. तेथे काळ्या दगडाच्या चिऱ्याचे सुमारे छातीभर उंचीचे अष्टकोनी जोते बांधिले असून वरून फरसबंदी केलेली आहे. फरसबंदीच्या खाली पोकळी आहे, तीत महाराजांचा अवशिष्टांश रक्षामिश्र मृत्तिकारूपाने सापडतो.' दहनभूमी पलीकडे भग्न इमारतींच्या अवशेषांची एक रांग आहे, ते शिबंदीचे निवासस्थान असावे. त्याच्या पलीकडे सदर वस्तीपासून विलग असा एक घराचा चौथरा दिसतो. हे घर इ.स. १६७४ मध्ये इंग्रज वकील हेनरी ऑक्झेंडन यास राहावयास दिले होते. महाराजांच्या समाधीच्या पूर्वेकडे भवानी टोक आहे तर उजवीकडे दारूची कोठारे, बारा टाकी दिसतात.

**२०. कुशावर्त तलाव** : होळीचा माळ डाव्या हातास सोडून उजवीकडील वाट कुशावर्त तलावाकडे जाते. तलावाजवळ महादेवाचे छोटेसे देऊळ दिसते. देवळासमोर फुटलेल्या अवस्थेतला नंदी दिसतो.

**२१. वाघदरवाजा** : कुशावर्त तलावाजवळून घळीने उतरत वाघ दरवाजाकडे जाता येते. आज्ञापत्रात लिहिले आहे की, 'किल्ल्यास एक दरवाजा थोर आयब आहे, यांकरीता गड पाहून एक दोन - तीन दरवाजे, तशाच चोरदिंडा करून ठेवाव्या. त्यामध्ये हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंडा चिणून टाकाव्या.' हे दूरदर्शीपणाचे धोरण ठेऊनच महाराजांनी महादरवाजाशिवाय हा दरवाजा बांधून घेतला. या दरवाज्याने वर येणे जवळजवळ अशक्यच असले तरी दोर लावून खाली उतरू शकतो. पुढे राजाराम महाराज व त्यांची मंडळी झुल्फिरखानाचा वेढा फोडून याच दरवाज्याने निसटली होती.

**२२. टकमक टोक** : बाजारपेठेच्या समोरील टेपावरून खाली उतरून टकमक टोकाकडे जाता येते. तेथेच एका दारूच्या कोठाराचे अवशेष दिसतात. जसजसे टोकाकडे जावे तसतसा रस्ता निमुळता होत जातो. उजव्या हाताला सरळ तुटलेला २६०० फूट खोल कडा आहे.

टोकावर वारा प्रचंड असतो व जागाही कमी असल्यामुळे गोंधळ न करता सावधानता बाळगावी लागते.पेशवे राज्यकाळात या ठिकाणावरून गुन्हेगारांचा कडेलोट केला जाई.

**२३. हिरकणी टोक** : गंगासागराच्या उजवीकडे पश्चिमेस जी चिंचोळी वाट जाते ती हिरकणी टोकाकडे जाते. हिरकणी टोकाशी संबंधित हिरकणी गवळणीची एक कथा सांगितली जाते. या बुरुजावर काही तोफाही ठेवलेल्या दिसतात. बुरुजावर उभे राहिले तर डाव्या हाताला गांधारीचे खोरे, उजव्या बाजूला काळ नदीचे खोरे दिसते.

तसेच इथून पाचाड, खुबलढा बुरूज, मशीद मोर्चा ही ठिकाणे तोफेच्या माऱ्यात आहेत. त्यामुळे युद्धशास्त्राच्या तसेच लढाऊ दृष्टीने ही खूप महत्त्वाची आणि मोक्याची जागा आहे.

**२४. वाघ्या कुत्राची समाधी** : इतिहासात असे म्हटले जाते की शिवाजी महाराजाचा अत्यसंस्कार चालू होता तेव्हा शिवाजीच्या वाघ्या नावाचा कुत्र्याने त्या आगीत उडी घेतली.

अशा विविधता असलेल्या रायगडचे काही खास फोटो तुमच्यासाठी सादर करीत आहे. हे फोटो मी स्वतः काढलेले आहेत. ही भटकंती आणि त्यातून मिळालेला आनंद काही वेगळाच होता. रायगडचे रचनात्मक फोटो काढण्याचे भाग्य उशिरा मिळाले कदाचित, पण सुरुवात तर झाली आणि मग पुढे जे घडले तुम्ही वाचणार आहात.

# रायगडाचे फोटो..माझ्या कॅमेऱ्यातून



रायगड किल्ल्यावरील वाड्यांचे अवशेष



रायगड किल्ल्यावरील राणी महाल



धान्यांचे कोठार



गडावरून दिसणारा एक बुरूज



रायगडावरील महाराज्याचे राजसभा सिंहासन



दरबारातील एक प्रवेशद्वार



बाजारपेठेतील महाराजांचे सिंहासन स्थान




रायगड बाजारपेठ



जगदीश्वर मंदिर , रायगड



वाघ्या कुत्र्याची समाधी



टकमक टोक

ह्या रायगडावर आम्ही काही काढलेले फोटो तुमच्साठी सादर केले आहेत. त्याबरोबर काही व्हिडीओ सुद्धा बनवले कारण निमित्त होते एक लघुपटाचे !

**माझ्या राजे रे :** ह्या प्रवासादरम्यान मी अनुभवलेल्या काही गोष्टी आणि आजकालची परिस्थिती खूप ठळक पणे जाणवते आणि तेच वास्तववादी सत्य आहे. ह्यात मी माझ्या मित्र-परिवार सोबत केलेल्या प्रवासाचे सार्थक झाल्या सारखे मला जाणीव झाली. हा लघुपट बनवताना आमच्या टीमच्या सगळ्या भटकंतीचे संग्रहित करून वापरून बनवला आहे आणि तुम्हाला तो नक्की आवडेल. हा लघुपट तुम्ही युट्यूब वर पाहू शकता.




थोडक्यात काय तर ! तुम्ही जेव्हा एखाद्या ध्येयाने झपाटलेले असता तेव्हा ध्येय पूर्तीसाठी चांगली टीम आणि त्यांचे मोलाचे सहकार्य तुम्हाला समाधान देवून जातात...ते आठवणींचे क्षण. मला माझ्या " **शुभम एंटरटेनमेंट आणि मानस मुव्हीज "** टीम चे कौतुक वाटते. मला माझ्या ह्या भटकंतीने माझे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ह्यांची खूप मदत झाली. पुन्हा एकदा टीमचे आभार आणि तुम्हाला माझा हा भटकंतीचा प्रवास नक्कीच आवडला असेल अशी आशा करतो.

**भटकंती प्रवास ३ : सातारा डायरी - किल्ले : भूषणगड, महाराष्ट्र-४१५५३८**

दिवाळीनंतरची सुट्टी खूप मजेशीर असते. मुंबईत धावपळीत साजरी केलेली दिवाळी आणि त्यानंतर मिळालेली सुट्टी (सन २०१७) मी प्रामुख्याने माझ्या गावी घालवण्याचा विचार केला आणि आम्ही माझ्या नवीन गावी म्हणजे पुसेसावळी येथे आलो. तसा मी मूळचा मु. पो. रहाटणी, तालुका. खटाव.

ही सुट्टी खास आहे कारण गेल्या वेळी (सन २०१६ ची) कामांमुळे माझी दिवाळी आणि दिवाळीची सुट्टी नुसते काम करण्यात गेली. माझे कुटुंब-बायको, दोन मुले, दरवर्षी दिवाळीत गावी येतात, ह्या वेळी मलाही गावी येता आले त्याचा आनंद झाला आहे.

आज मी किल्ले **भूषणगड** येथे, शिवदुर्ग प्रेमी म्हणून भेट देण्यासाठी सकाळी लवकर उठून गेलो. हा किल्ला पुसेसावळी (जिल्हा-सातारा, तालुका-खटाव), गावापासून ११ कि. लो. असेल, येथे जाण्यासाठी राज्य परिवहन मंडळाची एस. टी पकडावी किंवा मग प्रायवेट गाडीने तुम्ही येथे पोहचू शकता. हा किल्ला कराड पासून अंदाजे ४२ कि. लो. आहे आणि वडूज पासून अंदाजे २१ कि. लो. आहे. येथे जावून तुम्हाला काहीतरी नवीन पाहिल्याची जाणीव नक्कीच होईल.

सकाळी वातावरण कसे स्वच्छ आणि प्रसन्न होते. हा प्रवास मी माझ्या गाडीने केला आणि मग गडावर अंदाजे ५८६ पायऱ्या चढत वर गेलो. ह्या पायऱ्या कमी जास्त असु शकतात, कारण ह्या लोकांनी आपल्या नवसानिमित्त बांधलेल्या आहे. ह्या किल्ल्यावर महाराजाच्या आठवणी अजून जिवंत आहेत परंतु त्या जतन करणे महत्वाचे आहे. ह्या किल्ल्याचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे.

१. हा शिवदुर्ग किल्ला आहे, याचा महाराजांनी **टेहळणी बुरुज** म्हणुन वापर केला आणि याची प्रचिती तुम्हाला फोटो पाहून लक्षात येईल.

२. ह्या किल्ल्यावर विराजमान असणारी **आई हरणाई देवी** - ही आमची ग्राम देवता आहे.



भूषणगड किल्ला, सातारा





हरणाई देवी प्रसन्न, भूषणगड, सातारा

तसा ह्या किल्ल्याचा इतिहास फार जुना आहे, पण त्याचा वारसा सांगणारे जास्त कोणी हयात नाही. मौ जे. भूषणगड, गाव अंदाजे १०० घराचा उंबरठा असणारे गाव. सद्य घडीला ह्या किल्ल्यावर रस्ते बांधकामाचा उपक्रम चालू आहे. हे काम पूर्ण झाल्यावर आपण आपले वाहन भुयारी मार्ग देवी ठिकाणी घेवून जावू शकता.



भौगोलिक स्थिती




भूषणगड नकाशातून

हा किल्ला संवर्धनातून कात टाकत आहे तो म्हणजे येथील ट्रस्ट च्या माध्यमातून कारण हा किल्ला राज्य सरकारच्या पुरातन तत्व विभागाकडे शिवदुर्ग म्हणून नोंद नाही. हा टेहळणी बुरुज आहे आणि दुर्दैवाने येथे एकही लढाई झाली नाही. पण येथे काही शिवकालीन गोष्टी आपणास पहावयास मिळतात. ह्या किल्ल्याचा आजूबाजूचा ४०-४५ किलोमीटर च्या परिसरावर येथून नजर ठेवता येत होती आणि आजही ठेवता येते.



भूषणगड पायथा प्रवेशद्वार



गडावर जाणाऱ्या पायऱ्या




गडावरील प्रवेशद्वार



गडावरील पडझड झालेली वाट



गडावरील तोफेची जागा



टेहळणी बुरुज जागा



स्वराज्य ध्वज ठिकाण



परिसर टेहळणी



परिसर टेहळणी



गडाचे सौंदर्य...हिरवळीत दाटलेला भूषणगड

एकूणच ही भटकंती खूप मस्त झाली आणि मनाला वेगळा आनंद देऊन गेली. तसा मी येथे नेहमीच जातो परंतू आजचा प्रवास वेगळा होता.....कारण माझ्याकडे खूप वेळ होता. बाकी सर्व तुम्ही फोटो मध्ये पहिले असेलच.

आता एक भेट बाकी आहे ती म्हणजे शुभम एंटरटेनमेंट आणि मानस मूव्हीज टीम ची......एका शॉर्ट फिल्मसाठी. मला माझ्या भटकंतीमुळे खूप चांगल्या गोष्टी पहावयास मिळाल्या म्हणून मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो.

थोडक्यात काय तर ! आयुष्यात थोडेफार एकटे सुद्धा भटकले पाहिजे नवीन-नवीन गोष्टी पाहण्यासाठी आणि त्यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी. एकूणच जर काहीच जमले नाही तर तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टींसाठी थोडा वेळ काढा मग बघा आयुष्य जगण्याची मजा किती वेगळी आहे याची जाणीव आपणास झाल्याशिवाय राहणार नाही. माझा प्रवास सुरु आहे, राहतील अशी आशा करतो.

## प्रवास ८ : सामाजिक प्रवास

विचार परिवर्तनाचा

समाजसेवा म्हणजे समाजासाठी काहीतरी करणे ज्या द्वारे समाज परिवर्तन होईल व त्याचा फायदा दुर्लभ घटकांना होईल.

मला जाणवलेली समाजसेवेची व्याख्या कदाचित तुम्हाला अस्वथ करेल किंवा मग कदाचित माझे मत तुम्हाला पटणारही नाही. परंतु त्याची दुसरी बाजू तुम्हाला नक्कीच पटेल.

आपलं करिअर, आपलं आयुष्य जगताना समाजकार्य वगैरे करण्यासाठी वेळ कुठे मिळतो ? बऱ्याच जणांची ही तक्रार असते. पण काही जण मात्र समाजकार्यालाही तितकंच प्राधान्य देत असतात जितके ते आपल्या करिअर आणि आयुष्याला देतात. प्रत्येक सणाला हे लोक ज्येष्ठ नागरिक, गरीब घरांतली लहान मुलं यांच्याकडे जाऊन त्यांच्यासोबत सणाचा आनंद लुटतात, त्यांनाही सणाच्या आनंदात सहभागी करून घेतात. आयुष्यात जर संधी मिळाली तर समाजसेवक न राहता सामाजिक कार्यकर्ता व्हावे..!!

आजकाल समाजसेवा कदाचित एक फॅशन झाले आहे असं मला वाटते कारण जो तो उठ-सुठ समाजसेवा करतो. समाजसेवा म्हणजे नेमके काय हे सुध्दा कदाचित काही लोकांना माहीत नसेल, पण करतो काय तर म्हणे समाजसेवा ! फेसबुकवर तर चक्क काही लोकांच्या प्रोफाईलवर ***Work at Social Work*** असे असते. पण मला तर असे वाटते की ज्यांच्या प्रोफाईलवर Social work असे लिहुन आहे त्यांनी कधी समाजसेवा केलीच नाही ? फारतर भिकाऱ्याला भिक देणे, भुकेल्याला अन्न देणे, मोर्चांमधे सहभागी होणे, नदी नाल्यासाठी आंदोलने करणे, इ. म्हणजे समाजसेवा असे मानणारे भरपुर असतील.




माझ्या मते तरी समाजसेवक म्हणुन बिरुदावली लावणारे थोडे वेगळेच असतात किंवा कदाचित ते तसे समजतात. माझ्या मते माणसाने समाजसेवक न राहता सामाजिक कार्यकर्ता व्हावे. कारण खरा सामाजिक कार्यकर्ता कोणतेही सामाजिक कार्य जात-धर्म, भेदाभेद न पाळता करत असतो. सामाजिक कार्यकर्ता नेहमी समाज प्रबोधन करत असतो आणि समाजपरीवर्तनाच्या मार्गाने वाटचाल करीत असतो. समाजसेवा ही तात्पुरती असते परंतु तर समाजपरीवर्तन हे दिर्घकाळ असते. उदा. आपण एखाद्या भिकाऱ्याला रुपया भिक देतो. पण त्या रुपयाने त्याची परीस्थिती सुधारणार आहे असे नाही, तो पुन्हा भिकच ! मागणार... मग त्याला एक रुपया देऊन तुम्ही कोणती समाजसेवा केली. या देशात कोणावर भिक मागण्याची पाळीच येऊ नये म्हणजे समाजपरीवर्तन आणि त्यासाठी प्रयत्न करणाराच खरा समाजसेवा सुधारक ठरू शकतो.

समाज परीवर्तनाची मुख्यत्वे  जबाबदारी तरुण वर्गाची असते कारण त्यांच्याकडे काहीतरी नवी करण्याची उमेद, वय आणि चुणूक जाणवते. पण आजचा तरुण मात्र आपल्या भुतकाळात, आपल्या आठवणीत, आपल्या व्यसनातच जास्त मग्न राहतांना दिसतो. काय करावे हा सुध्दा विचार काहीजण करत नसतील. सगळेच असे आहेत असे मी नक्कीच म्हणणार नाही कारण फार तर काही तरुण आपलं करीअर उज्वल करण्यामधे मग्न असतात, पण त्यांना समाजाशी तेवढे देणघेण नसते आणि हिच परीस्थिती प्रौढांची असते, म्हणुन समाज सुधारण्यासाठी कुणाचेही पाऊल पुढे येत नाही. समाजपरीवर्तन म्हटले की लोक आपली जबाबदारी झटकतात वा दुसऱ्यावर ढकलतात. हे आपल काम नाही म्हणुन टरकवतात. आपणही या समाजाचा एक घटक आहोत हीच गोष्ट आपण नेमकी विसरतो आणि तिथेच स्पष्टपणे चुकतो.

***"परीवर्तन हे होत नसतं, ते घडवुन आणाव लागत, त्यासाठी लागते दुर्दम्य ईच्छाशक्ती आणि प्रबळ आत्मविश्वास."***

परीवर्तन म्हणजे काही एका क्षणात किंवा झटक्यात होणारी प्रक्रीया नाही कारण ही दिर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. भुतकाळातील चुकांपासुन अनुभव घेऊन वर्तमान काळात अनुभव वापरुन भविष्य घडवायचे असते. समाजपरीवर्तन म्हणजे मत परीवर्तन. मत परीवर्तन म्हणजेच लोकांच्या मनातील विचारांच्या निस्क्रीयतेची घाण किंवा मग मनातील निर्माल्य साफ करून त्यात महापुरुषांचे उच्चतम विचार पेरणे आणि त्या विचारांना चालना देण्याचे काम एक खरा सामाजिक कार्यकर्ता करू शकतो किंबहुना करत असतो. सामाजिक कार्यकर्ता हा समाजपरीवर्तनाचा एक महत्वाचा दुवा असतो. सामाजिक कार्यकर्ता हा सतत समाजप्रबोधनाच कार्य करत असतो आणी समाजपरीवर्तनाच्या दिशेन वाटचाल करत असतो. त्यापेक्षा समाजपरीवर्तन करा, समाजात प्रबोधन करा, समाजाला जागृत करा. समाजाबरोबर तुमचेसुद्धा भले होईल आणि देशाचेही भले होईल.

हा विषय म्हणावा तर अवघड नाही परंतु वाटतो तसा सोपाही नाही. समाजसेवा विषय म्हंटला तर कदाचित खूप मंडळी चागली कामे करत असतील, कदाचित वर नमूद केल्याप्रमाणे त्याचे काम यापेक्षाही वेगळे असेल किंवा मग त्यात त्यांचा प्रामाणिक हेतू सुद्धा असेल तर अश्या व्यक्तींना माझा मानाचा सलाम. समाजसेवा म्हंटले तर खालील नावे प्रखरतेने जाणवतात आणि त्याची समाजसेवा, समाजपरिवर्तनाचा ध्यास सांगावा / वाचवा तेवढा कमीच आहे.



**महात्मा ज्योतिबा फुले**



**मुरलीधर देविदास आमटे- बाबा**



**सिंधुताई सपकाळ**

मला माहित नाही आपण त्यांच्या सारखे काम करू शकू किंवा नाही परंतु एक प्रयत्न मात्र आपण जरुरू करू शकतो. त्याच्या कार्याबद्दल लिहिण्या इतपत मी नक्कीच मोठा झालेलो नाही. कारण त्यांचे कार्य सर्वांनाच ज्ञात आहे. अशा अजरामर व्यक्तींना स्मरून आपण पुढे सुरुवात करूयात....समाज परिवर्तनाची.

***पेपरात फोटो छापून येईल असे काम करणे म्हणजे सोशल वर्क नव्हे. माणसांची गरज काय हे ओळखून आपण काम करणे महत्त्वाचे. त्याची आहे का तयारी? तुमच्यात जर एखादं काम करण्याची तळमळ मनातून असेल तर तुम्ही कामात कितीही व्यस्त असलात तरी तुम्ही घरातूनही काम करू शकता.***

हा लेख मुळात लिहिण्याचा उद्देश म्हणजे मला माझ्या समाजसेवा ज्ञानाचे प्रदर्शन करायचे नाही किंवा मग खऱ्या समाजसेवकाला दुखवायचे नाही. हेतू फक्त एकच आहे आणि तो म्हणजे आपण आणि आपली सामाज्याप्रती असणारी ही आस्था खूप महत्वाची आहे. माझ्या कार्याबद्दल लिहून मला माझा गौरव वगैरे करायचा नाही परंतु एक गोष्ट मात्र नक्की सांगायची आहे आणि ती म्हणजे कोणतेही चांगले काम करण्यासाठी काळ, वेळ आणि मर्यादा नसतात असतात त्या फक्त भावना आणि इच्छाशक्ती. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते. मी केलेली कामे मनापासून काहीतरी नवीन करण्याची मला संधी मिळालेली आणि त्यातून जर कोणाचा फायदा झाला तर त्याचा आनंद खूप मोठा असतो, असेल आणि भविष्यात तो द्विगणित होईल.

- **<u>सामाजिक कार्य:</u>** अनेक सामाजिक उपक्रमात सहभागी, मग तो श्रमदानाचा असो किंवा मग कोणतेही सामाजिक कार्य शिबिरात काम करण्याचा असो. त्याचा तपशील थोडक्यात पुढे देत आहे.
  - **रस्ता सुरक्षा दल प्रशिक्षण शिबिर:** बृहन्मुंबई महानगरपालिका रस्ता सुरक्षा दल शाखेच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका शिक्षण खात्याने आयोजित केलेल्या रस्ता सुरक्षा दल प्रशिक्षण शिबिरात सहभागी आणि उल्लेखनीय कार्याबद्दल प्रमाणित करण्यात आले, वर्ष १९८९.
  - कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन, नेरे, ता. पनवेल. जि.रायगड (महाराष्ट्र) - सामाजिक शिबीरात सहभागी, वर्ष १९९२-९३.
  - परिसरातील व सोसायटीतील मुलांसाठी महापुरुष क्रीडा मंडळ (M.K.M), माझगाव, प्रयत्नाने सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाची स्थापना, २००३ मध्ये.
  - **रक्तदान शिबीर आयोजन:** राज्य रक्त संक्रमण परिषद (महाराष्ट्र राज्य), वर्ष २००५-२०१०.
  - स्वेच्छा रक्तदाता, वर्ष २००५ पासून आतापर्यंत.
  - **स्वच्छता अभियान:** सोसायटीच्या परिसर स्वच्छ करण्यासाठी, जनजागृती अभियानात सहभागी, २०१५, २०१६.
- **<u>शैक्षणिक कार्य</u>:** विद्यार्थी विकास व प्रोत्साहन प्रती विविध शैक्षणिक उपक्रम राबवले आणि अजूनही विविध अमूल्य उपक्रमात सहभागी.
  - **विविध शैक्षणिक कार्याचे आयोजन :** विद्यार्थी प्रोत्साहन स्पर्धेचे आयोजन, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा.

- **शैक्षणिक शिष्यवृत्ती :** कै. श्री. रामू बापू निकम (माझे आजोबा) यांच्या स्मरणार्थ (शेतकरी विद्यार्थी), मु.पो. रहाटणी येथे शिष्यवृत्ती, वर्ष २००६ ते २०१२.
- **शैक्षणिक मार्गदर्शन कार्यशाळा :** इयत्ता १० वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन, मु.पो. रहाटणी, वर्ष २०१५, २०१६.
- **व्याख्यानमाला आयोजन :** १० वी च्या विद्यार्थांना मार्गदर्शनपर शैक्षणिक विषयांच्या व्याख्यानमाला आयोजनात सहभागी.
- **वही-वाटप कार्यक्रम आयोजन :** समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमासाठी वह्या मिळाव्यात म्हणून सन्माननीय व दानशूर व्यक्तीना भेटून वही-वाटप कार्यक्रमाचे आयोजन.
- **इंजिनीरिंगच्या विद्यार्थ्यांना** प्रवेश परीक्षा प्रक्रिया व अभ्यासात मार्गदर्शनपर व्याखाने आयोजित केली, तसेच स्वतः सादर सुद्धा केली. मी स्वतः इंजिनीरिंग डिजाईन सेंटरमध्ये कामाला असल्यामुळे आजही हे कार्य न थांबता चालू आहे.

- **क्रीडा - सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन :** महापुरुष क्रिडा मंडळ (MKM) व महापुरुष क्रिकेट क्लब (MCC) सूर्यकुंड माझगाव प्रणित विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन.
  - महिलांचे वजनी गटांचे कबड्डी सामन्याचे आयोजन कमिटीत सहभागी, महापुरुष पटांगण, सूर्यकुंड माझगाव २००४-२००९.
  - दिवसरात्र अंडर-आर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा आयोजनात महापुरुष क्रिकेट क्लब (MCC) बरोबर अग्रेसर, वर्ष १९९६ ते २०१०.
  - पुरुषांचे वजनी गटांचे कबड्डी सामन्याचे आयोजन, महापुरुष पटांगण, सूर्यकुंड माझगाव २००४-२००९.

















बघा ! प्रत्येकाला आयुष्यात काहीतरी चांगली कामे करण्याच्या संधी मिळतात मग त्या वैयक्तिक असतील किंवा मग सामाजिक असतील,त्यात सहर्षपणे सहभागी होऊन समाज्याच्या प्रगतीसाठी हातभार नक्कीच लावू शकतो आणि समाजाबरोबर आपण सुद्धा प्रगती करू शकतो.

मला अशा सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याच्या संधी मिळाल्या आणि त्या संधी मी मनापासून काम करण्यात स्वतःला गुंतवून टाकले.

थोडक्यात काय तर ! मी ही संधी सोडली नाही आणि अशा प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी झालो. मला ही कामे केल्यानंतर काही ठिकाणी मान सन्मान मिळाला, काही ठिकाणी काहीच मिळाले नाही, काही वेळा सन्मान किंवा मग सत्कार वगैरे काहीच मिळाले नाहीत. मनापासून सागांयचे तर मला त्याची अपेक्षा सुद्धा नव्हती किंवा मग त्याचा मोबदला सुद्धा नाही मिळाला. परंतु माझ्या मनाला मिळालेले समाधान हे त्या लाखो रुपयापेक्षा जास्त होते. पैसे कमावण्यासाठी मला चांगले शिक्षण घेता आले, चांगली नोकरी मिळाली आणि त्यात मी खूप समाधानी आहे.

जर तुम्हाला संधी मिळाली तर वृद्धाश्रमामध्ये जाऊन त्यांच्यासोबत वेळ घालवून त्यांना आनंद देणं, त्यांना गरज पडेल ती मदत करणे, तसेच अनाथालय, दिव्यांग व्यक्तींसाठी काम करणे या गोष्टीही सुद्धा तुम्ही करू शकता. चला तर मग आपण सुद्धा काहीतरी करूया आपल्या प्रत्येकाच्या आवडीची कामे ज्याने समाज्यातील लोकांना थोडीफार मदत होईल.

असे प्रामाणिक प्रयत्न करण्यासाठी किंवा मग स्वतःला या समाजकार्यासाठी वाहून घेणाऱ्या माझ्या तमाम बांधवांना माझा सलाम आणि आपणास धन्यवाद !




**आतापर्यंत आपण माझे प्रवास वाचले, अनुभवले, परंतु त्यांच्या प्रवासातून कदाचित आपणास काही वेगळे अनुभवायला मिळेल. तर सादर करीत आहे....प्रवास त्यांचा !**

**प्रवास ९ : वैद्यकीय प्रवास**

डॉ. श्री. हेमंत वराडे

वैद्य किवा डॉक्टर हे आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य घटक आहेत. हल्ली २१ व्या शतकाचा उंबरठा पार करताना लोक आपल्या आयुष्याची खूप काळजी घेतात परंतु काही लोक आपणास प्रमाणापेक्षा जास्त जपतात



आणि कदाचित ते बरोबरही आहे. ताप आला - चला डॉक्टरकडे, पोटात दुखणे - चला डॉक्टरकडे, अमुक - चला डॉक्टरकडे, तमुक - चला डॉक्टरकडे आणि डॉक्टर सुद्धा देवाप्रमाणे असतात, त्यांना सामाजिक जाण ठेवत आलेल्या रुग्णाची तपासणी करणे ही एक गरज आहे, मग काय योग्य ती औषधे देवून बरे करायचे. मला सांगा ह्या वैद्यकीय पेशात असणाऱ्याचा हा वेगळा प्रवास असू शकतो का? रोज-रोज नवीन लोक, नवीन अनुभव असतील का त्यांचे? अशाच एका कल्पनेतून सुचलेल्या प्रवासासाठी, आज विशेष-वेगळे डॉक्टर व त्यांच्याशी मारलेल्या गप्पामधून जाणून घेतलेला त्यांचा वैद्यकीय प्रवास आणि त्या प्रवासादरम्यान झालेले परिचय.

आपण आज एका खास वैद्य किवा मग आपले डॉक्टर.... Anethesia Specialist यांचा प्रवास जाणून घेणार आहोत. त्या अगोदर थोडस जाणून घेवूया Anethesia (एनेस्थिशा). एनेस्थिशा म्हणजे संवेदनहीनता, बधिरता, भूल..वगैरे.

- **Anaesthetic Agent** : वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ एजंट
- **General Anaestheic** : सामान्य वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ
- **Inhalation Anaesthetic** : श्वास आत घेणे वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ
- **Inhalation General Anaesthetic** : श्वास आत घेणे, सामान्य वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ
- **Local Anaesthetic** : स्थानिक वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ
- **Spinal Anaesthetic** : पाठीचा कणा वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ
- **Topical Anaesthetic** : विशिष्ट वेदना जाणवणे बंद करणारा पदार्थ

आज आपण या सत्रात माझे एक परिचित डॉक्टर ज्यांनी हा प्रवास अनुभवला आहे, तर जाणून घेवूया त्यांचा प्रवास व त्यांनी अनुभवलेले क्षण त्याच्याच शब्दात.

तसा वैद्यकीय प्रवास हा खूप साऱ्या चांगल्या वाईट अनुभवांनी मी पार केला आहे. खूप अडचणीसुद्धा पहिल्या ह्या प्रवासात परंतु सुरुवात झाली ती बारावी पासून जीवशास्त्र (Biology) विषयाच्या आवडीने. त्यामुळे नेहमीच आवडीच्या विषयाबाबत चोखंदळपणे चौकशी करत राहणे ह्याच एक ध्यास होता. म्हणतात ना आवडच तुमची निवड बनते, असेच काही तरी माझ्या बाबतीत घडले.

माझा प्रवास हा मुलुंडच्या वझे कॉलेज मधून ११ व १२ चे शिक्षण सुरू असताना चालू झाला त्याच वेळी हा विषय माझ्या मनाला भोवला, त्यात नशिबाने म्हणाल तर आम्हाला भेटलेले हितचिंतक सांगायचे हा प्रवास तेवढा सोपा नाही जेवढा सिनेमात दाखवतात. जर का अशा कारणांमुळे वाट बदलणारे आम्ही नक्कीच नव्हतो. मनाशी दृढनिश्चय केलेला जर आयुष्यात काही बनायचेच आहे तर डॉक्टर त्याचं खाली आपली नजर पडू द्यायची नव्हती. हे ध्येय ठरवण्याची कारणे सुद्धा तशीच होती.अरेच्चा ! आपण चक्क थांबलो, थोडे पुढे जाऊया. त्याकाळाता शेवटी भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), जीवशास्त्र (Biology) ह्या विषयात मिळणाऱ्या टक्केवारी वर अवलंबून असायचे ते आजही आहे आणि कदाचित या पुढेही असेच चालू राहील.

मनाशी एक गोष्ट घट्ट केली होती अभ्यास करायचा, पण स्पर्धेसाठी नाही तर चांगले शिकण्यासाठी, मग काय दिवसाची रात्र,रात्रीचा दिवस एक केला. कारण आमच्या वरच्या उद्योगांनी तसे पर्याय कमी ठेवले होते. परंतु कदाचित हे उद्योग आजच्या धावपळीच्या जीवनात चांगले काम करण्याची ऊर्जा देऊन जातात. मग शेवटी तो दिवस उजाडला ज्याची प्रत्येकाने त्यांच्या विध्यार्थी दशेत आतुरतेने वाट पाहिली असेल. अहो जास्त विचार करू नका ती गोष्ट दुसरी-तिसरी काही नसून ती आहे आपल्या अंतिम परीक्षेच्या निकालाची. मला माझ्या मेहनतीचे ८९% गुण PCB ह्या ग्रुप मध्ये मिळाले होते. मी समाधानी होती परंतु बरोबर चिंतसुद्धा होती आता शासकीय मेडिकल कॉलेज मध्ये प्रवेश मिळेल का ? ह्या चिंतेचे विशेष काही कारण नव्हते ते अनन्य साधारण होते ती म्हणजे त्यावेळची घरची परिस्थिती त्यामुळे खासगी मेडिकल कॉलेज शिक्षण आम्हाला झेपणारे नव्हते.

मग आयुष्याच्या प्रवासातला दुसरा महत्वचा टप्पा म्हणजे माझ्या आवडत्या के ई एम मेडिकल कॉलेज मध्ये मला पहिल्या फेरीत प्रवेश मिळाला नाही, पण खचून न जाता दुसऱ्या किंवा मग तिसऱ्या फेरीत प्रवेश मिळू शकतो ह्याची खात्री लायक माहिती मिळवली जमा केली होती. ह्या दोन महिनीच्या कालावधीत यु.डी.सी.टी (UDCT) मुंबई मध्ये फार्मस्ट चे शिक्षण घेतले. टाईम वेस्ट करायचं नाही ठरवले होते ना डॉक्टर नाही तर.....! ते दोन महिने पण एक जबरदस्त अनुभव होता मित्रांनो. त्यातील एक महत्वाचा मुद्दा म्हणजे मुलींना आपले प्रेम व्यक्त करायचे ते सुद्धा फळा पुसायच्या डस्टर ने (As part of ragging in college, a better way to know your senior to junior relationship and we enjoyed a lot as well) ! आणि असे बरेच आंबट-गोड अनुभवांची शिदोरी मिळाली होती त्या दोन महिन्यात. नंतर सप्टेंबर ११९६ साली मुंबई सेंट्रल च्या नायर मेडिकल कॉलेज्यात एम बी बी एस (MBBS) ला प्रवेश मिळाला. माझ्या टक्केवारीने प्रवेशाचे अर्ध काम केले होती आता राहिली होती ती मेडिकल कॉलेज ची शैक्षणिक शुल्क भरण्याची. वडिलांनी तेव्हा माझ्या मामांकडून फीचे ₹ ५०००/ ऊसणे घेऊन माझ्या कोर्स ची फी भरली.

सर्व व्यवस्तीत झाले पहिले वर्षे मात्र रॅगिंगच्या भीतीत गेले, अहो खरंच ते तसेच निघून गेले. नायर मेडिकल कॉलेजचा विद्यार्थी वर्ग बऱ्यापैकी उच्च वर्गीय होता पण मला माझ्या स्वप्नाना वाट मोकळी करायची होती त्यामुळे नकळतच ते माझ्याकडून दुर्लक्षित झाले. पण इथे सुद्धा आमचे वरचे उद्योग चालूच होते. वरचे म्हणजे

अंताक्षरी मध्ये गाणी म्हणणे किंवा मग एखादे सोलो परफॉर्म करणे आणि असे बरेच काही. नायर मेडिकल कॉलेजमध्ये त्यांच्या **आरंभ** या वार्षिक उत्सवामध्ये खूप मजा करायचो आम्ही. कदाचित हाच माझा सराव मला हल्ली खूप कामी आला जेव्हा मी आमच्या सोसायटीच्या २०१७ च्या दिवाळी पहाट कार्यक्रमात गाण्यासाठी मोठ्या दिमाखात प्रवेश केला होता ..........यार ! क्या दिन थे वो ! पुराणी यादे, वाह ! वाह !.

नायर मेडिकल कॉलेजचे एक वैशिष्ट्य होते ते म्हणजे आमचा कॉलेज परिसर आणि त्यात आमचे वसतिगृह (हॉस्टेल बरं का !) हाजीअलीला होते. परंतु मी कळव्याला (मुंबईतच असल्यामुळे) वास्तव्यास असल्यामुळे हॉस्टेल मिळत नव्हते. मग तिसऱ्या सत्रामध्ये मध्ये (म्हणजे प्रवेश घेतल्यापासून १४ महिन्यापासून) एका मित्राच्या रूम मध्ये समवेत म्हणून रहात होतो. माझी आई मला गरम जेवण मिळावे म्हणून जेवणाच डब्बा स्वतः घेऊन येत असे..पुन्हा एकदा तशीच सुरुवात भीती रॅगिंग चे..निव्वळ टेन्शन ! मुळात आमच्या वसतिगृहाचे ठिकाण जन्नत होते. प्रश्न असा होता की वरळी सी फेस व लाला लजपत राय कॉलेज मागे असताना समोर वेलिंग्टन गोल्फ क्लब, उजवीकडे हिरा-पन्ना शॉपिंग मॉल व डावीकडे रेस-कोर्स असताना माणसाने अभ्यास तरी कसा करावा ?. पहिले वर्ष असे बघता बघता पार पडले. त्यात शरीररचना प्रात्यक्षिक कार्यशाळेमध्ये - शरीरशास्त्र (अनटॉमी) हॉल मध्ये शव विच्छेदन करताना सुरुवातीला खुप भीती वाटायची.



**सर नायर हॉस्पिटल**

डॉक्टर होण्यासाठी अति महत्वाचे आणि अत्यंत खडतर असणारे तिसरे वर्ष उझडले. खडतर ह्यासाठी की शेवटचे वर्ष आणि विषय खूप अवघड असतात. असा काहीसा चढ-उताराचा प्रवास करत २००१ साली एम बी बी एस (MBBS) पास झालो परंतु इंटर्नशिप बाकी होती. मी राहणार कळव्याचा (ठाणे) आणि इंटर्नशिप मिळाली व्ही. एन. देसाई हॉस्पिटलमध्ये, सांताक्रूझला. त्याचे कारण सुद्धा तिच्याप्रमाणे गोडच होते. ती माझ्या सत्रातील एक सुंदर कन्या (नाव, नको रे बाबा ! तो विषय माझ्या साठी संपला आहे) तिचे गोड-गोड बोलणे आमच्या सरांना आवडले व मला कुर्ला भाभा हॉस्पिटल न देता त्यांनी मला व्ही. एन. देसाई हॉस्पिटल दिले. ह्यात माझा हकनाक बळी गेला. माझ्या वैद्यकीय प्रवासातील माझा हा झालेला परिचय मला खूप त्रास देऊन गेला. परंतु ह्यातून मी खूप काही शिकलो. कदाचित माझ्या नशिबाने मला अनुभवातून खूप काही शिकायला मिळाले. परंतु मी येथे सुद्धा नेटाने बाजी मारली.

इंटर्नशिप संपून फेब्रुवारीच्या २००२ साली मला, एम. बी. बी एस. (MBBS) पदवी माझ्या हातात पडली. त्याचं वेळी मला माझे मामा आणि आईची-बाबांची खूप आठवण झाली, म्हणून तर माझ्या वैद्यकीय प्रवासात जेवढे

माझे श्रेय आहे, तितकेच कदाचित त्यांचे सुद्धा होते, आहे असं मला मनोमनी वाटते. मग बाकी होते ते पदवी प्रदान समारोह आणि तो ही नायर हॉस्पिटलच्या ऑडिटोरिम (प्रेक्षागृहात) मधे झाला होता. तयारी सुद्धा जोरात केली होती आम्ही मस्त काळा कोट, गळ्यात टाय, रोब एकूणच सगळी मजा होती. आता प्रश्न होता तो आपल्याला आवडणाऱ्या विषयात पोस्ट ग्रज्यूएशन करण्याचा आणि आमच्या वेळेपर्यंत सी. ई. टी (कॉमन एनट्रेन्स टेस्ट) आली होती. पण आता वेळ आली होती इर्निंग व लर्निंग सोबत करायची. मग पुढे दोन्ही गोष्टी चालू हव्या म्हणून महात्मा फुले हॉस्पिटल, विक्रोळी येथे मेडिकल ऑफिसर म्हणून रुजू झालो. अभ्यास करून नोकरी सांभाळली. २००३ साली सी. ई. टी मधून मला हवे असलेले काम मिळत नव्हते. मग पुन्हा एकदा जोमाने व जिद्दीच्या जोरावर सी. ई. टी ची परीक्षा दिली. मग २००४ साली आय. जी. एम. सी. (IGMC) नागपूर येथे ऍनेस्थेसिया (Anethesia) या विषयात पोस्ट ग्रज्यूएशन करण्याची संधी मिळाली.

माझ्या ह्या प्रवासात २००४ ते २००६ चा काळ खूप खडतर होता कारण वसतिगृहावर राहणे, खूप काम असायचे झोप आणि जेवण ह्यांची काही वेळच नसायची, त्यात पहिल्यांदाच घरापासून आणि प्रामुख्याने आई पासून लांब होतो. बाबांचे वेळो वेळी मार्गदर्शन मिळायचे त्याने थोडा धीर यायचा. पण शिकताना या गोष्टीचा आनंद घेत घेत, माझ्या आवडत्या विषयात पोस्ट ग्रज्यूएशन करण्याचा माझा प्रवास मे २००६ साली अखेर संपला.

नंतर मे २००६ ते जून २००६, काळात वाशीम येथे ऍनेस्थेसिया सल्लागार (Anesthesia Consultant) म्हणून काम पाहिले. परंतु खूपच संथ असणाऱ्या जीवन शैलीमुळे, कारण ज्यांनी मुंबई पाहिली असल्यामुळे तेथे मी जास्त वेळ तग धरू शकलो नाही. मग जुलै २०१६ मध्ये मुंबईत परत आलो. मुळात के. ई. एम. मध्ये काम करायची पहिल्यापासून इच्छा असल्यामुळे, जुलै २००६ ते डिसेंबर २००६ के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये रजिस्टर पोस्ट वर काम केले. पण आता स्वतः चे काहीतरी करावे, अशी इच्छा होती म्हणून डिसेंबर २००६ ते मे २००८ या कालावधीत राजावाडी हॉस्पिटलमध्ये पॅनेल ॲनेस्थेसोलॉजिस्ट (Panel Anesthesiologist) म्हणून काम केले. त्यानंतर जे. जे. हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल, सेंट जॉन हॉस्पिटल, जी. टी. हॉस्पिटल येथे पॅनेल ॲनेस्थेसोलॉजिस्ट (Panel Anesthesiologist) म्हणून काम केले.




जसे अगोदर नमूद केल्या प्रमाणे जी तुमची आवड असते नकळत तीच तुमची निवड बनते. जसा माझा पहिला हाफ डॉक्टरकीय (वैद्यकीय) तशीच माझी बेटर हाफ पण डॉक्टर बरं का ! ***नाव: डॉ. सौ. भाग्यश्री हेमंत वराडे, नेत्रचिकित्सक (Opthalmologist).***

जिथे सर्व काही वैद्यकीय, मग काय ! केले २०१० मध्ये स्वतः चे **स्पर्श हॉस्पिटल** ठाण्यात सुरू केले. आता स्वतः फ्री लान्सर म्हणून काम करत आहे फ़क्त फरक एवढाच आहे शिकताना दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस केला आणि आता काम पण तसेच चालू आहे, परंतु हे सर्व प्रकार मी मनापासून आनंदाने करत आहे. माझा हा प्रवास कदाचित तुमच्या सारखा नसेल पण ह्या प्रवासात मी खूप गोष्टीशी परिचित झालो आणि त्या तुम्ही वाचल्या सुद्धा.

थोडक्यात काय तर ! यशाला कष्टाशिवाय दुसरा पर्याय नाही, तुमची आवड, एकाग्रता तुम्हाला हवी असणारी निवड मिळवून देते ह्या बद्दल माझ्या मनात तर दुमत नाही. **Have good dream, make efforts to achieve your dreams and you will be successful always!** मला ह्या प्रवासात काही चांगले-वाईट अनुभव आले परंतु त्यात अडकून न राहता पुढे चालत राहणे मी पसंत केले आणि हा प्रवास निरंतर चालू आहे.

शेवटी मला माझा हा प्रवास व्यक्त करण्याची संधी माझे मित्र श्री. दत्तात्रय निकम यांच्या **प्रवास आणि परिचय-पासपोर्ट आठवणींचा** पुस्तकात मिळाली त्याचे समाधान काही वेगळेच आहे ते शब्दात सांगणे कठीण आहे. कारण तेवढ लिहिण्याचे धाडस अजून तरी माझ्यात नाही परंतु भविष्यात कदाचित प्रयत्न करेन.

धन्यवाद !

आपला

डॉ. हेमंत वराडे

ऍनेस्थेसिया स्पेशालीस्ट

**प्रवास १० : व्यायाम प्रशिक्षण आणि प्रशिक्षकाचा प्रवास**
श्री. दिपक महादेव कांबळे

आजचे जीवन फार धकाधकीचे व थकवून सोडणारे आहे. त्यामुळे बदलते राहणीमान, वेळी-अवेळी खाणे, झोपणे ह्या सगळ्या गोष्टीचे परिणाम प्रामुख्याने आपणास जाणवतात ते म्हणजे वजन वाढणे, थकवा येणे, दिवसभर कामाच्या ठिकाणी ताजेतवाने न वाटणे, मरगळ जाणवणे, चिडचिड होणे आणि अशा बऱ्याच प्रसंगांना सामोरे जावे लागते.

हे सर्व कशामुळे होते कदाचित कारणे अनेक असतील परंतु मानसिक तणाव व अतंदुरुस्ती ही असू शकतात. प्रामुख्याने शरीराच्या व्यायामाचा अभाव, शारीरिक दुर्बलता ही त्यातील एक असू शकतात.



सकाळी लवकर उठून व्यायाम करणे हे शरीरासाठी फायदेशीर असते, हे आपण अगदी पूर्वीपासून ऐकत आलो आहोत. त्याप्रमाणे हल्लीची तरुणपिढीही फिटनेस आणि आरोग्याच्या बाबतीत जागरुक झालेली दिसते. त्यामुळे योग्य आहार आणि व्यायाम करण्यावर तरुण मंडळी भर देतात. पण व्यायाम करताना आपण कधी-कधी लहान-लहानशा चुका करतो, ज्यामुळे व्यायाम करणे हे आपल्यासाठी एक कंटाळवाणे काम ठरू शकते.

**१. चूक - सारखा तोच-तोच व्यायाम प्रकार करणे**

**उपाय** - सारखा तोच-तोच व्यायाम प्रकार केल्याने शरीर आणि मन थकते. तसेच कालांतराने व्यायाम करणे कंटाळवाणे काम वाटायला लागते. यासाठी व्यायाम करताना लहानसा ब्रेक घ्यायला हवा. जेणेकरुन व्यायाम करताना उत्साह येईल.

**२. चूक - कमी प्रमाणात खाणे**

**उपाय** - कमी खाल्ल्याने व्यायाम करण्यास शरीरात ऊर्जा राहत नाही. शरीरातील ऊर्जा कमी झाल्याने व्यायाम करण्याचा कंटाळा येतो अशी कारणे अनेकजण देतात. योग्य प्रमाणात आहार घेतल्यास शरीरातील ऊर्जा वाढते. त्यामुळे व्यायाम करण्यास सहाजिकच उत्साह येतो.

**३. चूक - प्रमाण प्राप्त प्रशिक्षक नसणे**

**उपाय** - प्रमाणपत्र प्राप्त प्रशिक्षकच तुमच्यासाठी योग्य व्यायामाचा आराखडा आखतात. तुमची शरीरयष्टी, जीवनशैली आणि खाण्या-पिण्याच्या सवयीनुसार प्रशिक्षक तुमच्याकडून व्यायाम करुन घेतात. तसेच प्रशिक्षकच तुम्हाला व्यायाम करण्यास योग्य प्रकारे प्रोत्साहन देऊ शकतो.

**४. चूक - तुम्हाला व्यायामानंतरच्या निकालाची चिंता नसते**

**उपाय** - एखाद्या कामात यश मिळाल्याने आपल्याला प्रोत्साहन मिळते, हे व्यायामाच्या बाबतीतसुद्धा खरे आहे. तर तुमच्या व्यायामाची पद्धत ही स्मार्ट असू द्या. तुम्ही जो व्यायाम करता त्यातून मिळणाऱ्या निकालाचा मागोवा घ्या आणि त्यानुसार तुमच्या व्यायामपद्धतीत बदल करा.

**५. चूक - सतत तक्रार करणं**

**उपाय** - सतत तक्रार केल्याने एखाद्या कामातील मजा निघून जाते. जेव्हा तुम्ही एखादे काम सकारात्मक दृष्टिकोनातून पाहता, तेव्हा ते काम करण्यासाठी अधिक उत्साह येतो. अशाने तुम्हाला व्यायाम करण्याचा किंवा इतर काहीही काम करण्याचा कधीच कंटाळा येणार नाही.

अशाच एका अति महत्वाच्या प्रवासाबद्दल जाणून घेण्यासाठी आपण आज खास करून ह्या विषयात पारंगत असलेल्या एका प्रशिक्षित व्यक्तीबरोबर चर्चा करून त्यांचा अनुभव जाणून घेणार आहोत. तर आज आपण **श्री. दिपक महादेव कांबळे** सरांची भेट घेणार आहोत आणि त्यांच्याकडून आपण जाणून घेणार आहोत आजचा आपला मजेशीर प्रवास ! प्रत्येकाच्या फायद्याचा.

अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, प्रशिक्षक, शरीरसौष्ठव (बॉडी बिल्डर), राष्ट्रीय शरीरसौष्ठव परीक्षक, जिल्हा व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होणारे आपले **श्री. दिपक महादेव कांबळे**, यांचा हा प्रवास खरचं जाणून घेण्यासाठी मी स्वतः तर उत्सुक आहे आणि तुम्हाला सुद्धा कदाचित आवडेल. चला तर जाणून घेऊया कांबळे सरांचा प्रशिक्षक प्रवास आणि परिचय या बद्दल त्यांच्याकडून त्यांच्याच शब्दात.

माझा जन्म १ ऑगस्ट १९६७ साली रत्नागिरी जिल्ह्यातील फणसोप गावी एका मध्यमवर्गीय परिवारात झाला. वडील शिक्षक आणि आई गृहिणी एक मोठा भाऊ असे छोटेखानी सुटसुटीत कुटुंब. साहजिकच निती-नियमाने मोठे झालेलो आम्ही, घरात शैक्षणिक वारसा असल्याने मुलांनी चांगल्या ठिकाणी शहरात जाऊन शिकावे असा वडिलांचा आग्रह. म्हणतात ना शिक्षकाला शिक्षणाचे महत्त्व कळते. पुढील शिक्षणासाठी मोठ्या काकाच्या घरी मुंबईत विक्रोळीला आलो. मुळात काकांना पाच मुले त्यात मी आणखी एक परंतु मला काका-काकीने कधीही वेगळे वागवले नाही, मुलाप्रमाणे सांभाळले. एकटे कमावणारे काका आणि आम्ही एवढे सगळे होतो, पण सर्व काही व्यवस्थित झाले.

मला अजूनही आठवतो तो १३ जून १९८५ चा माझा सिद्धार्थ कॉलेज, फोर्ट मधला पहिला दिवस, लहापणापासून खेळ व व्यायाम यांची आवड असलेला मी परिस्थितीमुळे ना क्रिकेटर होता आले ना फुटबॉल पटू तेव्हा ठरवले काहीच नाही तर कबड्डी चॅम्पियन व्हायचे. कोणीतरी खरोखर अगदी योग्य म्हटले आहे आवडीला निवडी नसतात, १९८४ ते १९९० चा काळ जणू मुंबईत कबड्डीचा काळ म्हणता येईल. रोज रात्री कबड्डीचे सामने व्हायचे मग काय आम्ही अगदी न चुकता सामने बघायला हजर. हळूहळू हा खेळ अंगात भिनला आणि एक दिवस आपल्या आवडीच्या मैदानात खेळण्यासाठी उतरलो आणि कदाचित दैवयोग असावा कारण कबड्डीची पहिलीच स्पर्धा खेळत होतो त्यामध्ये उत्कृष्ठ पक्कड व चढाईपटू (रेडर) म्हणून प्रथम पारितोषिक मिळाले. त्यामुळे साहजिक घरची मंडळी खूप खुश होती. त्या दिवसापासून मी काही मागे वळून पाहिले नाही. मग काय विचारता कुर्ला, भांडुप, मुलुंड या ठिकाणी प्रामुख्याने खूप प्रसिद्धी आणि चाहत्यांनी प्रोत्साहित केले. परंतु जसा जसा हा खेळ खेळू लागलो तसे मला जाणवू लागले की कुठेतरी खेळात माझी ताकत कमी पडत आहे. आमच्या प्रशिक्षकांनी सांगितले तुला सकस आहार आणि व्यायामाची गरज आहे. सकस आहार घेणे आणि महागड्या व्यायाम शाळेमध्ये जाणे परवडणारे नव्हते, कारण घरी पैसे मागायचे तरी कसे आणि समजा मागितले तर काका एवढे पैसे आणणार तरी कुठून ? मग ठरवले व्यायाम तर करायचा म्हणून घरीच जोर बैठका मारायच्या पण घर फार छोटे होते हात ताणायचे म्हटले तरी हात पत्र्याला लागायचे. पर्याय नव्हता मग करायचे तरी काय ? जवळच एक




क्लास होता त्यांना आमच्या घरातून लाईट दिली होती त्यामुळे ते आम्हाला त्या मोबदल्यात तेथे झोपायला द्यायचे. सकाळी जो काही वेळ मिळायाचा त्या वेळेत तेथे व्यायाम चालू केला. सकाळी ७:३० चे कॉलेज राहणार विक्रोळी आणि कॉलेज फोर्टला, तासा दीड तासाचा प्रवास. ११:३० वाजेपर्यंत कॉलेज घरी येईपर्यंत दुपारचे १:३० वाजायचे तो पर्यंत उपाशी पोटी, नंतर घरी आल्यावर जेवण. संध्याकाळी नित्यनेमाने घरी व्यायाम, मग स्वतः ला फिट ठेवण्यासाठी कबड्डी, दहीहंडी सराव सुरू झाला. सोबत नवरात्र, गणपती अशा विविध कार्यक्रमात सहभाग होताच. कदाचित ह्याचमुळे मी स्वतःला प्रोत्साहित करत होतो.

हळूहळू शरीराने साथ द्यायला सुरुवात झाली आणि फक्त घरच्या व्यायामवर १८ वर्ष खालील शरीर सौष्ठव स्पर्धेत मानाचा **श्री** किताब पटकावला. कदाचित हीच सुरुवात मला आजही व्यायाम करायला प्रेरणा देते. मग मला वेग वेगळ्या व्यायाम शाळेत मोफत व्यायाम करण्यासाठी आमंत्रणे येऊ लागली. मला वेगवेगळ्या ठिकाणी व्यायाम करण्याच्या संधी उपलब्ध होत गेल्या हे पाहून माझा आनंद गगनात मावेना, परंतु मी माझ्या काकांबरोबर कुठल्या व्यायाम शाळेमध्ये जायचं याची चर्चा केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी घराच्या जवळची

**वीर हनुमान** येथे व्यायामासाठी सुरुवात केली. आयुष्यात कधीही व्यायामाचे एवढे सामान पाहिले नव्हते, मग काय विचारता नुसता व्यायाम करणे चालू झाले. व्यायाम करण्यासाठी आवश्यक असणारा सकस आहार व योग्य प्रशिक्षक नसल्यामुळे व्यावसायिक शरीरसौष्ठवपटू (बॉडी बिल्डर) बनणं अवघड वाटू लागले होते. त्याचबरोबर शिक्षण सुद्धा चालू होते. १९८९-९० साली मी माझे बी. कॉमचे शिक्षण पूर्ण केले. मनात व्यायामाची ओढ कायम होती परंतू घरची परिस्थिती नोकरी करण्यासाठी भाग पाडत होती. मग मी पार्ल्याला सफायर फार्मासुटीकेल मध्ये एम. आर (Medical Representative) म्हणून नोकरीत रुजू झालो. पुर्ण महाराष्ट्र फिरण्याची नोकरी मिळाली पगार तसा बेताचा परंतु नोकरी करणे अत्यंत आवश्यक होते. फिरण्याच्या नोकरीमुळे व्यायामाचे तीन तेरा वाजले. शरीर सुकत चालले होते काय करावे काहीच सुचत नव्हते.

२० मार्च १९९२ ला मला सरकारी नोकरीची संधी आली आणि सहज मुलाखत द्यायची म्हणून मुलाकतीसाठी हजर झालो. मुलाकतीनंतर मला कामावर रुजू होण्याचे पत्र (अपॉइंटमेंट) मिळाले मला खुप आनंद झाला पण नोकरी रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यात होती. नाईलाज होता कारण सरकारी नोकरी असल्यामुळे जाणे क्रमप्राप्त होते. मी राजापूरला हजर झालो आणि कदाचित हाच माझ्या जीवनातील टर्निंग पॉईंट म्हणता येईल.



कामावर रुजू होण्याअगोदर राजापूर मधील व्यायाम शाळेची माहिती काढली. व्यायाम शाळा तशी सर्व साधारण, प्रशिक्षक नाही, मुले कसाही उलट- सुलट व्यायाम करायची, मी मुंबईचा असल्याने हे सर्व मला पाहवत नव्हते. मग मला असलेल्या माझ्या अनुभवानुसार त्यांना प्रशिक्षण देऊ लागलो. जेव्हा माझा पहिला पगार झाला तेव्हा ठरवले की सर्वात आधी फक्त आणि फक्त शरीरावर सकस आहारासाठी खर्च करायचा. राजपुरात ब्राम्हणाच्या खानावळीत जेवत होतो. ऑफिसातून सुटल्यावर व्यायाम मग खानावळीत जेवण परंतु अति कसरतीमुळे भूक खूप लागायची, मग जेवताना खानावळीतील काकू नेहमीच म्हणायच्या कांबळे तुमच्या सारखे खाणारे आणखी दोघे खाणारे असतील तर मला खानावळ बंद करावी लागेल.हे आता रोजचेच ऐकून मला कंटाळासुद्धा आला होता. मग मी स्वतः घरी जेवण बनवण्यास सुरुवात केली, मनासारखे मनोसोक्त खाणे आणि आपल्या तब्बेतीवर लक्ष द्या हा नित्यक्रम चालू झाला. हळूहळू माझे शरीर पिळदार होत चालले होते, छोट्या मोठ्या स्पर्धा करू लागलो पण प्रत्येक स्पर्धेत बक्षीस न चुकता मिळवत होतो.

माझे हे कठीण दिवस घरच्यांपासून लपलेले नव्हते त्यामुळे घरी लग्नाचे वेध सुरु झाले होते. मला येणारी स्थळे मुलाला घरी न बघता, बघण्यासाठी व्यायाम शाळेतच येऊ लागले.त्यात मध्यस्थी सुद्धा पाहुणे मंडळींना व्यायाम शाळेत आणू लागले, व्यायाम करताना फुललेले शरीर बघून सगळे लगेच मुलगी द्यायला तयार व्हायचे आणि असे कित्येक दिवस चालू होते. शेवटी २८ एप्रिल १९९६ ला मुंबईतील मुलीबरोबर लग्न झाले. माझी बायको सौ. नेहा ही स्वतः नोकरीत मुंबईला आणि मी राजापूरला, पुन्हा परत एकदा व्यायाम दूर होत चालला होता. नंतर वर्षभराने माझी बदली मुंबईत पनवेलला झाली आणि १९ मे १९९७ साली खारेगाव, कळवा येथे रहायला आलो. परंतु खारेगाव ते पनवेल हा अप-डाउन च्या प्रवासाने व्यायाम करण्याचा हेतू साध्य होत नव्हता. परंतु पुन्हा एकदा मनावर घेतले आणि व्यायाम चालू केला. वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेत बक्षिसे मिळवत राहिलो. मग जिल्हा, राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्पर्धा असा प्रवास केला. एका मागून एक स्पर्धा , कबड्डी खेळणे चालू होते. अशाच एका कबड्डी सामन्यात खेळताना पडलो आणि हर्नियाचे १८ टाक्याची शस्त्रक्रिया झाली आणि डॉक्टरांनी सांगितले आता तुम्हाला कायमचा व्यायाम बंद करावा लागेल. माझ्या काळजात धस्स झाले ज्या साठी इतकी वर्षे मेहनत केली ते एवढ्या सहज पणे कसे सोडायचे. बघा काय ही वेळ संपूर्णपणे फॉर्म मध्ये असताना माझ्यावर असे दुर्दैव आले आणि जर मग मी माझ्या जिद्दीने हार न मानता हळूहळू व्यायाम परत सुरू केला. सुरवातीला हलका व्यायाम करत करत लय मिळत गेली आणि त्याच दरम्यान के-११ (K-11) कैझाद कपाडिया यांच्या प्रशिक्षण केंद्रात वैयक्तिक प्रशिक्षकाचे - (Personnel Trainer) चे तीन महिन्याचे प्रशिक्षण ₹१५०००/-भरून प्रशिक्षण पूर्ण केले.

मनाशी एक गोष्ट ठरवलेली होती आपणास जेवढा व्यायाम जमेल तेवढा करायचा आणि आपल्या इतक्या वर्षाचा अनुभव असल्याने नवीन शरीरसौष्ठवपटू (बॉडी बिल्डर) तयार करायचे. हे मी एक सामाजिक देणे समजून मोठ्या आनंदाने काम करत आहे आणि त्यातून वेगळे समाधान पण मला मिळत असे. म्हणतात ना अनुभव तुम्हाला नेहमी तुमच्या कामाच्या गौरव स्वरूपात मिळतात त्याचा प्रत्यय मला सुद्धा आला जेव्हा माझी अशा स्पर्धांसाठी माझी परीक्षक म्हणून नेमणूक झाली. तेव्हा या स्पर्धातून मान, सन्मान आणि योग्य असे मानधन सुद्धा मिळू लागले.

माझा गेल्या अनेक वर्षच्या अथक परिश्रम आणि अनुभवाने माझ्या खूप ओळखी सुद्धा वाढल्या होत्या. कित्येकांना मार्गदर्शन करून व्यायामपटू घडवले त्याचा प्रत्यय मला औरंगाबादला आला. काही कामानिमित्त मी एक दिवस माझ्या भावाकडे औरंगाबादला गेलो होतो. तिथे मला माझ्या भावाकडून समजले की आपल्या परिसरात शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित केली आहे. मी ठरवले की वेळात वेळ काढून ही स्पर्धा पाहण्यासाठी जायचे.

ह्या स्पर्धेसाठी अंदाजे हजार पंधराशे लोकांचा प्रेक्षक वर्ग पाहून मी खूप आनंदी झालो होतो. परंतु कोणी ओळखीचे नसल्याने मी आणि माझा भाऊ एका बाजूला उभे होतो. स्पर्धेत अनेक स्पर्धक आले होते त्यांना सगळेच पाहत होते स्पर्धा चालू होण्यासाठी काही वेळ होता. इतक्यात एक जबरदस्त पिळदार शरीरयष्टी असलेला एक शरीरसौष्ठवपटू प्रेक्षकांच्या दिशेने चालत आला आणि माझ्या पाया पडून आशिर्वाद घेतला. माझ्या भावासहित सगळेच अचंबित झाले व अवाक होऊन माझ्याकडे बघत होते. मी सुद्धा त्याला आशिर्वाद दिला पण खरोखर मला त्याची ओळख लागली नाही. इतक्यात स्पर्धा आयोजकांकडून एक निवेदन करण्यात आले, आज



आपल्या ह्या स्पर्धेच्या ठिकाणी मुंबईचे सिनिअर शरीरसौष्ठवपटू व राष्ट्रीय पातळीवरचे परीक्षक सामना पाहण्यासाठी आले आहेत तर आपण त्याचे स्वागत करूयात. मला वाटले की असेल कोणीतरी दुसरे म्हणून मी सुद्धा त्यांचे टाळ्या वाजवत स्वागत करण्यास सुरुवात केली व जेव्हा त्यांनी त्यांचे नाव घेतले. ते दुसरे तिसरे कोणी नसून आपणच आहोत ही जाणीव झाली तेव्हा मात्र जे वाटले ते शब्दात सांगणे अवघड आहे. मला मंचावर बोलावले गेले व माझा आदर सत्कार शाल व श्रीफळ देवून करण्यात आला. मनात एक विचार आला की ईतक्या वर्षांच्या माझ्या मेहनतीचे चीज झाले. असे अनुभव मला वारंवार येत गेले व माझा आनंद द्विगुणीत होत गेला.

आजच्या घडीला वयाची ५१ वर्ष पूर्ण झाली ना गोळी ना काही आजार अजून तरुणांप्रमाणे उत्साह टिकून राहिल्याबद्दल देवाचे आभार. तसेच बरेच तरुण स्पर्धक सुद्धा असतात त्यातूनही मला बरेचशी बक्षिसे मिळत आहेत. हा प्रवास तसा सोपा नव्हता त्यासाठी माझी पत्नी सौ. नेहा दिपक कांबळे हीचा खूप आधार मिळाला. तिने घर आणि मुले चांगली सांभाळीत मला अशा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत केले. मग माझा आहार असो किंवा आणखी काही, तिच्यामुळे मी इथपर्यंत पोहचू शकलो अशा ह्या माझ्या प्रवासात माझा तिच्याशी झालेला परिचय एका खास गोष्टीप्रमाणे आहे. माझ्या ह्या प्रवासात मला खूप परिचय झाले त्यात मी प्रामुख्याने माझे आई-वडील, काका काकी, माझे सर्व प्रशिक्षक आणि चाहत्यांचा खुप खुप आभारी आहे. जसे मला प्रेम दिले तसेच प्रेम प्रत्येक शरीरसौष्ठवपटू देत रहा आणि त्यांना प्रोत्साहीत करा ही विनंती.

मित्रांनो ! असा माझा हा प्रवास तुम्ही वाचला त्यातुन मी आजच्या पिढीला एकच गोष्ट सांगेन मला प्रशिक्षक म्हणून काम करताना असे लोक भेटले त्यांना झटपट पिळदार शरीर हवे असते. तरी मी आपणास एकच गोष्ट

सांगेन माणसाला वेळ कधीच नसतो वेळ हा नेहमीच काढावा लागतो. If you think you can then lets start..today. कारण व्यायाम हा एक मोठा त्याग आहे परंतु आयुष्याची मोठी शिदोरी आहे मग आजच ठरवा व्यायाम उद्यापासून सुरू करू, उद्या करूया तर आपला उद्या कधीच येत नाही म्हणून व्यायाम आजपासून चालू करा आणि कामाला लागा. बघा मला खात्री आहे की तुम्ही मला सतत आठवत राहाल यात शंका नाही.

तसेच मला माझे मित्र श्री. दत्तात्रय निकम यांच्या **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** मध्ये माझा प्रवास मांडण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद !

आपला,



श्री. दिपक महादेव कांबळे,
व्यायाम प्रशिक्षक, सिनिअर शरीरसौष्ठवपटू व
राष्ट्रीय पातळी परीक्षक

**प्रवास ११ : भटकंती - एक प्रवास वर्णमाला**
प्राध्यापक श्री. सुदाम वसंत निकम

भटकंती हा प्रकार निश्चितच वेग-वेगळे प्रवास-करीत पुढे जातो मग तो ऐतिहासिक असो किंवा मग सैर सह्याद्री कडे-कपारीची किंवा मग डोंगरदऱ्या असो किंवा मग घाटावरील-वाटा असो किंवा मग देशाच्या कुलदैवताची - छत्रपती शिवाजी महाराज्यांची प्रदक्षिणा असो किंवा मग रविवारच्या सुट्टीतील मारलेला मन-मुराद फेर-फटका असो किंवा मग मित्र-परिवाराच्या सहवासातील पावसाळ्यातील गिर्यारोहण असो किंवा मग असे अनेक विविध प्रवास जे कदाचित ह्या पुस्तकात समाविष्ट न केलेले.



असे अनेक प्रकार व त्यांची प्रवास वर्णमाला जाणून घेण्यासाठी विविध लोकांशी मारलेल्या गप्पा आणि विषय समजून घेण्याचा प्रयत्न केला तो आपणास समोर सादर करीत आहे. त्यापैकी आज आपण **श्री. सुदाम वसंत निकम सर** याचा भटकंतीचा प्रवास पाहणार आहोत. निकम सर हे स्वतः **भारती विद्यापीठ कॉलेज** मध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ***एक अवलिया निसर्गात, सह्याद्रीत, माणसात रमणारा, पुस्तके आणि इतिहासात हरवणारा साधे आयुष्य आनंदात जगणारा.*** त्यांनी अशा बऱ्याच भटकंती केल्या आहेत तर पाहूया काय आहे आपणासाठी त्यांच्या अनुभवातून. चला तर या भटकंतीचा आनंद घेवूया त्यांच्या शब्दात.

या श्रावणात **भीमाशंकर** कर्जत मार्गे करायचं ठरवलं होतचं, नाही म्हणायला १५ ऑगस्टला एकदा बार फुसका गेला होता. तशी मला या गोष्टींची सवय आहेच, पण मग त्यातून शहाणा होऊन शनिवार-रविवार मात्र गमावून चालणारे नव्हते. आम्हा भटक्यांचे असे तुटके-फुटके हिशोब असतात. खरे तर सुरुवातीला मी, गुंड, भाऊ, एम आर, महाडिक, मिसाळ, अक्षय असे नेहमीचेच भटके-खेळाडू नक्की होतो. त्यात नंतर गुंड सरांचा भाऊ-भाचा व शेवटी पांगारे असे आणखी काही जण वाढले. हो शेवटी मी, गुंड, भाऊ, मिसाळ, अक्षय, पांगारे असे सहाजणचं भीमाशंकरच दर्शन घेऊन आलो.





या आधी भीमाशंकर दर्शन चालत (सावळा, मावळ मार्गे), दुचाकी, चारचाकी असा अनेकदा झालेला, पण कर्जत जाणे अजून तरी स्वप्नंच होते. पण या खेपेला पूर्ण माहिती काढून तुलनेने सोपा **कर्जत-खांडस-गणेशघाट** हा मार्ग नक्की केला होता. सवयीप्रमाणे विशाल काकडे कडून माहिती घेतली, अरुण सावंत सरांचा सल्ला घेतला, गुगल होतचं सोबतीला. हो नाही म्हणता सगळे तयार झालो, श्रावणात सोशल मिडिया पासून लांब राहण्याच्या संकल्पामुळे घडामोडींची देवाघेवाण ही लघुसंदेश किंवा फोन अशीच होत होती. नाही म्हणायला मुकेश भाईंच्या रिलायंन्स जिओन खूप चांगली साथ दिली आहे मागील ५-७ महिन्यापासून.




शनिवार सकाळची सुरुवातच पावसाने झाली आणि जसा दिवस पुढे सरकला तसा तसा पावसाचा जोर वाढलेला होता. जेके भाऊ कुरबुर करायला लागले, तशा परिस्थितीत तयार होवून कॉलेजला आलो. ठरल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेच्या मुलांना ९.३० ला मुसळधार पावसात घेऊन धामोळयाला जिल्हा परिषदेच्या शाळेत गेलो आणि तिथला कार्यक्रम संपवून पुन्हा १२.३० ला परत कॉलेजला आलो. काही किरकोळ कामे उरकून गडबडीने १.३० ला घरी पोहोचलो. दरम्यानच्या काळात महाडिक सरांनी माघार घेतली होती. घरी पोहोचल्यावर घाई-गडबडीने पिशवी भरली. संध्याकाळचा डबा भरून घेतला नि परत पावसातच भाऊंच्या इमारतीखाली जाऊन उभा राहिलो. भाऊ, पांगारे, मिसाळ सर असे करत करत नेहमी प्रमाणे अक्षय शेवटी आला. रिक्षाची वाट न बघता तडक चालायला सुरुवात केली. दरम्यान आज गुंड सर वेळेच्या आधीच हायवेला येऊन उभे राहिलेले कळले. आम्हीही १५-२० मिनिटांत हायवे गाठला.

सुरूवातीला बस पकडून पनवेल गाठले, पुढे बस-ट्रेन असा गोंधळ घालत शेवटी ४ ची "पनवेल-नांदेड" ट्रेन पकडली. सोबतीला बापू होतेच टाईमपासला. कर्जतच्या अलिकडे गाडी सिग्नलमुळे थांबली आणि मग काय रेल्वे ट्रॅकवरून निवांत चालत स्टेशन गाठलं. कर्जत स्टेशनच्या बाहेर मस्तपैकी कपबशीतला ५ रूपयांचा चहा प्यायलो यावेळी सौजन्य होते आमचे मित्र बापूंचे.

एव्हाना खांडस खुणवायला लागले होते. एसटीची खात्री नसल्याने टमटमने जायचे ठरवले होते. येथेही लुटालूटीचा अनुभव, जवळजवळ दुप्पट पैसे देऊन ६.३० वाजेपर्यंत खांडसला पोहोचलो. मग मस्तपैकी ऐनकरांच्या चौसोपी घरात बॅगा टाकल्या, हातपाय धूवून चहा प्यायलो, नंतर गावात एक चक्कर टाकली. भिमाशंकर पर्वताच्या पायथ्याला वसलेले चार-साडे चार हजार लोकवस्तीचे टुमदार गाव. रात्री ८.३० ला बांधून आणलेले डबे सोडले, ६ डबे नि तितक्याच वेगवेगळ्या भाज्या. मित्रहो ! नशीबच लागते अशा सहभोजनाला, सोबतीला ऐनकरांच्या घरगुती भात-वरणांवर असा उभा-आडवा हात मारला कि विचारायची सोय नाही.

जेवणानंतर सहजच विठ्ठल मंदिरात चक्कर टाकली, दर्शन घेऊन निवांत बसलो होतो. गावातले भक्तीमार्गातले जुने-जाणते नवनाथांचा ग्रंथ घेऊन वाचकाची वाट बघत बसले होते. सहजच विचारले आणि परवानगी मिळाली मग वाचनाचा ओघ व त्या शैलीत एकेक ओवी गावकर्यांच्या मदतीने उलगडली. आजही गावांत जेवणानंतर डेली सोप न बघता लोक भक्तीरसांत रमतात. मलाही श्रावणांत नवनाथ चरित्र वाचायचं भाग्य लाभले. अध्याय संपन्न झाला आणि नंतर गावकऱ्यानी तात्काळ गाभार्यात विठ्ठल चरणी झोपायची सोय केली. कैकदा देवळे हीच आम्हा भटक्यांची आश्रयस्थाने असतात. पहाटे ५ लाच जाग आली, प्रातःविधी आटोपून हलकासा व्यायाम करून ऐनकरांकडे चहा घेतला नि मेघनाथला घेऊन मग भिमाशंकरच्या दिशेने प्रस्थान केले. पाऊस संततधार चालूच होता. सुरूवातीला बऱ्यापैकी गाडीवाट होती, नंतर ती संपून पाऊलवाट लागली. आम्ही भिमाशंकर अभयारण्यात



प्रवेश केला होता. आता खऱ्या अर्थाने चढाईला सुरूवात झाली. सकाळची वेळ असल्या कारणाने सगळेच उत्साहात भीमाशंकर चढत होते. दुरून पदरगडचा उंच सुळका खुणावत होता. मध्येच एका ठिकाणी सर्वजण चहा पिऊन थोडसे विसावले. पावसाचा जोर वाढतच होता आणि जंगलही आता घनदाट भासू लागले होते. मुसळधार पाऊस, दगडगोटे, पाण्याचे प्रवाह, निसरटा रस्ता अशा वातावरणांत चढाई चालूच होती. एव्हाना पदरगड नजरेच्या टप्प्यात आला. परत एकदा मस्तपैकी चहा मारून फोटो मारत पुढे सरकत होतो.

पदरगडच्या पायथ्याला आम्हाला सोडून मेघनाथ परत गेला. आता खरा कस होता चढाईचा, पण सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात रोज रमणाऱ्या खारघरकरांना कसली आली भिती ? सुसाट वेगात चढाई चालू होती, एव्हाना भटक्यांची वर्दळ वाढली होती. वाटेत परत एकदा चहा पिऊन थोडे विसावलो व परतीच्या प्रवासातल्या एका मावळ्याने त्याच्या ताटातला घास आमच्या सारख्या मावळ्यांना दिला. मित्रहो, दानत लागते किती आहे त्यापेक्षा

आहे त्यातले किती देता येते हे नेहमीच महत्वाचे ठरते. थोडी पोटपूजा झाल्यावर शेवटची चढण संपवून वर पठारावर १२ ला पोहोचलो. १० मिनिटांत भिमाशंकर देवस्थानाच्या प्रवेशद्वारावर पोहोचलो. दर्शनाची अतिप्रचंड रांग बघून मुखदर्शन घ्यायचे ठरवले. अर्ध्या तासांत छानसे दर्शन झाले आणि एक स्वप्न साकारले अशी भावना मनात दाटून आली.

मग निवांत प्रसाद घेऊन पार्किंग गेट गाठले आणि नंतर मोठ्या प्रयत्नाने मंचर गाठले. तिथूनही मोठ्या कष्टाने खारघरसाठी अव्वाच्या सव्वा दरात खाजगी जीप पकडली. रविवार, पाऊस आणि प्रचंड गर्दी यांमुळे अडीच तासाच्या प्रवासाला तब्बल साडे चार तास खर्ची पाडले होते.

या सर्व मोहिमेत एक हाताची जखम सोडता सर्व चढण निर्धोकपणे पार पडली. नाही म्हणायला वाढते वय, वाढते वजन, आळशी जीवनपद्धती आपले रंग दाखवायला लागली आहे असे भासू लागले. भिमाशंकर च्या निभीड खोऱ्यात वारा, वाघ आणि आमच्या सारखे मराठेच फक्त मुक्त संचार करू शकतात. तर असा माझा हा भटकंतीचा प्रवास आणि असे बरेच प्रवास केले, प्रत्येक वेळी वेगळा आनंद आणि वेगळे अनुभव असतात. असा माझा भटकंतीचा प्रवास सादर करण्यास मला संधी दिल्याबद्दल श्री. दत्तात्रय निकम सरांचे मनापासून आभार आणि आयुष्यात पुन्हा कधीही ह्या भटकंतीकारला आवाज द्या मी हजर असेन.....धन्यवाद !

***प्राध्यापक श्री. सुदाम वसंत निकम, भारती विद्यापीठ, सी. बी. डी. बेलापूर.***

असे हे आपले हरहुन्नरी असणारे निकम सर त्यांच्या कॉलेज मधील परिवारासोबत आणि विशेषतः ते तेथे ही मोठ्या प्रमाणात विविध कार्यक्रमात अग्रेसर असतात.



थोडक्यात काय तर ! आपली आवड जपता येणारे खूप कमी लोक असतात, त्यातीलच एक म्हणजे आपले श्री. सुदाम निकम सर, खऱ्या अर्थाने एक ***अवलिया निसर्गात, सह्याद्रीत, माणसात रमणारा, पुस्तके आणि इतिहासात हरवणारा, साधे आयुष्य आनंदात जगणारा - एक खरा भटकंती करणारा.***

अशाच भटकंतीचा आनंद आपण सुद्धा मनापासून घ्यावा ही कल्पना लक्षात ठेवून खास तुमच्यासाठी काही भटकंतीची ठिकाणे. छोट्या वीकेंडसाठी भन्नाट ठिकाण...कदाचित सर्वांच्या माहितीची असणारी ही ठिकाणे. पावसाळ्यात आवर्जुन भेट द्यावी अशा ठिकाणांची माहिती येथे सादर करीत आहोत. नक्की वाचा आणि पावसाळी पर्यटनाचा पुरेपुर आस्वाद घ्या.

वीकेंड आणि सुट्ट्यांचे गणित पाहून दोन-चार दिवसांची छान भटकंती करायची असेल, तर अजूनही वेळ गेलेली नाही. गाडीचे बुकिंगच नाही मिळाले किंवा काही कारणांनी भटकायचे नियोजन करण्याचे राहून गेले, असे काही झालं असेल तर हरकत नाही. गर्दीची ठिकाणे टाळून निवांत वेळ घालवता येईल, अशी काही ठिकाणे आम्ही सुचवत आहोत. तिथे घरगुती निवास आणि भोजन व्यवस्था होऊ शकते. नेहमीपेक्षा वेगळं काहीतरी पाहायचे असेल, तर या ठिकाणांना भेट द्यायला हरकत नाही.

१. **तापोळा, महाबळेश्वर :** महाबळेश्वरजवळचे मिनी काश्मीर अशी ओळख असलेले तापोळा हे एक असेच छान गाव आहे. धुक्यात हरवलेल्या आणि हिरवाईने नटलेल्या इथल्या वाटा आपल्याला स्वतःशी हितगूज करण्याची संधी देतात.





तापोळा, महाबळेश्वर

इथल्या अनेक शेतकरी बांधवांनी कृषी पर्यटनाचा पर्याय आजमावला आहे. इथल्या शेणाने सारवलेल्या अंगणांमध्ये तुमच्या गप्पांचा फड रंगू शकतो.

२. **अहुपे, पुणे-मंचर:** डोंगराच्या कुशीतलं नितांत सुंदर असे अहुपे हे देश आणि कोकणाच्या सीमेवरचे एक टुमदार गाव. पुणे-मंचर-घोडेगाव-डिंभे-माळीण-अहुपे अशा थेट गाडीरस्त्याने तुम्ही जाऊ शकता. अहुपेतली टुमदार घरे आणि मायेच्या माणसांकडे तुमचा निवांत मुक्काम होऊ शकतो. अहुपे घाट, इथली देवराई, दुर्गमता असं सगळंच अनुभवण्यासारखं आहे.



३. **रायरेश्वर पठार :** ऐतिहासिक रायरेश्वर पठार पावसाळ्यानंतर निसर्गाच्या विविधरंगी कारागिरीने सजते. इथले परंपरागत पुजारी असणाऱ्या जंगम वस्तीमुळे रायरेश्वर पठाराला भेट देणे, म्हणजे इतिहास आणि दुर्गम निसर्गपुत्रांचं जगणं जाणून घेण्याची संधीच. जंगमवस्तीत कोणाकडेही निवास आणि जेवणाची छान व्यवस्था होते. रायरेश्वर ते नाखिंद टोक असा ट्रेकही करता येतो. इथल्या ऐतिहासिक मंदिराला भेट देऊन दोन दिवस रायरेश्वराचा मुक्काम छान इतिहासाची उजळणी करण्याची संधी देईल आणि एक छान ठिकाण पाहिल्याचं समाधानही.




४. **तळकोकण, सिंधुदुर्ग जिल्हा :** तळकोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यावर निसर्गानं जणू वरदहस्त ठेवला आहे. नेहमीची ठिकाणं टाळून परूळे, निवती आणि भोगवे या ठिकाणांची सफर केली, तर घरगुती निवास आणि उत्तम भोजनाचे अनेक पर्याय या ठिकाणी आहेत. शांत-निवांत समुद्रकिनारे, मंदिरं, गडकोट यांची सुंदर अनुभव देणारी भ्रमंती तुम्हाला या भागात करता येईल.

५. **जिल्हा नाशिक :** नाशिक जिल्हा म्हणजे गडकोट, मंदिरं, लेणी, सुंदर गावं या सगळ्यांचा खजिनाच. कोळदेहेर, कांचना-मांचना, मोहनदेर, अंजनेरी हे गडकोट आणि त्यांच्या पायथ्यांशी असणारा प्रेमळ पाहुणचार अनुभवायचा असेल, तर ट्रेकचं नियोजन करायलं हवे.






मी स्वतःसुद्धा काही भटकंती केल्या आहेत परंतु माझ्या भटकंती / प्रवास वेगळे आहेत. माझ्या भटकंती तशा साध्या आणि सरळ असायच्या परंतु ही माझी खास आवड (पॅशन) नाही. मला खात्री आहे, आमचे मित्र सुदाम निकम सर यांचा भटकंती प्रवासाचा निखळ आनंद आणि त्यातून त्यांना आलेले अनुभव नक्कीच आवडले असतील.

**प्रवास १२ : व्यावसायिक प्रवास**

वाईल्ड लाईफ श्री. प्रितम गुरव - वाईल्ड लाईफ, पी.जी. एकस्पिडीशन

नमस्कार ! वाचकहो आतापर्यंत तुम्ही निरनिराळे प्रवास वाचले परंतु हा प्रवास कदाचित वेगळा असू शकतो. मी स्वतः खूप छंद जोपासले व त्यासाठी जगलो परंतु माझे करियर इंजिनिअरिंगमध्ये केले कारण इंजिनिअरिंग ही माझी खास आवड (पॅशन) आहे. आयुष्यात असे खूप कमी लोक असतात ज्यांना त्यांची आवड (पॅशन) असलेल्या विषयांमध्ये करियर म्हणून निवडता आले. कदाचित त्यांनी हे निर्णय मोठ्या धाडसाने घेतला असेल. आज आपण असाच एक वेगळा विषय घेवून येत आहोत आणि तो विषय म्हणजे ***व्यावसायिक प्रवास - वाईल्ड लाईफचा.***

माझ्या ह्या प्रवासाचा अनुभव फार कमी आहे. कदाचित ह्या विषयातील सहभाग फक्त **थ्री इडियट** सिनेमा पाहताना प्रेक्षकांचा होता त्याप्रमाणे माझाही जसा **फरहान कुरेशी** आणि **आंद्रे इस्तवान** एवढंच माहीत होते. नाहीतर आम्हाला कुठे माहीत होते हंगेरीतला आंद्रे तर काही गोष्टींची माहिती घेण्यासाठी आपण स्वतः त्यात सहभागी होणे तितकेच महत्वाचे आहे. म्हणतात ना गरज ही शोधाची जननी आहे. मुळात वाईल्ड लाईफ हा आपल्या भारतीयांचा विषयच नसावा कारण आपल्याकडे अशा गोष्टींना कधीच गंभीरपणे घेतले जात नाही, असो हा कळीचा मुद्दा ठरायच्या आत आपण या विषयाला सुरुवात करूया.

या विषयाबद्दल थोडी माहिती वाचकांपर्यंत पोहोचावी त्या उद्देशाने भारत सरकारच्या काही संकेतस्थळाला भेट देवून आपणासाठी ही माहिती गोळा केली आहे. भारत सरकारने आजही काही ठिकाणे खास घोषित केल्यामुळे अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्यानाच्या मार्फत आपण वन्यजीवाना याची देही याची डोळा पाहू शकतो. खास वण्याप्रेमींना आकृष्ट करणारी काही ठिकाणे खालील प्रमाणे:

**१. नागझिरा :** गोंदिया जिल्ह्यातील साकोली तालुक्यात हे अरण्य वसले आहे. १९६९ मध्ये मारूती चितमपल्ली यांच्यामुळे या अभयारण्याची निर्मिती झाली. १५३ चौरस किमी परिसरात वसलेल्या या अभयारण्यात प्राचीन काळी हत्तींचे वास्तव्य असल्याने याला नागझिरा असे नाव पडले. तळ्याभोवती वसलेल्या या जंगलात वनविश्राम गृह आहे. खास विद्यार्थ्यांसाठी टू टायर बेडस् असलेले युथ हॉस्टेलसुद्धा आहे. या जंगलात आढळणारा मुख्य वृक्ष म्हणजे साग. त्याचबरोबर धावडा, तीवस, ऐना, जांभूळ, बिजा इत्यादी वृक्ष आढळतात. तळ्याच्या काठावर आणि टेकडीवर, तसेच जंगलामध्ये अनेक ठिकाणी वनखात्याने निरीक्षण मनोरे तयार केले आहेत. वाघ, बिबटे, रानकुत्री,



अस्वले, नीलगाय, चितळ, सांबर, भेकर, कोल्हे असे विविध प्राणी आणि धनेरा, सर्पगरूड, सातभाई, स्वर्गीय नर्तक, वेडा राघू असे पक्षीही आढळतात.

**२. ताडोबा राष्ट्रीय उद्यान :** नागपूरपासून १५० कि.मी.वर चंद्रपूर आहे. याच जिल्ह्यात हे उद्यान येते. चंद्रपूरपासून येथे जाण्याकरता ४५ कि.मी. प्रवास करावा लागतो. उष्णकटीबंधीय शुष्क पानझडीचे जंगल या प्रकारात हे जंगल मोडते. यात मोह, बेगडा, अमलतारा, तेंद, बांबू, हिरडा इत्यादि. वृक्ष आहेत. अनेक सरपटणारे प्राणी, सरडे, विविध फुलपाखरे तसेच जलाशयातील मगर हे इथले खास आकर्षण आहे. इथल्या तळ्याकाठी निवासस्थाने असून, रात्री किंवा सकाळी तळ्याच्या काठावर बसून अनेक प्राणी-पक्षी न्याहाळता येतात.

**३. पेंच राष्ट्रीय उद्यान :** नागपूरपासून ६५ कि.मी. अंतरावर जबलपूर रस्त्यावर पेंच नदीच्या तीरावर हे उद्यान वसले आहे. साग, शिसवी, ऐन, तीवस, मोह, खर ही प्रमुख झाडे येथे पाहायला मिळतील. जवळपास २०० जातींचे पक्षी या उद्यानात आढळतात. नागपूर जिल्ह्यातील गोलिया पहाड हे उंच शिखर उद्यानाच्या पूर्व भागात आहे. सिलारी, तोतलाडोह, राणीडोह इथे विश्रामगृह उपलब्ध आहेत.

**४. मेळघाट :** अमरावती जिल्ह्यातील सातपुड्याच्या दक्षिणेकडील रांगांच्या परिसरात मेळघाटात सर्वाच्या परिचयाचा व्याघ्र प्रकल्प वसलेला आहे. मेळघाटातून सिपना, खंडू, खापरा, डोलारा आणि गंडगा या पाच नद्या वाहतात. चोहोबाजूंनी आलेल्या घाटांचा मेळ असा हा मेळघाटचा अर्थ होतो. १५९७ चौ.कि.मी इतके क्षेत्र या प्रकल्पात मोडते. साग विपुल प्रमाणात असणाऱ्या या जंगलात घाणेरीच्या घनदाट जाळ्या आणि बांबूंची बेटंही विराजमान आहेत. राहण्याची सोय असून, जंगलातून रात्री फेरफटका मारण्यासाठी मिनी बस आहेत. भेकर, सांब, गवे येथे विपूल प्रमाणात आढळतात.



**५. राधानगरी-दाजीपूर :** सह्याद्रीच्या मुख्य रांगेवर म्हणजेच कोल्हापूर-फोंडा रस्त्यावर ४८ कि.मी. अंतरावर हे अरण्य वसले आहे. येथे पिसा, जांभूळ, आंबा, हिरडा असे वृक्ष आढळतात. त्याचबरोबर रानकोंबड्या, बिबटे, खवली मांजरे, रानडुकरं येथे आढळतात. येथे राहण्याची उत्तम सोय आहे. त्यामुळे किमान तीन दिवस तरी येथे भेट द्यायला हरकत नाही.



**६.** याव्यतिरिक्त नवे गाव बांधा, रेहेकुरी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यन, भीमाशंकर, कर्नाळा अभयारण्य, तानसा, किनवट, सागरेश्वर अशी अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने महाराष्ट्रात वसलेली आहेत.

अशी सुंदर नयनरम्य राष्ट्रीय उद्याने असलेल्या एखाद्या तरी उद्यानाला भेट द्यायची इच्छा झाली आणि मग काय....म्हणतात ना ज्यांना हौस आहे त्यांना मौज कशी करायची हे सांगावे लागत नाही. माझ्या बाबतींत सुद्धा

असेच काहीतरी झाले. माझ्या सोसायटीतील आमचा **एलिटस ऑफ वाटिका** नावाचा ग्रुप होता. त्यातील काही




हौशी कलाकारांनी, नाही ! नाही ! कलाकार तर नक्कीच म्हणता येणार नाही, मग काय बरं करामत बहदारांनी ताडोबा व्याग्र प्रकल्पाला जायची योजना तयार केली होती. मला सुद्धा विचारण्यात आले होते, मला काय माझ्या एलिट मित्र परिवारासह फिरायला जायचे ही एक उत्तम संधी वाटली आणि मी लगेच हो म्हणून तयार झालो. मग काय



तयारी सुरू झाली मग कसे जायचे? कुठे रहायचे? आमची ताडोबा जंगल सफारी ला जाण्याची तयारी झाली, त्याचे सर्व बुकिंग पूर्ण झाले. आमची ही जंगल सफारी **पी जी एक्सपीडिशन [PG Expedition]** च्या मदतीने आयोजित केली होती. त्याच्या पुढे जे झाले ते आयुष्यभर स्मरणात राहील अशा आठवणी होत्या त्या जंगल सफारीच्या. त्याच्या काही आठवणी म्हणून काही खास फोटो फक्त आपल्या सर्वांसाठी. आम्हा सर्वांसाठी हे सर्व एकदम वेगळे होते. मग काय सकाळी चार वाजता उठणे असो आणि सफारी जीप मध्ये जावून बसणे. जंगलातील सफरीची मजा काही वेगळीच होती. आमच्या टीममध्ये मी सोडले सगळे चांगले फोटोग्राफर होते हे तुम्हाला फोटो पाहून समजले असेलच. ते चार दिवस कदाचित आयुष्यातील एका उत्तम आठवणी प्रमाणे होते कारण चंद्रपूरला ताडोबा अभय अरण्यात मोबाईल ला नेटवर्क नसायचे. ना कोणाचे फोन ना कोणी आम्हाला तसदी द्यायला. हो पण ह्या काळात घरी तर बोलायलाच पाहिजे, सहारा होता एम टी एन एल (MTNL) मोबाईलचा. रात्री त्याला कधी कधी नेटवर्क मिळायचे. तशी आमची सफारी खास अशी होती कारण बरेच चांगले प्राणी,पक्षी पाहायला

मिळाले. पण ज्याच्या दर्शनसाठी आस लावून होतो त्याचे दर्शन मात्र झाले नाही - तो म्हणजे वाघोबा. त्यात खासकरून मला तर त्याचे दर्शन झाले नाही काहींना संधी मिळाली, तेव्हा कळले की ज्याला काय पाहायचे असे म्हणतो तो येथे येवून पाहायला मिळाला नाही. पण एक वेगळा अनुभव होता. तेव्हा माझ्या मनात एक विचार येवून गेला की आपण पण काहीतरी करायला हवे जंगल सफारीसाठी - कदाचित लोकांना सांगू, ह्याची जाहिरात करू आणि असे बरेच काही परंतु मी सुरुवातीला सांगितले होते ना की ह्या गोष्टीबद्दल भारतीय लोकांमध्ये थोडा उस्ताह कमीच आहे. बाकी मी काही जास्त करू शकलो नाही. मी तसा प्रयत्न खूप केला पण मला काही जास्त यश आले नाही. परंतु मग **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** ने मला हा लेख लिहिण्याची संधी दिली.

आज आपण अशा व्यक्तीला भेटणार आहोत आणि जाणून घेणार आहोत त्यांच्या ह्या प्रवासाबद्दलचा त्यांचा अनुभव. चला तर मग जाणून घेऊया - व्यावसायिक प्रवास, वाईल्ड लाईफ बद्दल, **श्री. प्रितम गुरव, पी जी एक्सपीडिशन [PG Expedition]**. हा प्रवास त्यांच्या शब्दात.



मुळात मला लहानपणा पासून प्राण्यांची खुप आवड होती, त्यांच्या बद्दल खूप काही जाणून घ्यावेसे वाटायचे. मनात विचार यायचं हे सर्व कसे जमणार. मोठ्या मोठ्या वाईल्ड लाईफ फोटोग्राफर ना पाहून प्रेरणा वाढली. मग येथे फोटोग्राफी करायला सुद्धा मिळणार म्हणून ह्या मध्ये करियर करायचे ठरवले. मग फोटोग्राफी चालू केली सुरुवातीला सगळीकडून फिरून फोटो काढणे चालू मग विचार केला की आता प्रोफेशनल फोटोग्राफी करावी मग आयुष्याला थोडे वेगळे वळण मिळेल. तिथून सुरु झाला **पी जी एक्सपीडिशन [PG Expedition]** प्रवास आणि हा प्रवास अविरतपणे चालू आहे. ह्या प्रवासाने मला प्रत्येकवेळी नव-नवीन प्रवासी परिचय होते गेले, मित्र जोडत गेलो आणि आज मी खूप श्रीमंत आहे माझ्या मित्र परिवाराने.

मे महिना उजाडला होता दरवर्षीप्रमाणे आम्ही वाईल्ड लाईफ - वाघोबाच्या जंगलात ताडोबा व्याग्र प्रकल्प, चंद्रपूर येथे १० लोकांचा ताफा घेऊन सफरीला निघालो होतो. तिथे दुसऱ्या दिवशी सगळे मस्त तयार होऊन पहिल्या दिवसाच्या जंगल सफरीला दोन्ही गाड्या वाटेवरून निघाल्या होत्या. निरनिराळे पक्षी व त्यांचा किलबिलाट ऐकत

आम्ही एक एक टप्पा पार करत होतो. काही वानरांचा कळप दिसला. मग त्यांना मागे टाकत पुढे सरकलो, पुढे हरण सांबर, गवे, असे विविध प्राण्यांनी दर्शन दिले परंतु वाघोबाचा काही पत्ता नाही.

वाघ ! या नावातच किती दरारा आहे ना आणि समजा अचानक तो समोर आला तर काय परिस्थिती होईल? त्याने जर चुकून गाडीवर उडी मारली तर? किंवा मग झाड-झुडपात असलेल्या प्राण्यावर झेप मारली तर काय होईल? असे विचार कदाचित सगळ्यांच्या मनात येतात जेव्हा वाघोबा समोर येतो. कदाचित हे विचार सगळ्यांच्या मनात येत असावेत. पण सगळीकडे सगळ्यांप्रमाणे आम्ही सुद्धा वाघोबाचा मागोवा घेत होतो (आमच्या सोबत आलेले फडके काकांना वाघोबाचा फोटो घ्यायचा होता). ह्याच्या अगोदर सुद्धा त्यांनी वाघाला जंगलात पाहिले होते तेव्हा मात्र त्यांना त्यांचे चित्रीकरण किंवा मग फोटो काढता आला नव्हता. त्यांनी मला आधीच सांगितले होते की मला कधीतरी संधी मिळाली तर एक छानसा फोटो टिपायचा आहे त्या वाघोबाचा. त्यांनी मी सांगितले की आपण नक्कीच प्रयत्न करू म्हणुन कारण वाघाला कॅमेऱ्यात टिपणे तितकं सोपं काम नाही जितके ते वाटते. कारण तो त्याच्या मनात येईल तेव्हा दर्शन देऊन जाईल असा माझा समज होता. पण खरं तर हा समज नव्हता ते तेवढंच सत्य आहे. अशा पद्धतीत वाघोबाच्या प्रतीक्षेत आमचा जंगल सफारीचा प्रवास चालू होता. आता जंगलातून परतण्याची वेळ झाली होती. अंधार पडत चालला होता. आम्ही परतीचा प्रवास करत आमच्या आश्रय स्थानी आलो.

दुसऱ्या दिवसाची पहाट उजाडली पुन्हा आम्ही सगळे जंगलाकडे निघालो. पुन्हा तीच नवी उमेद, तसाच प्रवास सुरुच राहिला, काही हरणाच्या कळपातून वाघोबाच्या येण्याचे संकेत मिळू लागले. आमच्या निराश चेहऱ्यावर उमेदीचे ढग फेऱ्या मारू लागले. आम्ही ताडोबा जंगलातील तलावाकडे सुद्धा निघालो. ताडोबाच्या जंगलांत ३-४ मोठे मोठे तलाव आहेत त्यात तेलिया, तारू, पांढरपोनी अशी त्यांची नावे आहेत. पण तिथे सुद्धा आमच्या हाती काहीच लागले नाही, आमच्या हाती निराशाच आली. आता आम्हाला काहीच सुचेनासे झाले होते. ड्राइवर सांगत होता कदाचित वाघ आता नसावा नाहीतर प्राण्यांनी आतापर्यंत त्याच्या येण्याचे संकेत दिले असते, पक्षी ओरडून, हरीण एकतर जमिनीवर पाय आपटतात किंवा एका विशेष प्रकारचे आवाज करतात. सगळ्यांची निराशा वाढत होती कारण सलग दोन दिवस फिरून ही वाघोबा दर्शन देत नव्हता.



आता काय आमच्याकडे फक्त शेवटच्या दोन सफारी शिल्लक होत्या. तेव्हा मी तेथील एका टूर गाईड बरोबर चर्चा करत होतो, तेव्हा तो म्हणाला ताडोबाच्या जंगलातील **वाघडोह** आणि **शिवा** यांचे बफर झोन मध्ये सायटिंग झाले आहे. तेव्हा मी माझ्या ग्रुप बरोबर चर्चा करून निश्चय केला की

आज आपण जंगलाच्या बफर झोन मध्ये जायचे. आम्ही सगळे निघालो साधारणपणे दुपारचे ३:३० वाजून गेले होते. काय म्हणाला बफर झोन म्हणजे काय ? अरे ! बरोबर आहे हा प्रश्न तुमच्या मनात येणे स्वाभाविक आहे, कारण कदाचित ही तुमचीसुद्धा पाहिली जंगल सफारी असेल. बफर झोन म्हणजे जंगला बाहेरचा भाग जिथे जंगलाशी निगडित काम करणारी माणसे राहतात. आम्ही बफर झोन कडे निघालो आणि अजूनही आम्ही असेच फिरत होतो. उन्हाळा असल्यामुळे आणि ४५ अंश च्या वर तापमान गेल्याने आम्हाला तहान आणि उन्हाचे चटके





खूप लागत होते. आम्हाला वाघ काही दिसला नाही. मला आमच्या ग्रुप मधल्या लोकांच्या मनातील भावना जाणवत होत्या, एवढ्या लांब आलो आणि जर वाघ दिसला नाही तर सगळ्यांना काय सांगायचे. मला अशा गोष्टींची सवय झाली होती. इथे लोक खूप अपेक्षा घेऊन येतात आणि ह्या जंगलातील आनंदी क्षणांचा आनंद घेण्यासाठी विसरून जातात. इतक्यात ५०-६० फूट लांब सुकलेल्या झाडीमध्ये मोठा काळा दगड दिसला, मी पटकन आमच्या गाडीच्या ड्रायव्हरला गाडी थांबावं असे सांगितले. आम्ही नीट पाहिले तेव्हा कळले तो काळा दगड नसून अस्वल आहे आणि नुसतं एक अस्वल नसून त्याच्या त्या अस्वलाच्या पाठीवर पिल्लू आहे. पुन्हा एकदा निराशाच हाती लागली, असे वारंवार प्रयत्न करूनही वाघोबाचे दर्शन काही झाले नाही. मनात गुन्हेगार असल्याची भावना आली आणि थोड्याच वेळात २ वाघांनी आम्हा सर्वांना दर्शन दिले. सगळ्यांना इतका आनंद झाला की आम्ही सर्वांना हवा-हवा असणारा वाघोबा दाखवू शकलो आणि फडके काकांनी मनमुरादपणे वाघोबा आपल्या कॅमेऱ्यात टिपला. अशा बऱ्याच चांगल्या-वाईटघटनांचा मी साक्षीदार होतो, परंतु प्रत्येकवेळी असे होतेच असे नाही बरे का मित्रांनो !



नंतर हळू-हळू जेव्हा **पी. जी. एक्सपीडिशन [PG Expedition]** नावारूपाला आली तेव्हा

मात्र आम्ही एक नवीन प्रकार सुरु केला. प्रत्येक सफारीनंतर रात्री आम्ही आमच्या टीमला जंगलाची माहिती देणे, प्राणी, पक्षी, वाघ, हत्ती, सांबर यांचे आम्ही काढलेल्या फोटोचे प्रेसेनटेशन द्यायला सुरुवात केली. नवीन नवीन फोटोग्राफी ट्रिक्स टीमला शिकवणे, काही वेगळ्या प्रकारचे फोटो क्लिक करून दाखवणे जोमात चालू होते. पी. जी. एक्सपीडिशन आता आपले अस्तित्व टिकवून वाईल्ड लाईफ, प्रोड्क्ट फोटोग्राफी, प्री-वेडिंग फोटोग्राफी, वेडिंग - फोटोग्राफी आणि व्हिडीओ शूट ची कामे अगदी जोरात चालू आहेत.



वाईल्ड लाईफ फोटोग्राफी करताना माझा परिचय अशा एका व्यक्तीबरोबर झाला त्याने माझे जीवनच् बदलून गेले. ती परिचित व्यक्ती दुसरी-तिसरी कोणी नसून माझ्या आयुष्याची भागीदार सौ. प्राजक्ता त्रंबके-गुरव. प्राजक्ताची साथ मला खूप मोलाची झाली कारण तिचे आणि माझे पॅशन एकच होते ते म्हणजे फोटोग्राफी. त्याचा उपयोग आम्हाला **पी. जी. एक्सपीडिशन [PG Expedition]** च्या यशस्वी प्रवासात झाला कारण प्राजक्ता स्वतः नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फोटोग्राफी येथून फोटोग्राफी मध्ये शिक्षण घेतले आहे, मल्टी मीडिया, ॲनिमेशन आणि अँडवान्स सिनेमॅटिक प्रकारात पारंगत आहे. तिने काढलेले काही फोटोग्राफ्स आपणासमोर सादर करींत आहे.













प्राजक्ताची माझ्या प्रवासातील साथ फार मोलाची आहे. तिचा पार्टनरशिपला सलाम ......धन्यवाद !




थोडक्यात काय तर ! तुम्हाला तुम्ही तुमचे पॅशन करियर म्हणून निवडता करता येईल परंतु त्यासाठी लागणारा त्याग क्रमप्राप्त आहे पण त्यातून मिळणारा आनंद त्यापेक्षा खूप जास्त आहे. जर तुम्हाला आवडणारे काम तुम्ही जर मनापासून केले तर तुम्हाला मिळणारा आनंद, यश आणि प्रसिद्धी हे सर्व अमूल्य आहे. तुम्हाला तुमच्या प्रवासात जर अशी सोबत असेल तर जीवनाच्या प्रवासाची मजा काही औरच आहे.

मी काही लेखक वगैरे नाही कारण माझे ते पॅशन नाही. पण मला माझ्या पॅशन बद्दल लिहायला मिळाले हेच कदाचित माझे यश असेल असे मी समजतो. तसेच माझे मित्र श्री. दतात्रय निकम यांच्या **प्रवास आणि परिचय- पासपोर्ट आठवणींचा** मुळे मला ही संधी दिल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार.

धन्यवाद !

श्री. प्रितम गुरव.

वाईल्ड लाईफ फोटोग्राफर,

पी. जी. एक्सपीडिशन [PG Expedition] - pgphotography3@gmail.com

**प्रवास १३ : शैक्षणिक प्रवास**

श्री. दिलीप पवार

आयुष्यात काही प्रवास हे एक लक्षणीय अनुभूती म्हणून समोर उभे राहतात त्यातून मिळणारे समाधान मोजण्याचे प्रमाण कदाचित उपलब्ध नसेल. अशाच एका लक्षणीय प्रवासाचे साक्षीदार होणाचे भाग्य मला मिळाले ते माझ्या शैक्षणिक प्रवासी परिचित **श्री. दिलीप नागेशराव पवार** सरांमुळे, त्यांनी केलेले मार्गदर्शन जणू एक बाळकडू होते. हाच अनुभव मला माझ्या आयुष्यात आजही खूप कामी येत आहे.



तर आज आपण सरांचा शैक्षणिक प्रवास जाणून घेणार आहोत. सध्या **पवार सर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, सी बी डी, बेलापूर** येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. सरांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवासात खूप गोष्टी आत्मसात केल्या आहेत आणि ह्या वयात सुद्धा त्यांचा उत्साह अवाक करून सोडतो. आपल्या २५ वर्षाच्या शैक्षणिक प्रवासानंतर सुद्धा ते एका कॉलेज कुमारसारखे पी. एच. डी इन कंट्रोल सिस्टिम करण्यात मग्न आहेत. एवढा अनुभव आणि कदाचित शिक्षणाची ओढच जणू त्यांना प्रेरणा देत असावी. परंतु त्यांचा हा प्रवास जाणून घेण्यासाठी मी सुद्धा तुमच्या इतका उत्सुक आहे. चला तर मग साक्षीदार होऊया एक विलक्षण प्रवासाचे. त्यांचा हा प्रवास त्यांच्या शब्दात.

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा शैक्षणिक प्रवास हा त्याच्या बालवाडीच्या प्रवेशापासून सुरू होतो. परंतु आमच्या काळात बालवाडी किंवा अंगणवाडी अस्तित्वात नव्हती. माझ्या बाबतीत तर माझे घर म्हणजेच शाळा होती कारण माझे आई आणि वडील दोघेही प्राथमिक शिक्षक होते. त्याकाळी आमच्या गावात आमच्या शाळेला स्वतः ची अशी इमारत नव्हती. गावातील लोकांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करून शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. त्या मुळे माझी बालवाडी हे माझे घरच होते. मी जेव्हा पहिलीच्या वर्गात शिकत होतो त्यावेळी माझी आईच माझी वर्गशिक्षीका होती. माझे सौभाग्य हे की मला पहिली ते चौथी पर्यंत आईच्या मार्गदर्शनाखाली शिकावयास मिळाले व तिथेच माझ्या जीवनाचा खऱ्या अर्थाने पाया रचला गेला.

पुढे चौथी पास झाल्यावर मी हायस्कुल मध्ये प्रवेश घेतला इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंत आमच्याच गावात हायस्कुल मध्ये माझे दहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. या काळात ज्या शिक्षकांनी माझ्यावर संस्कार केले, त्या आठवणी माझ्या मनात अजून ताज्या आहेत. श्री. बी. व्ही. पाटील, मुख्याध्यापक, तसेच श्री जमादार - वर्गशिक्षक, श्री. व्यास - गणिताचे शिक्षक, श्री. पाटील - हिंदीचे शिक्षक, श्री.सुतार - इंग्रजीचे शिक्षक या सर्वांचे माझ्या व्यक्तिगत जडणघडणी मध्ये मोठा वाटा आहे. माझी एक खास आठवण सुद्धा आहे, पाचवीला असताना आमची सहल गोव्याला जायची होती. आमच्याबरोबर काही शिक्षक व श्री. बी. व्ही. पाटील सर, आणि बरोबर पाचवी ते दहावीचे सर्व विध्यार्थी ठरल्याप्रमाणे गोव्याला गेलो होतो. तिथे आम्ही चर्च, बीचेस पाहताना पाटील

सरांनी आम्हा सर्वांना एक प्रश्न विचारला तुम्हाला गोव्यात तुम्ही जास्त संख्येने काय पाहिले?. त्यावर अनेकांनी परदेशी पर्यटक, मोटारसायकल आणि असे बरेच काही अशी उत्तरे दिली परंतु सरांचे काही समाधान झाले नाही. त्यांनी माझ्याकडे एक कटाक्ष टाकताच मी उत्तरलो नारळ, सुपारीची झाडे जास्त संख्येनं पाहायला मिळाली, सरांची माझ्या उत्तराबद्दल मला शाबासकी दिली. पुढे जेव्हा दहावीला वर्गात प्रथम क्रमांक आणि प्रथम श्रेणीत पास झाल्यावर पाटील सर व इतर शिक्षकांनी  विज्ञान शाखा निवडण्यास सांगितले. त्यानंतर माझा प्रवास कृष्णा महाविद्यालय, शिवनगर येथे अकरावी मध्ये प्रवेश घेऊन सुरु झाला.

अकरावी व बारावी या ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकत असताना श्री. चव्हाण, भौतिकशास्त्राचे (फिजिक्सचे) शिक्षक, श्री. पाटील - गणिताचे शिक्षक, तसेच श्री. नलावडे - रसायनशास्त्राचे (केमेष्ट्री) शिक्षक,  अशा मान्यवर शिक्षकांच्या मार्गदर्शन, तसेच त्यांच्या शिकवण्याच्या शैलीचा आजही मला फायदा होत आहे.

मी ज्युनिअर कॉलेज मधून प्रथम श्रेणीत पास झालो आणि पुढील उच्च शिक्षणाला जायची तयारी करत होतो.पर्याय बरेच होते पण माझ्या वडिलांची ईच्छा होती की मी अभियांत्रिकीला प्रवेश घ्यावा व पूढे जाऊन क्लास वन (**CLASS I**) अधिकारी व्हावे. तेव्हा विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु झाली होती. मग एक दिवस मी, माझे वडील व माझे भाऊजी आम्ही माझ्या प्रवेशासाठी कोल्हापूरच्या डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी कॉलेजमध्ये इलेक्ट्रोनिक्स शाखेत प्रवेश घेतला. खरे सांगायचे तर सर्वाचे मत होते की मी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर व्हावे. इंजिनिअरिंग मध्ये शिकत असताना डॉ. वायगणेकर, डॉ. सावंत, डॉ. निकम, या शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांच्या एकंदरीत विचारशैलीने आमच्यात बदल घडवून आणला. त्यांची व्याख्याने (लेक्चर) म्हणजे जणू एक पर्वणी असयाची आम्हा सर्व विद्यार्थ्यांना, तसेच आमचे विभाग प्रमुख प्रा. टेंगशे यांचे व्याख्याने (लेक्चर) अतिशय उदभोदक व सर्वसमावेशक असे असायचे. टेंगशे सर इलेक्ट्रॉनिक सिस्टिम डिजाईन हा विषय शिकवत. सरांचा या विषयातील अनुभव पाहून आम्ही थक्क होउन जात. तसेच त्यांना आम्ही चालता बोलता कॅलक्यूलेटर म्हणत असू. माझे भाग्य की मला अशा निष्णात प्राध्यापकाकडून मार्गदर्शन लाभले.

पुढे इंजिनीअरिंगचे शिक्षण पूर्ण केल्यावर नोकरीसाठी मी पुण्यात आलो. तेथे एका खासगी कंपनीत नोकरीस लागलो पगार अगदी जेमतेम होता परंतू त्या पगारात सुद्धा मी आनंदात असे. नंतर जेव्हा माझे लग्न झाले तेव्हा मी नोकरी बदलायचे ठरवले. त्याच दरम्यान मी पिंपरीच्या वाय. बी. पॉलिटेकनिक मध्ये व्याख्याता (लेक्चरर) म्हणून रुजू झालो. तेथे प्रा. कुलकर्णी विभाग प्रमुख होते. त्यांच्या बरोबर अनेक इलेक्ट्रॉनिक् सर्किट्स डिझाईन व डेव्हलपमेंट चे काम केले. हे काम करणे मला शक्य झाले ते माझ्या इंडस्ट्रियल अनुभवामुळे मला रोज हजारो रजिस्टर्स तसेच कॅपेसिटर, प्रवर्तक (इंडक्टर), स्टेपर मोटर असे सुटे भाग तपासणे, एकत्र  जोडणे (असेंब्लीग) करून चाचणी (टेस्टिंग)  करावयाची संधी मिळाली.

दरम्यानच्या काळात भारती विद्यपीठ पॉलिटेक्निकची जाहिरात आली होती व मी त्या जागेसाठी अर्ज केला. मला मुलाकातीसाठी बोलावणे आले व मी मुलाखत दिली. मुलाखती दरम्यान डॉ. एस. एस. कदम सरांनी मला आवर्जून सांगितले की तुम्हाला आम्ही ही संधी देतो परंतु तुम्हाला मुंबईत जावे लागेल. मला शिक्षणाची आवड

असल्यामुळे ही मोठी संधी हातातून जाऊन द्यायची नाही त्यामुळे मी लगेच होकार दिला आणि मुंबईसाठी प्रयाण केले. मी भारती विद्यापीठ पॉलिटेक्निक मध्ये अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो. तेथे मी अधिव्याख्याता म्हणून काम करत असताना पोस्ट ग्रॅज्युएट करावे असे वाटले. मी त्याप्रमाणे सांगलीच्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात पोस्ट ग्रॅज्युएशन साठी अर्ज केला. भारती विद्यपीठ मॅनेजमेन्टच्या सहकार्यामुळे मला एम.ई. चा अभ्यासक्रम पूर्ण करता आला. सदर अभ्यासक्रम करत असताना डॉ. इनामदार माझे गाईड होते, त्याचबरोबर डॉ. बापट, डॉ. मराठे, डॉ. ठक्कर या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. डॉ. इनामदार माझे गाईड होते आणि त्यांनी माझ्याकडून खुप छानपणे काम करून घेतले. त्या काळी विंडोज-१९९५ नुकतेच बाजारात आले होते व माझा एक मित्र आय. आय. टी. मुंबई येथे एम. टेक करत होता. त्याच्या सहकार्यामुळे व डॉ. इनामदार यांच्या मार्गदर्शनामुळे मला मॅटलॅब सॉफ्टवेयर वापरून माझे सिस्टीम सिमुलेशन व ऑप्टिमेशन वरील डेझरटेशन रिपोर्टचे काम पूर्ण करता आले. हे काम करताना माझी कल्पकता पूर्णपणे पणाला लावून हे काम पूर्ण केले ह्याचा प्रत्यय तेव्हा आला जेव्हा डॉ. इनामदार सरांनी माझे डेझरटेशन रिपोर्ट पाहून माझे कौतुक केले. त्याचबरोबर मला पुढील पी. एच. डी. शिक्षणासाठी गाईड होण्याची तयारी दर्शवली. हेच माझ्या यशाचे गमक असावे कारण जे मी ठरवले होते ते मिळवण्यासाठी ते प्रयत्न कामी आले. कदाचित माझ्यावरचा विश्वास हाच माझा पुरस्कार आहे असे मी मानतो. हीच माझ्या विचारांची शिकवण घेऊन मी माझ्या सर्व विद्यार्थ्यांना घडविण्याचा सार्थ प्रयत्न केला आणि ते प्रयत्न सफल झाले. मुलांकडून नविन-नवीन गोष्टी करून घेणे, नवीन टेकनोलॉजिचा वापरून प्रोजेक्ट पुर्ण करून घेणे, नवीन नवीन प्रयोग करणे आता नित्याचे झाले आहे.

माझ्या एम. ई. च्या काळात माझे विभाग प्रमुख पदवीत्तर शिक्षणासाठी देशाबाहेर गेले त्यामुळे विभागाची जबाबदारी माझ्यावर आली. ही जबाबदारी पार पाडत असताना उपकरणीकरण (इन्स्ट्रुमेंटशन) विद्यार्थ्यांना कंट्रोल सिस्टिम हा विषय शिकवत होतो. त्याकाळी माझ्या संपर्कात आलेला व अजून पर्यंत संपर्कात असलेला एक गुणी, मेहनती, हरहुन्नरी (तेव्हाचा थोडा खट्याळ) विद्यार्थी म्हणजे दत्तात्रय निकम, त्याचे मित्र अमित अटक, किशोर परदेशी आणि निलेश जाधव इत्यादी मला अजून आठवतात. कारण जेव्हा या बॅचसाठी मी निलेश जाधव च्या वडिलांच्या सहकार्याने रसायनीच्या **हिंदुस्तान ऑरगॅनिक केमिकेल (HOC)** मध्ये इंडस्ट्रियल व्हिजिटला घेऊन गेलो होतो तेंव्हा या सर्व विद्यार्थांनी खूप धमाल केली होती व व्हिजिट दरम्यान सय्यम, शिस्त पाळून ज्ञानार्जन केले. त्याच्याशी आता जास्त संपर्क नाही पण दत्तात्रय कडून अधून मधून माहिती घेत राहतो.

१. निलेश जाधव- संपूर्णपणे आपल्या व्यवसायात यशस्वीपणे काम करत आहे.

२. अमित अटक - इंटरनॅशनल कंपनीत डिजाईन इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे.

३. किशोर परदेशी- स्वतः ची इंजिनीअरिंग कंपनी चालवतो आणि समाजातील लोकांना चांगले जॉब देत आहे.







निलेश जाधव अमित अटक किशोर परदेशी

असा हा निर्धास्तपणे प्रवास चालू असताना भारती विद्यपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाची जाहिरात आली होती व त्यामध्ये उपकरणीकरण विभागात अधिव्याख्याकाची जागा भरायवायच्या होत्या. आमचे बी. व्ही. आय.टी चे प्राचार्य. प्रा. इनामदार सरांनी मला अर्ज करण्यास सांगितले त्याप्रमाणे मी अभियांत्रिकीच्या यु. जी. सी. मुलाखत दिली व माझी अधिव्याख्याता म्हणून निवड झाली. त्याच वर्षी वर नमूद केलेला माझा विद्यार्थी दत्तात्रय निकम सुद्धा त्याच वर्षी आपला डिप्लोमा पूर्ण करून पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. आमची जोडी पुन्हा एकत्र आले होते. मी बी. ई. च्या वर्षी ए. सी.एस (**ऑटोमॅटिक कंट्रोल सिस्टिम**) विषय शिकवला होता. त्यावेळी सुद्धा दत्तात्रय च्या मूळ स्वभावाचे दर्शन झाले. त्याचे हिरारीने विभागाच्या उपक्रमात भाग घेणे, उदा. इंफिनिटी यामध्ये प्रोजेक्ट प्रेझेंटेशन तसेच पेपर प्रेझेन्टेशनचा समावेश असे. तसेच त्या वर्षीच्या बॅचमधील विध्यार्थी व दत्ताचा सहभाग उल्लेखनीय होता. त्यानंतर अशा पद्धतीचे बरेच विद्यार्थी माझ्या हाताखालून शिकून गेले आणि आजही माझे ज्ञानदानाचे काम जोमात चालू आहे.

सहा वर्षांपूर्वी दत्ता माझ्याकडे प्रोजेक्ट प्लॅनिंग या विषयावर काहीतरी लिहावे असे मनोमनी वाटत असणणारी पुस्तकाची कल्पना घेऊन आला होता. कारण हा विषय खूप महत्वाचा आहे व सदर विषयावर खूप अशी पुस्तके उपलब्ध नव्हती आणि जी होती ती खूप महाग होती. खूप विचार विनियांनानंतर आम्ही दोघांनी मिळून असे ठरवले की पहिल्यांदा वार्षिक अभ्यासक्रम पडताळणी करू, जर काही बदल आवश्यक वाटले तर ते करून घेवु आणि मग सर्व लिखाणाचे काम सुरू करूया. तेव्हा आम्ही ***फंडामेंटल ऑफ प्रोजेक्ट प्लॅनिंग आणि इंजिनीअरिंग (Fundamentals of Project Planning and Engineering)*** वर पुस्तक लिहावयाचे ठरवले. मी स्वतः हा विषय चार वर्ष शिकवला असल्याने भरपूर नोटस उपलब्ध होत्या. शिवाय दत्ता स्वतः डिटेल आणि डिजाईन इंजिनीअरिंग कंपनीत कामाला असल्याने त्याला ह्या विषयाची चांगली माहिती होती. मग आम्ही पेनराम प्रकाशन चे **श्री. प्रिन्स** यांच्याशी संपर्कात राहून ह्या पुस्तकाच्या संमधीत फॉलोअप घेतला. त्यांनी लगेच होकार दिल्यावर त्यांच्याबरोबर एक एम. ओ. यु (**मेमोरडम ऑफ उंडरस्टॅण्डिंग**) केले व पुस्तकांच्या कामात बुडून गेलो.

सदर कामात विभागाच्या प्रमुख प्रा. कोहली मॅडम तसेच प्राचार्य. शेख सर व सर्व सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या वर्षी जून २०१७ मध्ये आमचे हे पुस्तक प्रकाशित झाले.

आज पर्यंतचा माझा हा शैक्षणिक प्रवास मी थोडक्यात तुमच्या समोर सादर केला. प्रत्येक वळणावर ज्यांनी मला मार्गदर्शन केले त्या सर्व व्यक्ती आज हयात नाहीत तर या सर्वांना मानाचा सलाम करतो, ज्यांच्यामुळे मी आज घडलो.

थोडक्यात काय तर ! जर तुम्ही विचारांचे पक्के असाल, एक ध्येय, उद्दिष्ट्य असेल, शिकण्याची तयारी, योग्य मार्गदर्शन मिळाले तर तुमचे ध्येय तुम्ही नक्कीच गाठू शकता. ह्या प्रवासात मी माझ्या विद्यार्थी दत्तात्रय निकम ह्या विद्यार्थ्यचा विशेष उल्लेख केला कारण माझ्या हाताखाली खूप जणांनी मार्गदर्शन घेतले आज ते चांगल्या पदावर कार्यरत आहेत परंतु दत्तात्रय ची त्याचा कामावर असाणारी निष्ठा व त्यासाठीचे त्याने केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. त्याच्या **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** मध्ये मला माझा प्रवास तुमच्यापर्यंत पोहचण्याची संधी मिळाली व माझ्या सर्व मार्गदर्शकांना आठवणींत गुतताना खूप भरून आले.

दत्ता तुला तुझ्या भावी प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा.

धन्यवाद !

श्री. दिलीप नागेशराव पवार

सहयोगी प्राध्यापक,

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग,

सी बी डी, बेलापूर

आमच्या पुस्तकाची प्रत हवी असल्यास खालील संकेत स्थळावर भेट द्या:

१. http://www.penram.com/fundamentals-of-project-planning-and-engineering
२. https://www.flipkart.com/fundamentals-project-planning-engineering/p/itmexshf2fdjaxrz?pid=9788187972655&otracker=pp_pmu_v2_Recently+Viewed&otracker1=pp_pmu_v2_gamificationAndPersonalisation/recentlyViewed_Recently+Viewed_SOLO_VIEW_wc_view-all

**प्रवास १४ : प्रशासकीय प्रवास**

श्री. उपेंद्र कुलकर्णी, महाराष्ट्र प्रदूषण बोर्ड

आतापर्यंत आपण वाचलेले प्रवास हे कदाचित साधे सरळ असतील परंतु आपण जो प्रवास जाणून घेणार आहे तो कदाचित समजून घेण्यासाठी विशेष प्रयत्न घ्यावे लागणार आहेत. प्रशासकीय प्रवास समजणे तसे काहीसे सोपे नाही परंतु हा प्रवास खूप वेगळा आहे. परंतु हा विषय समजण्यासाठी आपणास या विषयाबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. असा हा अवघड वाटणारा प्रशासन प्रवास समजून घेण्यासाठी आपण एका प्रशासकीय अधिकाऱ्याची



भेट घेवून जाणून घेणार आहोत - **श्री. उपेंद्र चंद्रकांत कुलकर्णी, क्षेत्र अधिकारी, प्रदूषण नियत्रण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र.** त्यांचा हा प्रवास त्यांच्या शब्दात आपणासमोर सादर करीत आहोत.

मला असे काही लिहावे लागेल असा मी कधी विचार केला नव्हता. परंतु एकदा दत्ताशी चर्चा करताना निदर्शनास आले की तो एक वेगळा विषय हाताळतो आहे, तो त्याच्या पुस्तकासाठी त्यामध्ये वेग-वेगळे प्रवास सादर करणार आहे. विविध क्षेत्रातील लोकांचे अनुभव कथन करण्याचा मानस होता त्याचा, मला वाटले जेव्हा काही असेल तेव्हा विचार करूया, त्यामुळे खास अशी काही तयारी केली नव्हती. त्याचे वारंवार फोन येत होते, मेसेजेस येत होते परंतु लिखाण सुरू होत नव्हते, प्रशासकीय नोकरी त्यामुळे होणारे प्रवास यांचे कदाचित अडथळे होत होते. नंतर वाटले दत्ताला खरेच हा विषय महत्वाचा वाटतो आहे तर आपणसुद्धा त्याला मदत करावी आणि मग लेखनास सुरुवात केली, कारण मी सध्या कामानिमित्त पुण्यात असतो आणि घर परिवार मुंबईत.

शेवटी म्हणतात प्रत्येक गोष्टीला एक चांगली सुरुवात लागते मग त्याचा शेवट नेहमी चांगलाच होतो. चला तर जाणून घेवूया **उपेंद्रजी** यांचा प्रशासकीय प्रवास त्यांच्या शब्दात !

माझा जन्म २९ डिसेंबर १९७१, औरंगाबाद मधील, परंतु मी मूळचा वांगणी, ता. आष्टा, जि. सांगली. नंतर मिरजेत स्थायिक झालो आणि मिरजकर कुलकर्णी झालो. सन १९९५ साली पर्यावरण शास्त्रातील पदवीत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर नवी मुंबई येथे मोठ्या भावाकडे राहायला आलो. १९९५ ते १९९८ या तीन वर्षामध्ये दोन नोकऱ्या बदलल्या आणि मे १९९८ ला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये क्षेत्र अधिकारी या पदावर रुजू झालो. सध्या पिपरी चिंचवड या कार्यालयामध्ये उप-प्रादेशिक अधिकारी पदाचा अतिरिक्तकार्यभार सांभाळत आहे.

गेल्या वीस वर्षामध्ये शासनाच्या सेवेत काम करत असताना शासनाकडून (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ) भरपूर काही अनुभवले व नवीन गोष्टी मिळाल्या. प्रामाणिक काम करत असताना त्याची कुठेतरी दखल घेतली जाते याचा प्रत्यय वेळो-वेळी आला हे आवर्जून सांगावेसे वाटते. जात, धर्म अशी कुठेही अडचण आली नाही. खर सांगायचे तर माझा हा वीस वर्षाचा प्रशासकीय प्रवास खूप आवाहनात्मक होता. असाच पुढचा प्रवास चालू

असताना, तुम्ही प्रशासन या बद्दल थोडे जाणून घ्यावे म्हणजे हा विषय थोडा सोपा आणि सरळ होईल. भारत हा मोठा देश आहे मग त्यातील २८ राज्ये व ७ केद्रशासीत प्रदेश आहेत. महाराष्ट्र हे भारतातील सर्वात प्रगत राज्य त्यामुळे इतर राज्यातील लोक आपल्या महाराष्ट्रात उद्योगाच्या शोधात तसेच उदरनिर्वाहासाठी येतात. शासनाचे विविध विभाग कार्यरत आहेत त्यापैकी माहिती तंत्रज्ञान, गृहविभाग, सामान्य प्रशासन विभाग, महसूल विभाग, वन विभाग, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग, पर्यावरण विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागआणि असे बरेच विभाग आहेत. इतर राज्यापेक्षा महाराष्ट्र प्रगत असल्याने इथे असणाऱ्या लोकांची वाढतीसंख्या, वाहनाची वाढते प्रमाण, उद्योगांची संख्या यामुळे आपल्या राज्याची जबाबदारी इतर राज्यापेक्षा थोडी जास्त आहे. स्वाभाविकरित्या वाढत्या लोकसंखेमुळे इतर समस्या तसेच प्रदूषणाच्या समस्या सुद्धा जास्त असतात. महाराष्ट्राने नेहमीच पर्यावरणाच्या बाबतीत पुढाकार घेतला म्हणूनच पर्यावरण विभाग एक महत्वाचा विभाग मानला जातो. पर्यावरण विभागाच्या अंतर्गत मार्गदर्शनासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ काम करते. हे मंडळ रेगुलेटरी प्राधिकरण म्हणून काम करते. उद्योगधंद्यातून होणारे प्रदूषण, स्थानिक स्वराज्य संस्थामधून होणारे प्रदूषण, हॉस्पिटल मधून होणारे प्रदूषण. अशा वेग-वेगळ्या स्तरावरचे प्रदूषण नियंत्रण करण्याची जबाबदारी प्रदूषण




नियंत्रण मंडळावर असते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (http://www.mpcb.gov.in) काम हे मुख्यत: पर्यावरण विषयक कायद्यांची / नियमांची अंमलबजावणी उद्योगांकडून, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांचे कडून होते अथवा कसे याबाबत पाहणी करणे आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ हे जल प्रदूषण कायदा १९७४, हवा प्रदूषण कायदा १९८१, पर्यावरण कायदा १९८६, तसेच वैद्यकीय घनकचरा अधिनियम २०००, घातक घनकचरा अधिनियम २०१६, ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) कायदा २०१०, या व इतर नियमांच्या आधारावर कामकाज करते. काही वेळा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ दिल्ली यांच्याकडून वेळो-वेळी सूचना दिल्या जातात. कामकाज सोपे व्हावे यासाठी प्रत्येक अधिकाऱ्यांना कामे तसेच अधिकार नेमून दिलेले आहेत. पर्यावरण खात्याला दोन मंत्री आहेत. एक कॅबिनेट तर दुसरे राज्य मंत्री, त्यांच्यानंतर मुख्य सचिव पर्यावरण विभाग. नंतर अध्यक्ष महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

सदस्य, सचिव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, त्यानंतर सायन मुंबई येथील मुख्यालयातील संयुक्त संचालक (Joint Director), प्रादेशिक अधिकारी (एकूण १२), उपप्रादेशिक अधिकारी आणि क्षेत्र अधिकारी, अशा सर्व प्रशासकीय मंडळाची कार्यकारणी असते.

मुख्यत्वे प्रदूषण निर्मिती असणाऱ्या उद्योगांची वेग-वेगळ्या प्रकारात विभागणी केलीली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे, तसेच त्यांच्या भांडवल गुंतवणीनुसार मोठा, मध्यम, लहान असेही प्रकार आहेत.

१. अति प्रदूषित - लाल संवर्ग
२. कमी प्रदूषित - नारंगी संवर्ग
३. किरकोळ प्रदूषित - हिरवा संवर्ग

लाल संवर्गातील उद्योगांची वेळो-वेळी पाहणी केली जाते व त्याबाबत आवश्यकतेनुसार कारवाई केली जाते. एख्याद्या उद्योगामुळे पाणी प्रदूषित होत असेल तर त्यावर **जल कायदा १९७४ नुसार कारणे दाखवा** आदेश दिले जातात. त्यानंतर सुद्धा त्या उद्योजकाकडून प्रदूषण होत राहिल्यास प्रस्तावित निर्देश देऊन तुमचा उद्योग का बंद करण्यात येवू नये? यासाठीची विचारणा केली जाते. नियमानुसार त्या उद्योजकाला यांचे रीतसर उत्तर देणे बंधनकारक असते. उत्तराची नियमानुसार तपासणी केली जाते आणि एकूणच जर काही नियमबाह्य आढळ्यास त्या उद्योगांची शासकीय नियमानुसार बंदीचे आदेश दिले जातात त्यात त्या उद्योगांची वीज, तसेच पाणी तोडण्याबाबत कारवाई केली जाते.

एकंदरीत असा हा प्रदूषण मंडळाचा प्रशासकीय कारभार चालतो, त्याव्यतिरिक्त प्रदूषण नियंत्रणामार्फत जनजागृतीचे काम सुद्धा केले जाते. एखादा नवीन अधिनियम किंवा कायदा येणार असेल तर त्याबाबत माहिती देण्याचे काम विभागाच्या संकेतस्थळावर, वृत्तपत्रांमधून तसेच वृत्त-निवेदन वाहिनी (न्यूज चॅनेल) तर्फे करण्यात येते. आपल्या देशातील सर्वात मोठे प्रदूषण नियंत्रण मंडळ म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची गणना होते. तर एकंदरीत अशा प्रकारे प्रदूषण मंडळाचा कारभार चालतो.

खूप छान पणे **श्री. उपेंद्र चंद्रकांत कुलकर्णी**, यांनी आपला विषय अगदी सोपा आपणांसमोर करून सादर केला त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. हा विषय अजून सोपा करण्यासाठी आपण एक प्रश्न उत्तरांचा परिसंवादाचा प्रयोग सादर करणार आहोत त्यात सामान्यांच्या मनातील प्रश्न विचारात घेण्याचा आमचा मानस आहे.

**प्रश्न १: तुमच्या प्रवासाबद्दल थोडक्यात सागा, मग त्यात तुमच्या कामाची निवड काही, विशेष मार्गदर्शन घेतले का?**

**श्री. उपेंद्रजी:** माझे वडील **श्री. चंद्रकांत कुलकर्णी**, हे शासकीय सेवेत असल्याने कामानिमित्त जेथे बदली तेथे जाणे क्रमप्राप्त होते आणि कदाचित हा प्रवास मी लहानपणापासूनच पाहत आलो होतो. माझे वडील **वॉटर सप्लाय अँड सिवरेंज बोर्ड**, सध्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्ये **आवेरसीएर** या पदावर कार्यरत होते आणि कार्यकारी अभियंता या पदावरून सेवानिवृत्त झाले. शासकीय किंवा प्रशासकीय व्यवस्थापन मी अगदी जवळून पाहिले आहे. प्रवास तसा खूप मोठा आणि चढ उताराचा आहे, अशा खडतर प्रवास करत मी सुद्धा आज

प्रशासकीय सेवेत आहे. एक गोष्ट मी नक्की सांगेन मी काही ठरवून ह्या सेवेत आलो नाही, कारण मी मुळातच हार्डकोर खेळाडू वृत्तीचा बास्केटबॉल, क्रिकेट, टेबल टेनिस हे माझे आवडते खेळ आणि दैवीकृपेन माझी देहयष्टी सुद्धा त्याला साजेशी... असा उंचापुरा, धिप्पाड आणि कणखर असणारा मी अभ्यासात तेवढा हुशार विदयार्थी नव्हतो. आयुष्यात खुप मेहनत फार कष्ट करून मी आज या पदावर पोहचलो आहे. जर मी या पदावर नसतो तर नक्कीच एक खेळ (स्पोर्टस) प्रशिक्षक झालो असतो. या विशेष व्यक्तिमत्वाचा मला खूप फायदा झाला या सेवेत असताना हे आवर्जून सांगावेसे वाटते.

**प्रश्न २: तुमचा शैक्षणिक प्रवास, मित्र-मंडळी आणि आतापर्यंतच्या प्रवासाबद्दल?**

**श्री. उपेंद्रजी:** माझा शैक्षणिक प्रवास हा विविध शाळेतील असल्यामुळे मित्र परिवार तसा खूप मोठा आहे आणि ह्या गोष्टीचा मला खूप अभिमान आहे. शाळा, कॉलेज व्यवस्थितपणे पूर्ण केले. माझे बी.एस.सी चे पहिले वर्ष संपले आणि असेच एका रात्री वडिलांनी बोलवून विचारले की तू पुढील आयुष्याबद्दल काही ठरवले आहे का? तुझे खेळ कदाचित तुला तुझ्या आयुष्यात पोट-पाण्याची सोय करण्यासाठी असमर्थ ठरू शकतील ठरतील तर तू वेळीच विचार कर....बस्स ! असे सांगून गुड नाईट म्हणून झोपायला निघून गेले. माझे बाबा एक मोठे प्रेरणा स्थान, त्यांनी दिलेले संस्कार, व्योग्य विचार आणि त्यातून तुम्ही तुमचे आयुष्य कसे जगता,






घडवता हा साधा सोपा मंत्र त्यांनी दिला आणि आजच्या परिस्थितीत खूप उपयोगी पडतो.




बरेच दिवस मनात विचाराचे चक्र चालू होते पण काही सुचत नव्हते. विचारांचा कल्लोळ चालू होता मनात, नंतर विचार केला शेवटी खेळ हा फक्त खेळापूरता ठेवून अभ्यासात लक्ष देण्याचे ठरवले. या लाक्षणिक विचाराने बी.एस.सी पूर्ण केल्यानंतर वेगळे क्षेत्र निवडायचे अशी खूणगाठ मनात बांधली होती आणि उच्च शिक्षण **पर्यावरण** या विषयात घायचे. कोल्हापूर मधून पर्यावरण विषयात पदवी संपादन करून थेट मुंबई गाठली. मोठ्या भावाच्या मदतीने एक कंपनीत महिना रु. १२००/- या पगारावर नोकरीला लागलो. नोकरी करताना मला जाणवले की या क्षेत्रासाठी आपणास असलेले शिक्षण पुरेसे नाही. मग पुढे डिप्लोमा ईन इंडस्ट्रियल सेफ्टी करायचे ठरवले आणि मग पुन्हा एकदा पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला. मी शिकत असताना पूर्वीची कंपनी काही खास कामासाठी बोलायवाची, तो अनुभव आज खूप कामी येतो.

एक दिवस माझ्या मित्र मंडळींच्या संपर्कातून समजले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ज्या मुलाखती घेतल्या होत्या त्यां मुलाखतीच्या पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी जाहीर झाली आहे. त्या यादीत माझी **क्षेत्र अधिकारी** म्हणून निवड झाली आहे. माझ्या आनंदाला पारावर नव्हता, कारण तसे खासच होते आता पर्यंत जे जे ठरवले आणि प्रामाणिक प्रयत्नांना देवाने यश द्यायला सुरुवात केली होती. थोडक्यात काय तर ! तुमचे शिक्षण कधीही वाया जात नाही.

**प्रश्न ३: तुमचा शैक्षणिक प्रवास, मित्र-मंडळी पाहिले, आता तुमच्या खास प्रवासी परिचित बद्दल थोडक्यात?**

**श्री. उपेंद्रजी:** तुम्हाला माझ्या आयुष्यातील खास प्रवासी परिचित व्यक्तीची ओळख करून द्यायला आवडेल.



माझी पहिल्यांदा क्षेत्र अधिकारी म्हणून रायगड जिल्हा माझ्या कक्षेत होता, तेथे एक वर्ष या पदावर काम केले. कोल्हापूरला बदलीसाठी विनंती अर्ज करून बदली करून घेतली. साधारणपणे एक वर्ष काम केल्यावर लक्षात आले की आपले येथे मन लागत नाही. तसेच कार्यकालीन कामकाज याची कागदपत्रे पोहचायला खूप वेळ लागतोय. मग विचार केला आणि मनाशी गाठ बांधली पुन्हा मुंबईला जायचे. योगायोग बघा दरम्यानच्या काळात माझे लग्न झाले आणि माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा प्रवासी परिचय **सौ.अनघा** मूळची कोल्हापूर मधील असल्याने आम्हाला एक दुसऱ्याला सुरुवातीचा काळ बराच चांगल्या प्रकारे एकत्र घालवता आला. जेव्हा मी तिला मुंबईत बदलीचे सांगितले तेव्हा ती खूप खुष झाली कारण तिला सुद्धा तिच्या उच्च शिक्षिणाचा फायदा घेता येईल. तिने सुद्धा मुंबईत आल्यावर मला खूप छान साथ दिले. तिने माझ्यासोबत केलेली पार्टनरशिप सुद्धा खूप महत्वाची होती. सौ. अनघा, माझ्या पत्नीपेक्षा माझी चांगली मैत्रीण आहे. लग्नानंतर ठरवले होते ज्या वातावरणात आपण वाढलो त्यापेक्षा चांगली परिस्थिती आपण आपल्या आई-वडिलांना दिली तरच आपण आपले कर्तृत्व पार पाडल्याचा आनंद मिळेल आणि तिच्या सोबतीने मी ते मिळवले ह्याचा आनंद फार आहे. आज अनघा एका बहुराष्ट्रीय कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक (Senior Manager-MIS) या पदावर कार्यरत आहे. लग्नानंतर सुरुवातीला ती अगदी घरी जावून साड्या तसेच ड्रेस विकायचे काम करायची परंतु तिची महत्वाकांक्षा फार मोठी आहे आणि तिचा स्वतः फार विश्वास आहे. या तिच्या गुणांवर तिचा इथपर्यंत प्रवास केला आहे. कदाचित सुरुवातीच्या काळातील अनुभव तिला व्यवस्थापनात खूप कामी येत असावा.

आयुष्याचा या प्रवासात मला मिळालेले अनघाकडून मिळालेली सुंदर भेट म्हणजे आमचा अभिमान व आमचा आनंद म्हणजे माझी लाडकी मुलगी **कु. शर्वरी.** सध्या मी माझ्या कुटुंबासोबत खूप आनंदात आहे.

**प्रश्न ४: तुमच्या या प्रवासातील काही खास प्रसंग आमच्या वाचकांबरोबर सामायिक (शेयर) करायला आवडेल का?**

**श्री. उपेंद्रजी:** माझ्या वीस वर्षाच्या शासन सेवेत असे बरेच प्रसंग आले पण त्यात खास करून एक-दोन प्रसंग आहेत. जे मी तुम्हाला जरुर सांगेन.

सन २००७ साली अचानक एके दिवशी आम्हाला आमच्या सायन येथील मुख्य कार्यालयात बोलाविण्यात आले सोबत काही मित्र होते व दोन अनोळखी व्यक्ती होत्या. कुठल्यातरी कामासाठी आमची निवड झाल्याचे

सांगण्यात आले. तसेच सोबतच्या अनोळखी व्यक्ती या नॅशनल ह्युमन राईट (NHRC) कमिशन दिल्ली येथून आल्या आहेत आणि तुम्ही पुढील आठवड्यात तुम्हाला त्यांच्याबरोबर जायचे आहे. नेमके कुठे जायचे याची कोणालाच कल्पना नव्हती परंतु तयारी करायला सांगितले. निघायच्या दिवशी सकाळी फोन आला तुम्हाला गुजरातच्या दिशेने जायचे आहे. आम्ही तुमच्या संपर्कात राहू, तुमची अहमदाबाद येथे रात्री रहायची व्यवस्था केली आहे. सकाळी आल्यावर पुढील कामाचे बोलूयात असा फोने आला. दुसऱ्या दिवशी दुपारी आम्हाला कामाचे स्वरूप समजावण्यात आले परंतु अजूनही कुठे जायचे आहे याची कल्पना दिली नाही. सगळेच संभ्रमात होते कारण दिशा समजत नव्हती. संध्यकाळी साधारणपणे चार वाजता आम्ही निघालो, पुढे पोलिसांची गाडी मध्ये आमची गाडी पाठीमागे सर्व आमच्या मशिनेरीज असा आमचा ताफा एका चौकामध्ये आल्यावर आपल्याला गोध्रा येथे जायचे आहे आणि आता तुम्ही घरी फोन करून सांगू शकता असे आम्हाला सांगण्यात आले.

गोध्रा येथे काही सिलिका वाळु बनविणारे उद्योग कार्यरत आहेत. सिलिका दगड (स्टोन) तो क्रश केला जातो आणि त्याची वाळू (sand) बनवली जाते. या उद्योगामुळे बऱ्याच कामगारांचा हवा प्रदूषणामुळे मृत्यू झाल्या बाबतच्या तक्रारी NHRC कडे प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने हवेच्या गुणवतेची मोजणी करण्याच्या महत्वाच्या कामी आमची निवड करण्यात आली होती. या ठिकाणी आम्हाला एक आदिवासी युवक भेटला, त्याने एक सीडी बनवली होती त्यामध्ये या उद्योगामध्ये काम केल्यानंतर कशाप्रकारे कामगार मृत्यूमुखी पडतात याबाबतचा व्हिडिओ होता. हे सर्व मृत कामगार मध्यप्रदेश तसेच उत्तरप्रदेशच्या जंगलातील आदिवासी होते. साधारणपणे ३-४ दिवस काम केल्यानंतर आमचा अहवाल नॅशनल ह्युमन राईट कमिशन (NHRC) दिल्ली कडे पाठवला. कामगारांच्या नातेवाईकांना काही रक्कम मोबदला म्हणून द्यावा आणि तो त्या उद्योगाच्या दंडाच्या रकमेतून द्यावी असा कोर्टाकडून निर्णय आला. तेव्हा आमच्या टीमला आपल्या प्रयत्नाचे चीज झाल्याचा आनंद वेगळा होता. आमच्या कामाची पोच पावती आम्हाला नेशनल ह्युमन राईट कमिशन (NHRC) कडून मिळाली आणि महाराष्ट्र शासनास पत्र लिहिले या टीमच्या केलेल्या कामामुळे आम्ही निर्णयप्राप्त झालो अन्यथा आम्ही निर्णयापर्यंत पोहचू शकलो नसतो. तसेच या पत्राची दखल घेऊन पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांनी आम्हाला प्रशस्तिपत्रक देऊन गौरवले. असा प्रवास करत प्रशासकीय सेवेत असलेला मी आज जे काही कमावले आहे त्यात मला मिळालेले मान-सन्मान, प्रतिष्ठा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ह्या कामातून मिळणारा आनंद.

**प्रश्न ५ : आणखी एखादा खास प्रसंग आहे का तुमच्या आठवणीत जो तुम्हाला तुमच्या कामाबद्दल अभिमानाने सांगावासा वाटतो ?**

**श्री. उपेंद्रजी:** हो जरूर आहेत ! माझे माझ्या कामावर मुळात खूप प्रेम आहे आणि हे काम करण्याची प्रेरणा मला माझ्या कामाच्या आत्मविश्वाने मिळवून दिली आहे .

सन २००८ साली माझी बदली सायन येथील मुख्यालयात झाली आणि माझ्याकडे नागरी घनकचरा या विषयाची जबाबदारी देण्यात आली. साधारपणे सन २०१० च्या मार्च महिन्यामध्ये मला मुंबईच्या

सद्यस्थिती बद्दल विचारणा करण्यात आली आणि त्याबाबतचा तपशील तुम्ही पाठवा असे सांगण्यात आले. सर्व साधारपणे एका आठवड्यानंतर मला फोन आला तुम्हाला स्वीडन येथे मुंबईच्या नागरी घनकचऱ्याचा प्रकल्प पाठवायचा आहे आणि तेथे तुमची ट्रेनिंगसाठी निवड झाल्याचे सांगण्यात आले. ठरल्याप्रमाणे स्वीडन साठी प्रयाण केले, स्वीडन मध्ये साधारणपणे एका महिना राहिलो . ह्या एका महिन्यात आतंरराष्ट्रीय स्तरांवर स्वतः ला कश्याप्रकारे सादर करायचे हे मला समजले. इंग्रजी भाषेचा न्यूनगंड मनातून निघून गेला आणि येथे एक गोष्ट आवर्जून नमूद करावी वाटते इतक्या मोठ्या स्तरावर काम करत असताना इंग्रजी स्वीडिश लोकांना सुद्धा नीट बोलता येत नव्हती. कदाचित हे एक कारण असेल ते लोक लगेच म्हणायचे - लिव्ह इट, परंतु आपण भारतीय आपली बुद्धिमत्ता इंग्रजी भाषेच्या प्रभुत्वावर मोजतो, त्याचे वाईट वाटते.

माझ्या स्वीडन येथे शिकलेल्या प्रत्येक गोष्टी आज इकडे भारतात काम करत असताना पाळत आलो. माझ्याकडे येणार प्रत्येक व्यक्ती रिकाम्या हाताने जाणार नाही आणि त्यांच्या शंकांचे पूर्ण निरसन झाले आहे याची खबरदारी मी घेत होतो आणि आहे. साध्या सोप्या भाषेत उद्योजकांनी काय करायचे आहे आणि काही नाही याची जाणीव झाली आहे असे समजल्यावर त्यांचे काम झाले आहे याची चौकशी करायचो.

बरेचसे लोक, उद्योजक फोनवर किंवा येऊन भेटून त्याचे काम झाल्याचे सांगतात त्यावेळी खूप समाधान वाटते. एका डॉक्टरने तर चक्क महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मडल्याच्या सदस्य सचिवांना पत्र लिहून माझ्या कामाचे कौतुक केले व पत्राच्या शेवटी लिहिले होते - *I am proud to be Indian.*

**प्रश्न ६: जाता जाता शेवटचे काही रॅपिड फायर चे प्रश्न?**

**श्री. उपेंद्रजी:** प्रयत्न करतो, अरे वा ! हे पण आहे का ?

**प्रश्न ७: तुमच्या ह्या प्रशासकीय सेवेचा गुरु या बददल थोडक्यात ?**

**श्री. उपेंद्रजी:** अर्थात माझे वडील , त्याच्याकडूनच प्रशासनामध्ये काम करायचे बाळकडू मला माझ्या घरातून मिळाले. त्यांनी दिलेला मंत्र - प्रत्येक काम प्रामाणिकपणे आणि चांगल्या विचाराने करणे.

**प्रश्न ८: शासनाबद्दल थोडक्यात ?**

**श्री. उपेंद्रजी:** शासनामध्ये काम करत असताना मिळालेला पाठिंबा आणि **एम. टेक (पर्यावरण)** करण्यासाठी दिलेली परवानगी, जर ती मिळाली नसती तर एम. टेक (पर्यावरण) पूर्ण करता आले नसते.

**प्रश्न ९: आवडता खेळ आणि खेळाडू ?**

**श्री. उपेंद्रजी:** क्रिकेट आणि अर्थातच सचिन रमेश तेंडुलकर.

**प्रश्न १०: श्री.उपेंद्रजी कुलकर्णींची ओळख ?**

**श्री. उपेंद्रजी:** आत्मविश्वासू आणि प्रामाणिक व्यक्ती.

तर आज आपण प्रशासन आणि त्याची प्रशासकीय माहिती घेण्यासाठी आपले अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे **श्री. उपेंद्रजी चंद्रकांत कुलकर्णी** यांनी वेळ दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

**श्री. उपेंद्रजी:** धन्यवाद ! तुमचे सुद्धा तुम्ही हा विषय निवडला आणि त्या विषयावर मार्गदर्शन करण्याची संधी मला दिल्याबद्दल आपले सुद्धा मन:पूर्वक आभार.

तर वाचकहो, तुम्हाला हा विषय नक्कीच आवडला असेल आणि प्रशासकीय प्रवासाबद्दल योग्य ती माहिती आम्ही देणाच्या प्रयत्न केला आहे. जर तुम्हाला माहिती आवडली असेल तर आपला अभिप्राय आम्हांस जरूर कळवा.. धन्यवाद !


प्रवास आमचा

## प्रवास १५ : प्रवास आमचा...आयुष्याचा

मी आणि माझे आयुष्य या प्रवासाचे वर्णन थोडक्यात कारण मी सगळे प्रवास जवळून अनुभवले आहेत आणि जर मी माझ्या जीवनाचा प्रवास सादर केला नाही तर कदाचित **प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा** हा विषयच जणू पूर्ण होणार नाही. कदाचित माझा - आमचा हा प्रवास तुमच्यापेक्षा कदाचित वेगळा नसेलही परंतु ह्या प्रवासात मी जे काही अविस्मरणीय क्षण अनुभवले कदाचित त्याच्यामुळेच मी आज तुमच्या समोर उभा आहे.



**माझे आई आणि बाबा...मलाक्का सिटी (मलेशिया)**

माझ्या जीवनाचा प्रवास २८ मार्च १९७९ रोजी सुरु झाला तो म्हणजे सौ. शालन कृष्णा निकम (आई) व श्री.कृष्णा रामू निकम (बाबा) यांच्या घरी म्हणजे निकम परिवारात. असो ! मी प्रामुख्याने इयत्ता ५ वी ला जाईपर्यंत माझा खरा प्रवास आई-बाबांच्या अंगाखांद्यावर झाला अगदी एखाद्या मजेदार सिनेमासारखा आणि तो सध्या नीट आठवतही नाही. मग आपणासमोर त्याच्या पुढचा प्रवास सादर करीत आहे.

मी खरंच स्वतःला भाग्यवान समजतो, अगोदरची सर्व सत्रे तुम्ही वाचली, मी जे काही आज आहे ते माझ्या घरच्यांच्या आशिर्वादाने आणि कठोर परिश्रमाचे फळ असावे.

माझे आई-बाबा....अहो ! अहो ! दोघेही सारखेच महत्वाचे पण **आई** अगोदर कारण, ती माझी माय-माऊली सगळयात अगोदर तिने मला माझ्या ह्या प्रवासाचे तिकीट दिले. प्रत्येकासाठी **आई** (always front footwar Captain) आणि **बाबा** (always back foot defence like Coach), असो हे काही नवीन नाही, माझ्यासारख्या तुमच्या सुद्धा समान भावना असतील कारण **आई** सगळ्यांनाच जवळची असते.

मला मुळातच आई-वडिलांचे तुम्हासारखेच चांगले संस्कार लाभले म्हणून **आई-वडील** नेहमीच तीर्थस्वरूप असतात आणि मला सुद्धा आहेत. त्यांच्यामुळे मला माझ्या आयुष्याचा प्रवास सुखकर करता आला. घरची परिस्थिती तशी खूप बेताचीच असल्याने परिस्थितीचे चटके त्यांनी सोसले परंतु मायेची ऊब आम्हा सर्व भावंडाना दिली. ओ ! ओह ! नो इमोशन्स...पण अहो ! करणार तरी काय आई-बाबा हा विषयच मुळात असा आहे की तो शब्दात सांगता येणार नाही. एक गोष्ट मी मोठ्या विश्वासाने सांगेन **आई-वडील** हे एक दैवत आहे कारण त्या देवाला नवस कधीच करावा लागत नाही, परंतु सगळ्या मनोकामना पूर्ण होतात. काळाच्या ओघात काहीजणांना कदाचित ह्या दैवताचा विसर पडत चालला आहे, असेल पण वेळीच सावरणे कधीही उत्तम.

माझी आई एक मध्यम-वर्गीय गृहिणी, वडील सुदैवाने नोकरी करणारे ! सुदैवाने ह्या अर्थाने की माझ्या आजोबानंतर **निकम परिवाराची** धुरा सांभाळणारे एकमेव **सचिन तेंडूलकर म्हणता येईल (गावस्कर आम्ही जास्त पाहिला नाही आणि सचिन शिवाय लोकांना दुसरे कळत नाही) !** त्यांनी आयुष्यात बरेच चढ उतार पाहिले परंतु या सगळ्यांतून सधनतेकडे नेणारे त्यांचे परिश्रम, एकाग्रता व न थकता सरळ चालत राहणे मी अगदी जवळून पहिले आहे. आई कडून मिळाले देव-देवतांचे आशीर्वाद, जिद्द, चिकाटी व बाबांकडून मिळाले ते सरळ बॅटने खेळण्याचे कौशल्य (*जेव्हा परिस्थिती अवघड असताना*).

थोडक्यात काय ! आईकडून मिळाले ते म्हणजे चांगल्या सवयी, एकमेकांविषयी आदर ठेवण्याची वृत्ती, परिश्रमाला दुसरा पर्याय नाही, आणि आयुष्यात जे-हवे ते करण्याची (चांगले) मुभा; बाबा एक मूर्तिमंत कर्तृत्व, चांगले करा चांगलेच होणार हा आत्मविश्वास, आपले ध्येय आपणच ठरवा, आजू-बाजूच्या परिस्थितीचा आढावा घेणे, निर्णयशक्ती आणि जर कदाचित काही निर्णय चुकले तर चुकलेले निर्णय पचविण्याची हिम्मत. त्यांचे एक उदाहरण नेहमी खूप महत्वाचे वाटते, ते त्यांनी त्यांच्या भावांना (माझ्या काका मंडळीना), माझ्या भावंडाना आणि आता त्यांच्या नातवंडांना सांगितलेले, ते माझ्या स्मरणात अजून ताजे आहे, ते म्हणजे - **घार, हिंडते आकाशी, तिचे चित्त मात्र पिल्लांपाशी,** *Actually, I really didn't understood the exact meaning of this sentence but everyone has implemented the meaning accordingly and now everyone is successful and doing better than expected.*

माझ्या आठवणी तुमच्या सारख्याच खूप महत्वाच्या आणि भरपूर आहेत. परंतु सगळ्याच आठवणी मांडण्यासाठी कदाचित पुस्तक कमी पडेल. पण एक खास अशी आठवण सांगण्याशिवाय राहवत नाही. आमची पिढी ही क्रिकेटची पिढी त्याला मी ही अपवाद नाही. मला माझ्या बाबांनी माझ्या एका वाढदिवसाला (नक्की कोणत्या ते आठवत नाही १० वा की ११ वा), क्रिकेटसामने ऐकण्यासाठी त्यांनी मला एक **फिलिप्स** कंपनीचा रेडिओ भेट दिला होता. आईने-ताईने ओवाळल्या नंतर बाबांनी तो रेडिओ माझ्या हातात दिला आणि उत्साहाच्या भरात असेल कदाचित तो माझ्या हातातून निसटला, आणि धाडकन जमिनीवर पडला, कव्हर, बॅटरी वगैरे भाग वेगळे झाले आणि मग घरातील वातावरण एकदम शांत झाले. बाबांनी शांतपणे तो रेडिओ उचलला, बॅटरी जोडल्या परंतु त्याची एक क्लीप (पिन) तुटली. त्यांनी त्या क्लीपऐवजी रबर बॅण्ड लावून मला तो रेडिओ चालू करून दिला. मी त्या दिवशी खूप खूप रडलो, जेवलो सुद्धा नाही, सगळे मला समजावत होते परंतु माझ्या आयुष्यातील एवढी किमती भेटवस्तू (गिफ्ट) सांभाळता न आल्याचे दुःख फार झाले होते. बाबांनी मला स्वतःच्या हाताने माझ्या वाढदिवसाच्या दिवशी जेवण भरविले आणि एक गोष्ट सांगितली - **ठीक आहे ! हा रेडिओ तुटला परंतु आता चालू आहे, आणि मी तुला नवीन रेडिओ घेवू शकत नाही; तर आता तू हा वापर**. पण एक गोष्ट लक्षात ठेव आपल्या वस्तू आपण व्यवस्थित सांभाळायच्या कारण त्या पुन्हा जशा होत्या तशा त्या कधीच मिळत नाहीत. त्यांना जे काही सांगायचे होते ते नक्की समजण्याचे वय नव्हते, परंतु त्याचा थोडाफार अर्थ मी त्या रेडिओ प्रसंगावरून समजलो होतो.

तेव्हापासून आजपर्यंत मी माझ्या सर्व वस्तू सांभाळून वापरतो आणि व्यवस्थित जपूनही ठेवतो. माझ्याकडे शालेय जीवनापासून आतापर्यंत मी वापरलेल्या सर्व पेनांचा संग्रह आहे, माझी काही महत्वाची पुस्तके, नोटस, क्रिकेटची माहितीपर कात्रणे, रेकॉर्ड-बुक, आणि अशा बऱ्याच अमूल्य आठवणींचा ठेवा संग्रही केला आहे.

शेवटी मी एवढेच सांगेन आई (मम्मी) आणि बाबा (पप्पा), मी तुमचा शतशः आभारी आहे, तुम्ही जे आम्हाला दिले त्याला मोल नाही आणि जे मला ओळखतात ते जाणतात की तुम्ही दिलेले संस्कार, तत्व, ध्येय व सामाजिक जाण याचा वसा मी असाच पुढे चालू ठेवीन....Thank you for giving me everything.

असा आई-बाबांनी घडवलेला मी असलो तरी माझ्या जीवनशैलीवर माझा मोठा भाऊ **श्री. दिगंबर कृष्णा निकम,**




याचा खूप मोठा प्रभाव आहे. त्याने आमच्यासाठी (ताई व माझ्यासाठी) घरची बिकट परिस्थिती असताना आपले शिक्षण अर्धवट सोडून कामाला सुरुवात केली. तो निरागस चेहरा अजूनही माझ्या व ताईच्या लक्षात आहे. कदाचित तू केलेल्या त्यागामुळेच (मधेच स्वत: शिक्षण सोडलेस) मी आज जगासमोर एक उच्चशिक्षित अभियंता (Engineer) म्हणून ताठ मानाने उभा आहे. तू दिलेल्या सर्व गोष्टी माझ्यासाठी खूप अनमोल आहेत, होत्या आणि सदैव राहतील, त्यातील प्रामुख्याने तू दिलेल्या **क्रिकेटच्या बॅटस** माझ्यासाठी खूप महत्वाच्या व लक्की होत्या. तू दिलेल्या त्या बॅटसने मी माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम क्रिकेट खेळू शकलो - मग ते टेनिसबॉल, लेदर बॉल, किंवा मग फ्रेण्डली क्रिकेटचे






सामने असोत किंवा मग कंपनीसाठी खेळेलेलो क्रिकेट असो किंवा मग टाईम शील्ड डिविजन क्रिकेट असो किंवा मग **सिंगापुर डोमेस्टिक क्रिकेट** (Singapore Domestic Cricket League) लीग असो किंवा मग **क्वातान इंटरनॅशनल सिक्सेस - २००८** (Organized by Asian Cricket Council) असो किंवा मग **ब्रुनेई क्रिकेट लीग** (Brunei Darussalam Cricket League) असोत. तू दिलेल्या त्या सर्व क्रिकेट बॅट्स माझ्याकडे मी आजही जपून ठेवलेल्या आहेत.

परंतु या सर्व कठीण प्रसंगी तुझ्या जिद्दीच्या जोरावर आम्हा सर्वांना मदत करत, नवीन मार्ग काढत तू स्वतःचा व्यवसाय सुरु केलास ते वाखाणण्यासारखे आहे. ह्या प्रवासात तुला आमच्या वाहिनी व तुझ्या **सौ. विद्या दिगंबर निकम** यांची मिळालेली अमूल्य साथ. तुम्ही दोघांनी अथक परिश्रमाने आपल्या सगळ्यांचा लाडका **चि. सार्थक** (तुमचा मुलगा) याला ऑटोमोबईल इंजीनिअरिंग मध्ये प्रवेश घेवून तुमची शिक्षणाप्रती असलेली ओढ दिसून येते. सर्व काही तुमच्या मनासारखे होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

मी माझ्या आयुष्यात शिकून खूप मोठा झालो, देश-विदेशाचे प्रवास केले, आता आपले कुटुंब एक **स्टेबल कुटुंब** आहे. आपणास देवकृपेने व सर्वांच्या मेहनतीने सर्व काही मिळाले, घरच्या बिकट परिस्थितीखातर मी क्रिकेटमध्ये करियर न करण्याचा माझा निर्णय तुला कदाचित आवडला नसेलही, परंतु आज तुला माझा निर्णय योग्य वाटत असेल. तुला एकदा मनापासून सॉरी म्हणायचे आहे, तू दिलेले सर्व टी-शर्ट मी अजूनही जपून ठेवले आहेत. त्यातील एका **टी-शर्टवर** मी माझ्या इंजिनीअरिंगच्या शैक्षणिक आयुष्यातील खूप मोठ्या प्रवासाच्या आठवणी जतन केल्या आहेत (त्याचा फोटो खास आपणासाठी सादर करीत आहे).




**टी-शर्टवर - मी माझ्या शैक्षणिक आयुष्यातील काही आठवणी**

**सॉरी माझ्या भावा ! Thanks for giving everything to make me better person in life.**

अजून एका व्यक्तीचा माझ्या आयुष्यावर खास प्रभाव पडला ती म्हणजे माझी ताई. माझी ताई मुळातच खूप हुशार व कर्तृत्वान, तू मला माझ्या आयुष्यात जे सर्व काही दिले आहेत ते फक्त तुला आणि मलाच माहित आहे कदाचित हे आई (मम्मी) व बाबा (पप्पा) न सुद्धा माहित नसेल. मला तू तुझ्या करिअरच्या सुरुवातीच्या काळात तुला मिळणाऱ्या रु. ११००/ - च्या पगारातून दर महिन्याला माझ्या इंजिनीरिंग दिवसात कॉलेज साठी दिलेले रु. ५०/- माझ्या अजून लक्षात आहेत. कदाचित तुझ्या त्या वेळेने मला आयुष्यात पैशाची किंमत शिकवून गेलीस आणि आज मला खंबीरपणे जगण्यासाठी ते धडे देऊन गेलीस.



माझी अशी ताई **सुदर्शना कृष्णा निकम (आता सौ. आदिती नितीन जाधव)**, माझ्या इंजिनीरिंगच्या काळातील पुस्तकांसाठी किंवा मग क्लास साठी पैसे पुरवणारी **वर्ल्ड बँक** होती. बऱ्याच आठवणी आहेत, परंतु एक आठवण आवर्जून सांगावीशी वाटते, ती म्हणजे मी इंजिनीअर झाल्यावर तू भेट दिलेला शर्ट **(Arrow)** व पॅन्ट **(Allen Solly)** खूप महाग होते ते सर्व ! परंतु धन्यवाद, मी आजही त्या रंगाचा शर्ट व पॅन्ट वापरतो as my favourite colour.

तुझ्या त्या छोट्या-छोट्या गोष्टीसाठी मदतीची तळमळ, तत्परता व मदत करण्याची सवय मला तसाच घडवून गेली आणि मला सुद्धा ती सवय कधी लागून गेली हे कळलेच नाही. थोडक्यात तू लावलेली सवय अजूनही तशीच टिकून आहे. लोकांसाठी मदतीचा हात पुढे करण्याची जिद्द - **Hats-off to my dear !**

बरं का ! तुम्हाला म्हणून सांगतो, मी इंजिनीअरिंग पूर्ण केल्यानंतर मला बराच मान-सन्मान मिळाला, त्याच बरोबर माझ्या परिश्रमाचा चांगला मोबदला सुद्धा मिळाला आणि आजही मिळत आहे. आज मी मला हव्या असणाऱ्या सर्व किवा लागणाऱ्या सर्व वस्तू (कपडे, घड्याळे इ.) विकत घेवू शकतो. परंतु आजही **भाऊबीज** म्हणून तिच्याकडून मला आवडणारे शर्ट तिला विकत घ्यायला लावतो कारण त्याचे मोल खूप वेगळे आहे. माझी ताई आज एका बहुराष्ट्रीय (मल्टि-नॅशनल) कंपनीत सिनियर अकाउंटंट म्हणून नोकरीला आहे. मला माझ्या सुरुवातीच्या काळात जो धीर, आत्मविश्वास दिलास, तसेच तू ठेवलेल्या सर्व अपेक्षा मी पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आलो आणि करीत राहीन. तसेच, माझ्या ताई ला वेळो-वेळी पाठबळ देत आल्याबद्दल श्री. नितीन धोंडीराम जाधव यांना सुद्धा धन्यवाद. मला माहित आहे की तुमच्या सहकार्याला नुसते धन्यवाद करणे कमी पडेल, परंतु तुम्ही दिलेल्या योगदानाचे मोजमाप करणे कठीण आहे. सर्वात शेवटी

"तूच माझी प्रेरणा होती, तूच माझी मायेची सावली होतीस !
तूच माझा आधार, तूच माझी ताई आणि तूच माझी ताई !"

**Thank You! Love you my Dear Sister.**

ह्या सर्व त्या व्यक्ती आहेत ज्यांनी माझ्या बरोबर आयुष्याचा प्रवास केला आणि मला लहानाचे मोठे केले. परंतु



अशी एक व्यक्ती आहे, ती माझ्या आयुष्यातील खूप मोठ्या प्रवासाची साक्षीदार आहे ती म्हणजे माझी पत्नी **सौ. शितल दत्तात्रय निकम.** माझा माझी पत्नी शितलच्या बरोबरचा आयुष्याचा प्रवास दि. ११ डिसेंबर २००९ रोजी सुरु झाला. मुळातच शांत स्वभाव, संयम आणि कुटुंबाप्रती असलेली तत्परता मला तिचा **फॅन** बनवून गेली. मुळातच एक गोष्ट चांगली झाली ते म्हणजे तिचे आणि माझे विचार बऱ्याच प्रमाणात जुळायचे. शितल ही मुळची माझ्या गावाच्या जवळची असल्याने मला सासर-माहेर ह्या मध्ये कधी तारेवरची कसरत करावी लागली नाही. आत्तापर्यंतच्या प्रवासात तिने दिलेली साथ अमूल्य आहे आणि त्याची तुलना करणे योग्य नसेल कदाचित परंतु मलाच माहित आहे तिची मेहनत आणि तिने दिलेला पाठिबा.

तिच्या पाठिंब्यामुळेच मला माझ्या आयुष्यात माझे सर्व छंद, आवडी-निवडी जपता आल्या मग माझे क्रिकेट खेळणे असो किंवा मग माझे पुस्तक लिहिणे असो किंवा मग लेख लिहिणे असो किंवा मग माझे करियर असो त्या साठी वेळो-वेळी मला विविध देशाचे प्रवास करावे लागत असत (आणि आजही करावे लागतात) पण त्या काळात तिने तिचे संपूर्ण लक्ष कुटुंबावर केंद्रित केले होते.

कदाचित माझ्या बरोबरच्या प्रवासात तिला तिचा काही आवडी-निवडी सोडाव्या लागल्या असतील. जास्त काही मला माहिती नाही परंतु तिला तिच्या आयुष्यात M.Com (मास्टर्स इन कॉमर्स) करायचे राहून गेले याची मला खंत वाटते, परंतु तिने मला ते कधी जाणवून दिले नाही. मी तुला एक गोष्ट विश्वासाने सांगेन तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील.

तू माझ्यावर दाखवलेला विश्वास आणि मला दिलेले प्रोस्ताहन मला नेहमीच चांगले काम करण्यासाठी एक वेगळी उर्जा देवून जाते. शितल मला तुला मनापासून धन्यवाद द्यायचे आहेत ते तुझ्याकडून मिळालेल्या पाठींब्याबद्दल आणि तू दिलेल्या छान भेटीबद्दल - **शुभम आणि मानस** आपली मुले. मला सदैव तुझी अशीच साथ मिळावी हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

मला एक किस्सा सांगावासा वाटतो तो म्हणजे आम्ही माझ्या कामानिमित **ब्रुनेई –दारुस्सलाम, फार इस्ट,** येथे रहात होतो. शितल सुद्धा पहिल्यांदाच भारताबाहेर माझ्याबरोबर तेथे राहत होती. नेहमी संयमी असणारी आणि कठीण काळात शातपणे परिस्थिती हाताळणारी मी एगदा गडबडलेली वाटली. मला एक किस्सा सांगावासा वाटतो तो म्हणजे मी माझ्या



मानस आणि शुभम

क्रिकेटच्या एका स्पर्धेनिमित ब्रुनेईत सामन्यादरम्यान तिने केलेले ४५ मिस्ड कॉल जेव्हा आमच्या २ वर्षाच्या शुभमला खूप ताप आलेला असताना नाहीतर मी तिला कधीच असे पहिले नाही. कदाचित भारताबाहेर असल्याने तिचा गोंधळ उडाला असेल.

थोडक्यात काय तर ! आयुष्याचा प्रवास खूप चांगला होतो जेव्हा तुमच्याबरोबर तुमच्या बरोबर सम विचारी / परिचित-प्रवासी असतात. त्यांच्या सहवासात कोणतेही अवघड प्रवास सुद्धा अगदी सुखकर होतात. हे मी जवळून पहिले आहे आणि स्वत: अनुभवले आहे. शेवटी प्रत्येकास मनापासून धन्यवाद, निकम परिवाराचे !

# आयुष्य....तुमचे आमचे !

(एका अज्ञात कविच्या कवितेवर माझे सारांशीत केलेले विचार तुमच्यासाठी सादर करीत आहे)

आयुष्याच्या प्रवासात, प्रत्येकाच्या अल्बमध्ये,
आठवणींचे फोटो नेहमीच असतात,
परंतु त्याची दुसरी कॉपी काढायला,
निगेटिव्हज मात्र शिल्लक नसतात ||१||

आयुष्य घड्याळ झाले काट्याप्रमाणे वागताना,
लगबग पळताना, काम करून थकताना,
आयुष्य आनंदाविना नुसते प्रवासात जगताना ||२||

कामावर तर रोज गेले पाहिजे,
एकदातरी निवांतपणे झोपले पाहिजे,
उशिरा उठून कार्टून बघितले पाहिजे,
सगळे सोडून एकदा उनाड वागले पाहिजे,
प्रत्येकाने आयुष्य मनासारखे जगले पाहिजे ||३||


सकाळी उठताना दैना भारी होई,
रोजचीच घाई गडबडीत आंघोळ उरकून घेई,
सुस्त बसावे, मस्त आंघोळ करावी,
आरशात आपली सुंदरता बघवी ||४||

बेसूर असले तरी सूर जुळवले पाहिजे,
वेड-वाकडे का होईना नाचले पाहिजे,
लिहता नाही आले तर, चांगले वाचले पाहीजे,
काहीचं नाही तर, मनमुरादपणे जगले पाहिजे ||५||

गीतेचा रस्ता योग्य आहे आणि नेहमी असावा,
एक दिवस पु.ल किंवा मग पाडगावकराना का नसावा?
रामायण-महाभारत मालिका नैतिकतेच्या थोर,
तर मग सिनेमे एन्जॉय करायला कसला घोर? ||६||

कधीतरी एकटे सुद्धा फिरले पाहिजे,
तलावाच्या काठी उताणे पडले पाहिजे,
उठून पाण्यावर दगड मारले पाहिजे,
तणावाचे जगणे थांबले पाहिजे ||७||

संध्याकाळी मंदिराबरोबर, बागेत फिरले पाहिजे,
फुलपाखरांच्या सौंदर्याला एकदातरी भुलले पाहिजे,
कोणीच नाही तरी गजरा घ्यायला जमले पाहिजे,
काहीच नाही तर फुलाचा वास घ्यायला पाहिजे ||८||
रात्री शांत झोपता यायला पाहिजे,
देवाला हात जोडता यायला पाहिजे,
आशीर्वाद घ्यायला, धन्यवाद द्यायला पाहिजे,
ह्या सूंदर आयुष्य जगण्याचा आनंद घ्यायला यायला पाहिजे ||९||




आपला,
मी मराठी,
दत्तात्रय कृष्णा निकम

# थोडक्यात......

मी, दत्तात्रय कृष्णा निकम, मूळचा सातारा जिल्ह्यातील तालुका खटाव रहाटणी गावाचा, कामानिमित्त मी मुंबईत माझ्या कुटुंबासोबत पारसिकनगर कळवा (ठाणे) येथे वास्तवास आहे. मी स्वतः इंस्ट्रुमेंटेशन इंजिनिअर असून एका प्रायव्हेट कंपनीत **ऑईल अँड गॅस** डिजाईन सेंटर मध्ये सिनियर प्रिंसिपल इंजिनीअर म्हणून कार्यरत आहे.

मला स्वतःला माझ्या कामाव्यतिरिक्त वाचन, लेखन, क्रिकेट खेळणे, समाजसेवा यात प्रामुख्याने रस आहे. मला वाचनाची आवड आहे व मी माझ्या आयुष्यात लेखनाचे काम सुद्धा केले आहे, त्यात प्रामुख्याने मराठी लिखाण / साहित्याचा केले आहे.



मला माझ्या वाचनाच्या आवडीने मराठी, हिंदी व इग्रंजी साहित्य, वेग-वेगळ्या प्रकारचे लेख, कथा, आत्मचरित्र वाचण्याच्या संधी मिळाल्या. त्यात माझी आवड प्रामुख्याने मराठी साहित्य, विविध मराठी साहित्यिक वाचायला मिळाले. माझ्या वाचनाची सुरुवात श्री. पु. ल. देशपांडे, श्री.मंगेश पाडगांवकर, श्री. प्र. के. अत्रे आणि अशा बऱ्याच मान्यवरांच्या लेखनाने झाली. मी आतापर्यंत वाचलेल्या पैकी बटाट्याची चाळ, तो मी नव्हेच असो किंवा मग सांगा आता कसे जगायचे खुपच प्रभावित करून गेले.

मी लिहिलेल्या माझ्या कविता - मन, नाद-खोडकर बंड्या, सांगा आता कसे जगायचे आधारित संकल्पना, चारोळ्या, लेख - भारत एक्सप्रेस, विचार, प्रवास वर्णन असे साहित्य मी सिंगापुर ला असताना महाराष्ट्र मंडळ, सिंगापूरच्या विविध मराठी कार्यक्रमात - **शब्दगंधा** असो किंवा मग **ऋतुगंध त्रैमासिक** किंवा मग **गणेशोस्तव स्मरणिका** मध्ये प्रसिद्ध झालेल्या आहेत मी मराठी ...दत्तात्रय कृष्णा निकम या नावाने. तसेच माझे स्वतःचे विचार मांडण्यासाठी मी सुरु केलेला माझा मराठी ब्लॉग **इंडिअन प्राऊड.....भारतीयांचा अभिमान** (**https://indianproud.blogspot.in**). हो थोडे वर्ष हा ब्लॉग बंद होता कारण तेव्हा मी माझ्या एका अभियांत्रिकी विषयाच्या पुस्तकावर काम करीत होतो. "**Fundamentals of Project planning and Engineering**" *for final year Instrumentation Engineering* च्या विद्यार्थ्यांसाठी ह्या जून -२०१७ महिन्यात प्रकाशित झाले. हे पुस्तक मुंबई विद्यापीठाच्या
इंस्ट्रुमेंटेशन इंजिनीरिंग च्या आठव्या सेमिस्टर मध्ये वापरले जाणार आहे.

पण म्हणतात ना मराठी प्रेम तुम्हाला नेहमीच काहीना काही नवीन करण्याची प्रेरणा देतात माझे ही तसेच झाले असेल कदाचित कारण आजकालची सामाजिक परिस्थिती पाहून मी स्वतः खालील विषयावर काही शॉर्ट फिल्म्स सुद्धा बनविल्या आहेत. तसेच माझ्या मित्रांसाठी काही सामाजिक जागृती विषयावर स्क्रिप्ट वर्णन - नाटकीय संकल्पनाची कामे सुद्धा करीत आहे.

- प्रवास आयुष्याचा - (**https://youtu.be/oM3HZD6oGfQ**)
- माझ्या राजा रे..छत्रपती - (**https://youtu.be/ISlir3VQ47Q**)

- इन्शुरन्स विश्वासाचा - (**https://youtu.be/c8eWyfm4cek?list=PLgjnwVL7iXjp8eDCxgoZbsosSRkucjLV**)

- माझे दुसरे पुस्तक **समज-गैरसमज,** तुम्ही खालील लिंकवर वाचू शकता.

  (**http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samaj_gairsamaj_dknikam.pdf**)

- माझे तिसरे पुस्तक मॅजिक वर्ड.. Inspiring thoughts, तुम्ही खालील लिंकवर वाचू शकता. (**http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/magic_world_d_nikam.pdf**)

मी स्वतःला खूप भाग्यवंत समजतो कारण मला माझे करियर (प्रोफेशन) सांभाळून मराठी साहित्य किंवा मग सामाजिकतेसाठी काम करण्याची संधी मिळाली. मला वाटते प्रत्येकात एक कलाकार लपलेला असतो काही लोकांना तो कळतो काही लोक कळून न कळल्यासारखे वागतात तर काही जणांना मग कदाचित कळतही नसेल. परंतु मी सर्वांना एक गोष्ट सांगेन प्रत्येकाने आपल्यातील कलाकार ओळखा आणि मग पहा तुमचे आयुष्य किती मजेदार होते ते.....मी स्वत: अनुभवले आहे. जर तुम्हाला खरोखर याची प्रचीती आली तर आपला अभिप्राय आम्हाला जरुर कळवा. तुमचे अभिप्राय आम्हाला नवीन विषय आणि चांगले लेखन करण्यासाठी प्रेरणा देतात.

धन्यवाद् !

मी मराठी

दत्तात्रय निकम

लेखकाचा पत्ता:

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम
अ / ४०४, चंदन , मैत्री वाटिका ,
पारसिकनगर,जुना मुंबई पुणे रोड,
कळवा, ठाणे-४००६०५
मोबाईल / व्हाट्सअॅप: ९८१९१६६८१५
ई-मेल : dkn28379@gmail.com